ISSN 2456-656X

महाराष्ट्र साहित्य पत्रिका

जानेवारी ते मार्च २०२६ आणि एप्रिल ते जून २०२६ (जोडअंक)

१२१ वा वर्धापन दिन समारंभ व पुरस्कार प्रदान सोहळा

वर्धापन दिन समारंभात **मा. पं. सत्यशील देशपांडे** यांच्या हस्ते 'जीवनगौरव पुरस्कार' स्वीकारताना प्रसिद्ध लेखिका **श्रीमती प्रतिभा रानडे** आणि 'डॉ. भीमराव कुलकर्णी कार्यकर्ता पुरस्कार' स्वीकारताना **डॉ. श्रीकृष्ण काकडे**

प्रेक्षकांनी तुडुंब भरलेले सभागृह

राजा फडणीस पुरस्कृत उत्कृष्ट मसाप शाखा **'करंडक'** स्वीकारताना **गुहागर शाखेचे पदाधिकारी**

राजन लाखे पुरस्कृत डॉ. बाबूराव लाखे स्मृती **'वैशिष्ट्यपूर्ण शाखा पुरस्कार'** स्वीकारताना मसाप शाखा **दक्षिण सोलापूरचे पदाधिकारी**

रत्नाकर कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा **'मसाप उत्कृष्ट कार्यकर्ता'** पुरस्कार स्वीकारताना **श्री. दिनेश देशमुख,** आटपाडी जि. सांगली

रत्नाकर कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा **'मसाप उत्कृष्ट कार्यकर्ता'** पुरस्कार स्वीकारताना **श्रीमती अश्विनी चव्हाण,** सोलापूर

डॉ. राजा दीक्षित पुरस्कृत म. श्री. दीक्षित यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा **'मसाप स्नेहबंध'** पुरस्कार स्वीकारताना **श्री. अशोक सुलाखे**

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे त्रैमासिक मुखपत्र

महाराष्ट्र साहित्य पत्रिका

अंक क्र. ३८९
जानेवारी ते मार्च २०२६ आणि
एप्रिल ते जून २०२६ (जोडअंक)

संपादक । **माधव राजगुरू**

प्रकाशक । **डॉ. स्वाती महाळंक** प्रमुख कार्यवाह

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे
४९६, सदाशिव पेठ, टिळक रस्ता, पुणे ४११०३०.
दूरभाष । ०२०–२४४७५९६३
संकेतस्थळ । www.sahityaparishad.org
ई–मेल । masapasahityapatrika@gmail.com

कार्यालयाची वेळ ।
सकाळी ९.३० ते रात्री ८.००

महाराष्ट्र साहित्य पत्रिका

जानेवारी ते मार्च २०२६ आणि
एप्रिल ते जून २०२६ (जोडअंक)
अंक ३८९

संपादक
माधव राजगुरु

मुद्रक–प्रकाशक
डॉ. स्वाती महाळंक
प्रमुख कार्यवाह,
महाराष्ट्र साहित्य परिषद,
टिळक रस्ता, पुणे ४११०३०

अक्षरजुळणी व सजावट
लक कलाकल्य

मुखपृष्ठ
जयदीप कडू

मुद्रितशोधन
नेहा वैशंपायन

मूल्य : **५० रुपये**

या अंकात व्यक्त झालेल्या
विचारांशी संपादक, संपादन समिती,
सल्लागार मंडळ तसेच प्रकाशक
सहमत असतीलच असे नाही.

संपादक मंडळ

योगेश सोमण
अध्यक्ष मसाप

डॉ. स्वाती महाळंक
प्रमुख कार्यवाह मसाप

प्रदीप निफाडकर
कोषाध्यक्ष मसाप

प्रा. गणेश भगत
प्रा. वासुदेव वले
नंदकुमार सावंत

अंतरंग

मसापत्रिका । जानेवारी ते मार्च २०२६ आणि एप्रिल ते जून २०२६ (जोडअंक)

संपादकीय । **माधव राजगुरू । ७**

भाषाभिमानी महादेव गोविंद रानडे । **डॉ. वर्षा तोडमल । ९**

न्या. रानडे यांचे संस्थात्मक व प्रबोधनात्मक कार्य । **श्रीकांत चौगुले । १५**

असे होते साताऱ्याचे ऐतिहासिक संमेलन । **संदीप भानुदास तापकीर । १८**

उत्साहात साजरा झालेला वर्धापन दिन सोहळा । **अंजली कुलकर्णी, डॉ. आशुतोष जावडेकर । २३**

इतिहासकार जयसिंगराव पवार । **प्रा. डॉ. गणेश राऊत । २६**

भाषा व साहित्यक्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर । **डॉ. चिन्मय मधू घैसास । ३२**

भाषेला अर्थ देणाऱ्या विरामचिन्हांची ओळख । **माधव राजगुरू । ३७**

शब्दांपलीकडचे तात्या । **वैशाली मोरे । ४३**

शाखा कार्यवृत्त । ४९

येणें वाग्यज्ञें तोषावे

महाराष्ट्र साहित्य परिषद

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे
कार्यकारी मंडळ (२०२६-२०३१)

कार्यकारी मंडळ

अध्यक्ष । **योगेश सोमण**

प्रमुख कार्यवाह । **डॉ. स्वाती महाळंक** कोषाध्यक्ष । **प्रदीप निफाडकर**

पत्रिका संपादक । **माधव राजगुरू**

स्थानिक कार्यवाह

व्याख्याने व स्मृतिदिन । **सुनील महाजन**
विशेष पारितोषिके । **सुनेत्रा मंकणी**
वार्षिक ग्रंथ पारितोषिके । **अंजली कुलकर्णी**
परीक्षा विभाग । **माधव राजगुरू**
ग्रंथालय विभाग । **प्रसाद मिरासदार**
अतिथीनिवास-वास्तू देखभाल । **डॉ. नीतीन संगमनेरकर**

वर्धापनदिन पारितोषिके । **डॉ. आशुतोष जावडेकर**

सदस्य

राजन लाखे (पुणे जिल्हा)
डॉ. पुरुषोत्तम काळे (पुणे जिल्हा)
प्रभाकर ओव्हाळ (पुणे जिल्हा)
नंदकुमार सावंत (सातारा जिल्हा)
अलका बेडकिहाळ (सातारा जिल्हा)
अमरसिंह पाटणकर (सातारा जिल्हा)
पद्माकर कुलकर्णी (सोलापूर जिल्हा)
कल्याण शिंदे (सोलापूर जिल्हा)
डॉ. श्रुती वडगबाळकर (सोलापूर जिल्हा)
राजन मुठाणे (कोल्हापूर जिल्हा)
अरुण इंगवले (कोकण विभाग)
भिकू बारस्कर (ठाणे जिल्हा)
प्रकाश होळकर (नाशिक जिल्हा)
उन्मेष गायधनी (नाशिक जिल्हा)
जयंत येलूलकर (अहिल्यानगर जिल्हा)
गणेश भगत (अहिल्यानगर जिल्हा)
गणेश आढाव (जळगाव जिल्हा)
डॉ. वासुदेव वले (जळगाव जिल्हा)
डॉ. संजीव गिरासे (धुळे-नंदुरबार जिल्हा)
दीपक स्वामी (सांगली जिल्हा)

संपादकीय

नमस्कार,

जानेवारी २०२६ ते मार्च २०२६ आणि एप्रिल २०२६ ते जून २०२६ हा जोडअंक वाचकांसाठी सादर करताना विशेष आनंद होत आहे.

महाराष्ट्र साहित्य परिषदेची पंचवार्षिक निवडणूक नुकतीच पार पडली आहे. १ एप्रिल, २०२६ पासून नव्याने निवडून आलेल्या कार्यकारिणीने नव्या उत्साहाने व जोमाने कामाला सुरुवात केली आहे. एप्रिलच्या आधीचे काही महिने निवडणुकीच्या धामधुमीत गेल्यामुळे जानेवारी २०२६ ते मार्च २०२६ या काळातील अंक निघू शकला नाही, त्यामुळे जानेवारी २०२६ ते मार्च २०२६ आणि एप्रिल २०२६ ते जून २०२६ असा जोडअंक या वेळी प्रकाशित होत आहे. नवनिर्वाचित कार्यकारिणीच्या कार्यकाळातील हा पहिलाच अंक आहे. महाराष्ट्र साहित्य पत्रिकेच्या वाचकांना यापुढे उत्तमोत्तम साहित्याची मेजवानी मिळणार आहे.

शतकमहोत्सवी संमेलनाच्या उंबरठ्यावरील ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सातारा येथे नुकतेच पार पडले आहे. त्या संमेलनाचा आढावा घेणारा संदीप तापकीर यांचा लेख अंकात घेतला आहे. लवकरच पुण्यात १०० वे ऐतिहासिक साहित्य संमेलन होईल. संमेलने भरवण्याची परंपरा याच पुण्यातून १८७८ मध्ये सुरू झाली, त्यामुळे शंभराव्या संमेलनाइतकेच पहिल्या संमेलनालाही महत्त्व आहे. पुण्यातील ऐतिहासिक हिराबागेत १८७८ मध्ये न्या. महादेव गोविंद रानडे यांच्या अध्यक्षतेखाली पहिले ग्रंथकार संमेलन भरले होते. आज संमेलनाचे नाव जरी बदलले असले, तरी संमेलन भरवण्यामागील उद्दिष्टांमध्ये बदल झाला नाही. संमेलनाची संकल्पना पुढे आणणारे आणि पहिल्या ग्रंथकार संमेलनाचे अध्यक्षपद भूषवणारे न्या. रानडे यांचे जानेवारी २०२६ला १२५ वे स्मृतिवर्ष संपले. त्या निमित्ताने श्रीकांत चौगुले यांचा 'न्या. रानडे यांचे संस्थात्मक व प्रबोधनात्मक कार्य' आणि डॉ. वर्षा तोडमल यांचा 'भाषाभिमानी न्या. रानडे' हे दोन्ही लेख वाचनीय आहेत. ज्येष्ठ इतिहास संशोधक जयसिंगराव पवार २६ मार्च, २०२६ रोजी वयाच्या ८४ व्या वर्षी निधन पावले. त्यांच्या कार्यकर्तृत्वावर प्रकाश टाकणारा प्रा. गणेश राऊत यांचा लेख अंकात समाविष्ट केला आहे. प्रसिद्ध ग्रामीण साहित्यिक व्यंकटेश माडगूळकर यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेणारा वैशाली मोरे यांचा 'शब्दांपलीकडचे तात्या' हा लेख अंकात घेतला आहे. या शिवाय आजच्या काळात आव्हान ठरू पाहणाऱ्या एआय तंत्रज्ञानावर आधारित भाषा व साहित्यक्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर या विषयावरील लेख वाचकांच्या पसंतीला उतरेल अशी अपेक्षा आहे. जीवनाच्या विविध क्षेत्रांत कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI चा) वापर सुरू झाला आहे. याचा सरसकट वापर करत असताना यातून अनेक गंभीर प्रश्न निर्माण होत आहेत. यातील गुंतागुंत सोडवणे खूपच कठीण आहे. 'एआय' तंत्रज्ञान अनेक क्षेत्रांत फायदेशीर असले तरी याचे तोटेही तितकेच गंभीर आहेत. डॉ. चिन्मय घैसास यांनी त्यांच्या लेखातून 'एआय'चे फायदे-तोटे आणि मर्यादा यावर विस्तृत चर्चा केली आहे.

मराठीत वापरली जाणारी विरामचिन्हे मेजर थॉमस कॅन्डी या इंग्रज माणसाने सर्वप्रथम वापरायला सुरुवात केली. १८५० मध्ये त्याने 'विरामचिन्हांची परिभाषा' या नावाची १६ पृष्ठांची पुस्तिकाही प्रकाशित

केली होती. शब्दकोश, व्याकरण, लेखन, संपादन, भाषांतर इ. क्षेत्रांत त्याने केलेले कार्य मराठी भाषेसाठी उपकारक ठरले आहे, त्यामुळे २६ फेब्रुवारी हा थॉमस कॅन्डीचा जन्मदिवस विरामचिन्हे दिवस म्हणून साजरा करावा, असे आवाहन साप्ताहिक साधनाने महाराष्ट्र साहित्य परिषदेसह सर्व साहित्य संस्थांना केले आहे. याचे औचित्य साधून विरामचिन्हांची ओळख करून देणारा लेख मराठी लेखकांसाठी मुद्दामहून दिला आहे. अपेक्षा एवढीच आहे, की लेखनात विरामचिन्हे वापरली जावीत आणि ती काटेकोरपणे वापरली जावीत.

नांदी शतकमहोत्सवी संमेलनाची

शंभरावे संमेलन जानेवारी २०२७ मध्ये होत आहे आणि पुण्यात होत आहे, या दोन्ही गोष्टी ऐतिहासिक आहेत. संमेलन ही संकल्पनाच पुण्यातली आहे. संमेलनसंस्कृती प्रथम पुण्यात रुजली, वाढली आणि त्यानंतर तिचा हळूहळू प्रसार महाराष्ट्रात, बृहन्महाराष्ट्रात आणि परदेशातही झाला. पहिले संमेलन १८७८ ला पुण्यात न्या. म. गो. रानडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. या गोष्टीला लवकरच दीडशे वर्षे पूर्ण होतील. त्यापूर्वी शतकमहोत्सवी साहित्य संमेलन होणार आहे. अलीकडेच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. या गोष्टीला केंद्रस्थानी ठेवून हे संमेलन मराठी अभिजाततेला साजेसेच होईल, अशी ग्वाही महाराष्ट्र साहित्य परिषदेचे आणि अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष योगेश सोमण यांनी दिली आहे. तत्पूर्वी 'नांदी शतकमहोत्सवी साहित्य संमेलनाची' या शीर्षकाखाली महाराष्ट्र-बृहन्महाराष्ट्र व परदेशात नव्याण्णव ठिकाणी नव्याण्णव संमेलने होणार आहेत. यातील सर्व उपक्रम मराठी भाषा आणि साहित्य यांचे जतन आणि संवर्धन करण्याच्या दृष्टीने आखले जातील. यामध्ये परिसंवाद, चर्चा, समीक्षा कथाकथन, कवितावाचन, नाट्यसंमेलन, समीक्षासंमेलन, बालसाहित्य संमेलन, बोलीभाषांचा जागर अशा उपक्रमांचा समावेश असेल. हे सगळे उपक्रम एकेका दिवसाचे किंवा अर्ध्या दिवसाचे असतील आणि केवळ उपचार म्हणून या गोष्टी होणार नाहीत. याचा फायदा महाराष्ट्राबाहेरील कानाकोपऱ्यात झाकोळून गेलेल्या नव्या-जुन्या प्रतिभावंत कवी, लेखक, कलावंत यांच्याबरोबरच साहित्यरसिक, श्रोते, वाचक या सर्वांना होणार आहे. इच्छा असून, प्रतिभा असून ज्यांना कधीच व्यासपीठ मिळाले नाही, त्यांच्यासाठी ही विशेष पर्वणी आहे. या सर्व उपक्रमांसाठी महाराष्ट्र साहित्य परिषदेची संपूर्ण कार्यकारिणी संयोजनकार्यात सहभागी होणार आहे.

परिषदेची आणि महामंडळाची सूत्रे हाती घेतल्या क्षणापासून अध्यक्ष योगेश सोमण यांनी बालवाचक, बालसाहित्य, बोलीभाषा यांकडे अधिक विशेषत्वाने लक्ष देणार असल्याचे वारंवार अधोरेखित केले आहे. अशा शीर्षस्थ नेतृत्वाला प्रमुख कार्यवाह डॉ. स्वाती महाळंक, कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर आणि संपूर्ण कार्यकारिणीची खंबीर साथ लाभली आहे. वरील सर्व उपक्रम, संकल्प सिद्धीस जावोत, यशस्वी होवोत, यासाठी आपण सर्व एकत्रितपणे एकजुटीने काम करण्यासाठी कटिबद्ध होऊया आणि शंभरावे संमेलन शंभरटक्के यशस्वी करूया.

■■

माधव राजगुरू
संपादक



भाषाभिमानी महादेव गोविंद रानडे

डॉ. वर्षा तोडमल

न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या १२५व्या पुण्यस्मरणानिमित्त त्यांच्या जीवनकार्याचे स्मरण करणे ही केवळ औपचारिक कृतज्ञता नसून, आजच्या काळातील बौद्धिक आणि नैतिक गरज आहे. काही व्यक्ती इतिहासात केवळ काळाच्या एका टप्प्यावर उभ्या नसतात, तर त्या काळाच्या आरशात उभ्या राहून पुढच्या पिढ्यांकडे पाहत असतात. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचे व्यक्तिमत्त्व असेच आहे. त्यांच्या जीवनकार्याकडे पाहताना आपण केवळ भूतकाळाचे स्मरण करत नाही, तर वर्तमानाच्या अस्वस्थ प्रश्नांवर शांतचिंतन करण्याची संधी मिळवतो.

एखाद्या व्यक्तिमत्त्वाकडे पाहताना आपण त्याच्या काळालाही पाहत असतो. काळ हा केवळ पार्श्वभूमी नसतो, तो विचारांना आकार देणारा अदृश्य शिल्पकार असतो. महादेव गोविंद रानडे यांच्याकडे पाहताना मला वारंवार जाणवते की ते केवळ एका शतकातील न्यायमूर्ती किंवा समाजसुधारक नव्हते, तर ते संक्रमणाच्या दाराशी उभे राहून भारतीय समाजाला नवी बौद्धिक दिशा देणारे चिंतक होते. कधीकधी आपण एखाद्या व्यक्तीबद्दल विचार करताना लक्षात येते, की ती व्यक्ती फक्त इतिहासाची नोंद नाही, तर ती विचारांचा प्रवाह आहे. महादेव गोविंद रानडे हे असेच व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्या लेखनात, भाषेतील सूक्ष्मतेत आणि सामाजिक सुधारणेच्या प्रयत्नांत एक शाश्वत तेज आहे.

आजचा काळ विचारांच्या गोंगाटाचा आहे. मतभेद झटपट संघर्षात बदलतात, सुधारणा तात्काळ क्रांतीच्या भाषेत मांडल्या जातात आणि विवेक हा शब्दच जणू दुर्बलतेचा पर्याय ठरतो. अशा वेळी रानडे यांचे संपूर्ण जीवन आपल्याला सांगते, की परिवर्तनाचा खरा मार्ग हा संयम, संवाद आणि अंतर्मुख विवेकातून जातो. आज जेव्हा विकास आणि मूल्ये, स्वातंत्र्य आणि जबाबदारी, परंपरा आणि आधुनिकता यांमध्ये संघर्ष दिसतो, तेव्हा रानडे यांचे विचार मार्गदर्शक दीपस्तंभासारखे भासतात. त्यांनी कोणतीही टोकाची भूमिका घेतली नाही. त्यांनी मध्यमार्ग निवडला–जो दुर्बलतेचा नव्हे, तर प्रगल्भतेचा मार्ग आहे.

न्यायमूर्ती रानडे हे केवळ उच्च न्यायालयाचे न्यायाधीश नव्हते; ते विवेकशील समाजसुधारक,

अर्थचिंतक, इतिहासकार आणि राष्ट्रनिर्मितीचे शिल्पकार होते. न्यायदान करताना त्यांनी कायद्याला मानवी करुणेची जोड दिली. समाजसुधारणेकडे पाहताना त्यांनी परंपरेशी संवाद साधत परिवर्तनाचा मार्ग दाखविला. विधवाविवाह, स्त्रीशिक्षण, सामाजिक समता यांसारख्या प्रश्नांवर त्यांनी भावनिक उद्रेकाची नव्हे, तर विवेकाची भूमिका घेतली. त्यांच्या विचारांची खरी ताकद ही संतुलनात होती. पाश्चात्त्य शिक्षणाचा प्रभाव स्वीकारताना भारतीय मूल्यांची मुळे त्यांनी कधीच सैल होऊ दिली नाहीत. अर्थविचार करताना त्यांनी स्वदेशी उद्योग आणि सामान्य जनतेच्या जीवनाशी अर्थकारण जोडले, त्यामुळेच त्यांचे विचार आजही कालातीत वाटतात.

न्या. रानडे आज का आठवतात? कारण आजचा काळ घोषणांचा आहे. घाईचा, टोकाचा आणि अनेकदा आत्मपरीक्षणाविना व्यक्त होणाऱ्या मतांचा आहे. समाजपरिवर्तन म्हणजे आक्रमक भूमिका, सुधारणा म्हणजे त्वरित क्रांती आणि मतभेद म्हणजे संघर्ष असा एक धोकादायक समज रूढ होत असताना न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचे स्मरण अस्वस्थ करणारे ठरते; कारण त्यांनी ज्या विवेकाचा आग्रह धरला, तो आजच्या सार्वजनिक चर्चेत जवळजवळ अनुपस्थित आहे.

रानडे हे परिवर्तनाचे विरोधक नव्हते, तर उलट ते त्याचे शिल्पकार होते. मात्र त्यांना बदलाची दिशा महत्त्वाची वाटत होती, वेग नव्हे. समाजसुधारणा ही भावनिक आवेगातून नव्हे, तर सामाजिक वास्तवाचे भान ठेवून व्हावी, असा त्यांचा ठाम आग्रह होता. न्यायमूर्ती रानडे यांचे पुण्यस्मरण म्हणजे एका व्यक्तीच्या कार्याला वंदन करणे नाही. ते आजच्या अस्वस्थ काळात विवेक, करुणा यांची पुन्हा प्रतिष्ठापना करण्याचा एक संकल्प आहे. विवेकशील भारताच्या स्वप्नाला पुन्हा एकदा उजाळा देणे आहे.

आजच्या काळात भाषेचा प्रश्न पुन्हा नव्याने उभा आहे. जागतिकीकरणाच्या प्रवाहात आपण कोणत्या भाषेत विचार करतो, कोणत्या भाषेत स्वप्न पाहतो आणि कोणत्या भाषेत स्वतःला व्यक्त करतो– हा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा झाला आहे. अशा वेळी रानडे यांची संतुलित भूमिका आपल्याला सांगते, 'अभिमान असावा, पण तो अडसर ठरू नये. आधुनिकता स्वीकारावी, पण आत्मस्मृती गमावून नव्हे.' त्यांच्या काळात भाषा हा केवळ व्यवहाराचा विषय नव्हता–ती अस्मितेचा, स्वाभिमानाचा आणि भविष्यदृष्टीचा प्रश्न होती. इंग्रजी शिक्षणाच्या नव्या लाटेत अनेकांना आधुनिकतेचे आकर्षण दिसत होते, तर काहींना परंपरेची ओढ. या दोन टोकांच्या दरम्यान रानडे उभे राहिले–निरपेक्ष, संयमी, पण ठाम. मातृभाषेवरील त्यांचा विश्वास हा भावनिक घोषणांतून नव्हता, तर तो समाजजागृतीच्या भानातून होता. त्यांनी भाषेला केवळ शब्दांचे माध्यम मानले नाही. ती संस्कृतीची स्मृती, विचारांची भूमी आणि राष्ट्रभावनेचे अंकुरस्थान आहे, असे त्यांनी मानले.

University of Mumbai मध्ये शिक्षण घेतलेल्या रानडे यांना पाश्चात्त्य इतिहासलेखन, अर्थशास्त्र आणि राजकीय तत्त्वज्ञान यांचा परिचय इंग्रजीतून झाला. त्यांच्या 'Essays on Indian Economics' आणि 'Rise of the Maratha Power' यांसारख्या ग्रंथांतून त्यांनी भारतीय समाज–अर्थव्यवस्थेचे विश्लेषण केले. इंग्रजी लेखनाचा उद्देश दोन पातळ्यांवर दिसतो.

१. ब्रिटिश सत्ताधाऱ्यांपुढे भारतीय प्रश्नांचे तर्काधिष्ठित सादरीकरण करणे,

२. भारतीय सुशिक्षित वर्गाला आधुनिक चिंतनाशी जोडणे.

म्हणजेच, इंग्रजी ही त्यांच्यासाठी सत्तेशी संवाद साधण्याचे आणि आधुनिक बौद्धिक परंपरेत प्रवेश मिळवण्याचे साधन होते; आत्मविस्मरणाचे माध्यम नव्हते. त्यांच्या विचारांमुळे–

मराठी गद्याची आधुनिक परंपरा बळकट झाली,
शिक्षणाचा प्रसार मातृभाषेतून झाला,
भाषिक अस्मितेची जाणीव दृढ झाली,

आणि पुढील भाषिक चळवळींना वैचारिक अधिष्ठान मिळाले.

मराठी साहित्याच्या विकासासंबंधी टिपण, (१८९८ प्रास्ताविक अंश)

ग्रेट ब्रिटन व आयर्लंड इथल्या रॉयल एशियाटिक सोसायटीच्या संचालकांनी व उपाध्यक्षांनी १८६३ साली तत्कालीन भारत मंत्र्यांना एक पत्र पाठवले. अलीकडच्या वर्षांमध्ये हिंदूंनी त्यांच्या प्राचीन संस्कृत वा यांतील अगणित संहितांचे संपादन करून, इंग्रजी व संस्कृत ग्रंथांचे त्यांच्या देशी बोलींमध्ये भाषांतर करून आणि राजकीय, वैज्ञानिक व धार्मिक स्वरूपाच्या विषयांवर मूळ रचना निर्माण करून बरीच साहित्यिक कृतिशीलता दाखवली आहे. याकडे भारत मंत्र्यांचे लक्ष वेधणे, हा या पत्रामागील उद्देश होता. या पुस्तकांची संख्या अगणित आहे आणि त्यातील अनेक पुस्तके महत्त्वाची असूनही त्यातला थोडाच भाग युरोपीय अभ्यासकांना उपलब्ध होतो, असे पत्रलेखकांनी नमूद केले आणि भारतीय प्रशासनाचे लक्ष या विषयाकडे वेधणे आवश्यक आहे, तसेच गेल्या काही वर्षांमधील अशा पुस्तकांच्या सूची प्रकाशित केल्या जाव्यात आणि भारतीय छापखान्यांमधून बाहेर पडणाऱ्या सर्व देशी पुस्तकांच्या शीर्षकांची पूरक तिमाही प्रकाशनेही काढली जावीत, यासाठी आदेश दिले जावेत, अशी सूचनाही पत्रात केली होती. त्यानंतर भारत मंत्र्यांनी भारत सरकारला एक खलिता पाठवला आणि १८६४ सालापर्यंत प्रकाशित झालेल्या पुस्तकांची सूची प्रकाशित करण्याची इच्छा सरकारने स्थानिक प्रशासनांकडे व्यक्त केली आणि या सूचीला नवीन प्रकाशनांची तिमाही जोडही दिली जावी असे सांगितले. या दरम्यान सर अलेक्झांडर ग्रॅन्ट सार्वजनिक शिक्षण विभागाचे संचालक झाले आणि संस्कृत, मराठी, गुजराती, कन्नड, सिंधी, हिंदुस्तानी व फार्सी या भाषांमध्ये १८६४ सालच्या अखेरपर्यंत प्रकाशित झालेल्या छापील पुस्तकांची पहिली सूची त्यांच्या आदेशानुसार तयार करण्यात आली.

१२५ वर्षांनंतरही रानडे भाषेच्या संदर्भात यामुळे आठवतात. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महादेव गोविंद रानडे यांनी जो भाषाविचार मांडला, तो केवळ त्या काळापुरता मर्यादित नव्हता. त्यांच्या विचारात एक विलक्षण दूरदृष्टी होती. भाषा ही केवळ संवादाचे साधन नाही, तर ज्ञानप्राप्तीची, संस्कृतीची आणि समाजपरिवर्तनाची मुख्य कडी आहे; म्हणूनच १२५ वर्षांनंतरही त्यांचे विचार आजच्या संदर्भात तितकेच ताजे आणि लागू वाटतात. पहिले कारण म्हणजे मातृभाषा आणि इंग्रजी यांमधील ताण. आजच्या शिक्षणव्यवस्थेत इंग्रजीचे वर्चस्व अधिकच वाढले आहे. 'ग्लोबल' होण्याच्या ध्यासात अनेकदा मातृभाषेकडे दुर्लक्ष होताना दिसते. आज डिजिटल युगात माहिती सहज उपलब्ध असली, तरी ती सर्वांना समजेल अशा भाषेत आहे का? हा प्रश्न अजूनही तितकाच जिवंत आहे. दुसरे कारण म्हणजे शिक्षणाचे लोकशाहीकरण. रानड्यांनी भाषा आणि शिक्षण यांचा संबंध केवळ शैक्षणिक ठेवला नाही, तर सामाजिक न्यायाशी जोडला. मातृभाषेतून शिक्षण मिळाले, तर समाजातील सर्व स्तरांपर्यंत ज्ञान पोहोचू शकते, ही त्यांची भूमिका होती. आज 'समावेशक शिक्षण' (inclusive education) ही जी आधुनिक संकल्पना म्हणून मांडली जाते, त्याचे बीज रानड्यांच्या विचारांत आधीच आढळते.

तिसरे कारण म्हणजे भाषा आणि ओळख (identity). आज जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत स्थानिक भाषा आणि संस्कृतीवर दबाव वाढतो आहे. अशा वेळी रानडे यांनी मांडलेला 'भाषाभिमान' हा संकुचित राष्ट्रवाद नव्हता, तर आत्मसन्मानाचा आणि बौद्धिक स्वातंत्र्याचा होता. त्यांनी स्पष्ट केले, की आपल्या भाषेत विचार करणारा समाजच खऱ्या अर्थाने स्वतंत्र होऊ शकतो.

चौथे महत्त्वाचे कारण म्हणजे ज्ञाननिर्मितीची दिशा. आजही उच्च शिक्षणात मोठ्या प्रमाणावर इंग्रजीतील संदर्भग्रंथांवर अवलंबून राहावे लागते. भारतीय भाषांमध्ये संशोधन, लेखन आणि दर्जेदार

साहित्यनिर्मिती अजूनही अपेक्षित प्रमाणात होत नाही. रानडे यांनी याच मुद्यावर भर देत पाठ्यपुस्तक निर्मिती, भाषांतर आणि शब्दसंपत्तीच्या विकासाची गरज अधोरेखित केली होती, त्यामुळे त्यांच्या विचारांची प्रासंगिकता आज अधिक तीव्रतेने जाणवते.

आणखी एक सूक्ष्म, पण महत्त्वाचा मुद्दा म्हणजे भाषा आणि विचारप्रक्रिया. मानसशास्त्र आणि शिक्षणशास्त्र या दोन्ही क्षेत्रांत आज हे मान्य केले जाते, की व्यक्तीची विचार करण्याची क्षमता तिच्या मातृभाषेशी घट्ट जोडलेली असते. रानडे यांनी हे तत्त्व त्या काळातच ओळखले होते; म्हणूनच ते म्हणत, की परकीय भाषेतून शिक्षण घेताना विद्यार्थी विचार करण्याऐवजी भाषांतर करण्यात अडकतो. रानडे यांची आठवण ही केवळ इतिहासातील व्यक्ती म्हणून नाही, तर एक जिवंत विचारप्रवाह म्हणून होते. त्यांनी भाषेचा प्रश्न केवळ भावनिकतेने मांडला नाही, तर तर्क, अभ्यास आणि सामाजिक जबाबदारी यांच्या आधारावर मांडला; म्हणूनच १२५ वर्षांनंतरही आपण जेव्हा भाषेच्या प्रश्नाकडे पाहतो, तेव्हा रानडे आपल्याला केवळ आठवत नाहीत, तर ते आपल्याला विचार करायला भाग पाडतात. आजच्या काळात, जेव्हा आपण 'डिजिटल इंडिया', 'ग्लोबल एज्युकेशन' यांसारख्या संकल्पना मांडतो, तेव्हा रानडे यांचा आवाज पुन्हा ऐकू येतो–

भाषा बदलली, साधने बदलली, पण ज्ञान लोकांपर्यंत पोहोचवण्याचा मूलभूत प्रश्न अजूनही तोच आहे आणि कदाचित म्हणूनच–

१२५ वर्षांनंतरही रानडे विस्मरणात जात नाहीत. ते प्रत्येक नव्या भाषिक प्रश्नात पुन्हा उभे राहतात. हे अधोरेखित होते.

विद्यापीठात मराठीला स्थान, ग्रंथरचनेचा आढावा व सूची, ग्रंथकार संमेलन हे त्यांचे कार्य महत्त्वाचे आहे.

एकोणिसाव्या शतकात शिक्षण व्यवस्थेच्या केंद्रस्थानी इंग्रजी भाषा स्थिरावत असताना, भारतीय भाषांची स्थिती केवळ दुय्यम नव्हे तर उपेक्षित होती. थॉमस मॅकॉले यांच्या शिक्षण धोरणानंतर इंग्रजीला 'ज्ञानाची भाषा' आणि सत्तेचा प्रमुख मार्ग म्हणून प्रतिष्ठा मिळाली. परिणामी, स्थानिक भाषांमध्ये ज्ञाननिर्मिती, अध्यापन आणि संशोधन यांची परंपरा खंडित होण्याचा धोका निर्माण झाला. या पार्श्वभूमीवर महादेव गोविंद रानडे यांनी अत्यंत दूरदर्शी भूमिका घेतली.

रानडे यांनी एशियाटिक सोसायटीमध्ये भाषाविषयक पाच महत्त्वपूर्ण लेख सादर केले. हे लेख इंग्रजीत असले, तरी त्यांचा आशय भारतीय भाषांच्या उन्नतीसाठीच होता. त्यांनी तर्कशुद्ध आणि ऐतिहासिक आधार देत सिद्ध केले, की कोणतीही भाषा ही ज्ञानवहनासाठी अपुरी नसते; उलट योग्य प्रयत्न आणि शब्दसंपत्तीच्या विकासातून ती अधिक सक्षम होऊ शकते. त्यांनी मराठी भाषेच्या अभिव्यक्ती क्षमतेवर ठाम विश्वास व्यक्त केला आणि तिच्या माध्यमातून उच्च शिक्षण देण्याची कल्पना पुढे आणली.

१. या प्रयत्नांचा परिपाक म्हणजे मुंबई विद्यापीठसारख्या संस्थांमध्ये मराठीचा अभ्यासक्रमात समावेश होण्याची प्रक्रिया सुरू झाली. ही केवळ भाषेची मान्यता नव्हती, तर भारतीय ज्ञानपरंपरेला मिळालेली प्रतिष्ठाही होती. त्यांनी सुमारे चाळीस वर्षे सातत्याने या विषयावर प्रयत्न केले–वादविवाद, लेखन, संस्थात्मक हस्तक्षेप आणि बौद्धिक नेतृत्व या सर्व माध्यमांतून त्यांनी मराठीसाठी जागा निर्माण केली.

२. रानडे यांच्या विचारांचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांनी 'भाषाभिमान' हा केवळ भावनिक मुद्दा न ठेवता, तो बौद्धिक आणि शैक्षणिक पातळीवर मांडला; म्हणूनच विद्यापीठासारख्या उच्च शिक्षणसंस्थांमध्ये मराठीला स्थान मिळणे म्हणजे केवळ विषयाची भर नव्हे, तर संपूर्ण समाजाच्या बौद्धिक सक्षमीकरणाची दिशा होती.

३. याच संदर्भात त्यांनी अभ्यासक्रम निर्मिती, पाठ्यपुस्तक लेखन आणि भाषांतर यांवरही भर दिला. त्यांनी सूचित केले, की भाषेत दर्जेदार ज्ञानसाहित्य उपलब्ध करणे आवश्यक आहे. या दृष्टीने त्यांनी 'शब्दसंपत्ती', 'संदर्भग्रंथ' आणि 'शैक्षणिक लेखन'

यांची उभारणी करण्यावर भर दिला.

रानडे यांच्या प्रयत्नांमुळे मराठीला केवळ व्यवहारभाषा न मानता ज्ञानभाषा म्हणून प्रतिष्ठा मिळवून देण्याचा मार्ग १९ व्या शतकात प्रशस्त झाला. ही भूमिका पुढील भाषिक चळवळींसाठी दिशादर्शक ठरली.

रानडे यांचे निबंध म्हणजे विचारांची परंपरा आहे. त्यांचे पाच महत्त्वाचे निबंध हे त्यांच्या वैचारिक व्यक्तिमत्त्वाचे द्योतक आहेत. दर्जेदार भाषांतर, योग्य पाठ्यपुस्तकनिर्मिती आणि समृद्ध शब्दसंपत्ती या त्रिसूत्रीवर त्यांनी भर दिला. भाषेच्या माध्यमातूनच समाजाची ओळख, मूल्यव्यवस्था आणि विचारप्रक्रिया घडते, असे त्यांचे मत दिसते.

ग्रंथरचनेचा आढावा, सूची व संशोधन

मराठी वाङ्मयाच्या इतिहासात ग्रंथरचनेचा आढावा घेऊन सूची तयार करण्याचे कार्य रानडे यांनी प्रथमच पद्धतशीर रीतीने केले. हे कार्य केवळ संकलन नव्हते, तर ते ज्ञानव्यवस्थेची मांडणी करण्याचे प्रयत्न होते.

मराठी वाङ्मयाच्या इतिहासात ग्रंथनिर्मिती झाली, परंतु त्या निर्मितीचा पद्धतशीर आढावा घेण्याची आणि तिची शास्त्रीय सूची (bibliography) तयार करण्याची जाणीव फार उशिरा निर्माण झाली. या जाणीवेचे पहिले सुस्पष्ट आणि अभ्यासपूर्ण रूप आपल्याला महादेव गोविंद रानडे यांच्या कार्यात दिसते; म्हणूनच, मराठीतील ग्रंथसूची-निर्मितीचा पाया त्यांनीच घातला, असे ठामपणे म्हणता येते. कोणत्याही भाषेच्या प्रगतीसाठी ग्रंथांची संख्या पुरेशी नसते; त्यांचा सुसूत्र विन्यास (systematic arrangement) आणि संदर्भ सुलभता (accessibility) तितकीच महत्त्वाची असते. रानडे यांच्या दृष्टीने ग्रंथसूची तयार करणे म्हणजे केवळ नावे आणि लेखकांची यादी करणे नव्हते. त्यांनी त्यात विषयवार वर्गीकरण, कालानुक्रम आणि उपयोगिता या निकषांचा विचार केला. उदाहरणार्थ, इतिहास, विज्ञान, धर्म, शिक्षण, भाषा-अशा विविध विषयांनुसार ग्रंथांचे वर्गीकरण केल्यास अभ्यासकाला आवश्यक माहिती सहज मिळू शकते. ही दृष्टी त्या काळासाठी अत्यंत आधुनिक आणि संशोधनाभिमुख होती.

न्या. रानडे यांची स्वत:ची देशी प्रकाशन सूचीमधील मराठी भागाबद्दल टिपणे-

सर्वंकष दृष्टीने पाहिले तर इथे मांडलेले चित्र अजिबात समाधानकारक नाही, हे खरे आहे. मराठी भाषेने प्रगतीचा जो टप्पा सध्या गाठला आहे, त्यात पूर्णत्वास गेलेले गतकालीन यश नसून भविष्यासाठीची आश्वासकता दिसते आहे, या दृष्टीने त्याचे कौतुक व्हायला हवे. चाळीस वर्षांच्या तुटपुंज्या कालावधीचा विचार केल्यावर मात्र आपल्याला एवढ्याशा काळात झालेल्या कामाचे प्रमाण पाहून आश्चर्य वाटते. विशेषतः या इलाक्यातील भगिनी भाषांचे तुलनात्मक दारिद्र्य लक्षात घेता मराठीतील काम लक्षणीय ठरते.

मराठीने आतापर्यंत साधलेल्या प्रगतीचे अवाजवी अवमूल्यन केल्याचा आरोप माझ्यावर लावला जाणार नाही, अशी मला आशा आहे; परंतु, परक्याच्या दृष्टिकोनातून आपल्या सध्याच्या साहित्याकडे पाहणाऱ्या कोणालाही हे साहित्य बहुतांशाने अंधश्रद्धाळू वा बालिश वाटेल, यात काही शंका नाही. ही निंदा पुसून काढण्यासाठी अनेक शतके कळकळीचे प्रयत्न करावे लागतील; परंतु, वर्तमानकाळ अनेक अर्थांनी आश्वासक आहे आणि लवकरच मराठी आधुनिक भारतातील प्रगत भाषांमध्ये पहिल्या क्रमांकाचे स्थान पटकावेल, अशी स्पष्ट शक्यताही दिसते आहे. (संदर्भ-संकीर्ण निबंध-भाषांतर -अवधूत डोंगरे)

याचबरोबर, त्यांनी एक महत्त्वाचा मुद्दा अधोरेखित केला, तो म्हणजे ग्रंथसूची ही संशोधनाची सुरुवात आहे, शेवट नाही. एखाद्या विषयावर आधी काय झाले आहे, हे समजल्याशिवाय नवीन संशोधनाची दिशा ठरू शकत नाही, त्यामुळे ग्रंथसूची ही अभ्यासकासाठी मार्गदर्शक नकाशा (roadmap) ठरते. रानडे यांनी या विचाराला संस्थात्मक रूप देण्याचा प्रयत्न केला. एशियाटिक सोसायटीसारख्या व्यासपीठांवर त्यांनी या विषयावर चर्चा घडवून

आणली. या उपक्रमाचा दीर्घकालीन परिणाम अत्यंत महत्त्वाचा ठरला. पुढील काळात मराठीमध्ये ग्रंथसूची तयार करण्याची परंपरा विकसित झाली–विविध विषयांवरील संदर्भग्रंथ, सूचिपत्रे, ग्रंथसंचिका तयार होऊ लागल्या. संशोधनाची पद्धत अधिक शिस्तबद्ध आणि वैज्ञानिक झाली, त्यामुळे मराठी वाङ्मयाचा अभ्यास केवळ वाचनापुरता मर्यादित न राहता, तो संशोधनात्मक आणि विश्लेषणात्मक बनला. या सर्व प्रक्रियेत त्यांचे योगदान केवळ प्रारंभिक नव्हे, तर दिशादर्शक आहे. त्यांनी दाखवून दिले, की भाषा विकसित करायची असेल, तर तिच्या वाङ्मयाचा सखोल अभ्यास आणि नोंद ठेवणे आवश्यक आहे. ग्रंथरचनेचा आढावा आणि सूची ही केवळ तांत्रिक बाब नसून, ती ज्ञानसंस्कृतीची मूलभूत गरज आहे.

ग्रंथकार संमेलनाचे पहिले अध्यक्ष

रानडे हे ग्रंथकार संमेलनाचे पहिले अध्यक्ष होते. ही बाब त्यांच्या साहित्यिक आणि वैचारिक नेतृत्वाची साक्ष देते. त्यांच्या अध्यक्षतेखाली हे संमेलन केवळ साहित्यिक कार्यक्रम न राहता ते एक बौद्धिक व्यासपीठ बनले.

या संमेलनातून लेखक, विचारवंत आणि समाज यांच्यातील संवाद अधिक सशक्त झाला. रानडे यांनी लेखकांना केवळ सर्जनशीलतेपुरते मर्यादित न ठेवता, त्यांना सामाजिक जबाबदारीची जाणीव करून दिली.

संमेलन हे केवळ वाचन–प्रस्तुतीपुरते न राहता, वर्षभरात प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांचाआढावा (review) आणि सूची (bibliography) सादर करण्याचे व्यासपीठ असावे. यामुळे संशोधनाला दिशा मिळेल आणि अभ्यासकांसाठी संदर्भसाखळी उभी राहील, हा त्यांच्या विचारांचा केंद्रबिंदू दिसतो.

रानडे यांच्या प्रभावामुळे ग्रंथकार संमेलनांना धोरणात्मक स्वरूप मिळाले. पुढे या परंपरेतूनच अधिक व्यापक आणि संघटित स्वरूपाची वाङ्मयीन अधिवेशने उभी राहिली. लेखक, अभ्यासक, संपादक, प्रकाशक यांच्यात संवादाची साखळी तयार झाली. संमेलन म्हणजे केवळ सन्मान–पुरस्कार नव्हे, तर समालोचन, दिशानिर्देश आणि सामूहिक जबाबदारी ही जाणीव पक्की झाली. ग्रंथकार संमेलन म्हणजे भाषेच्या प्रगतीची कार्यशाळा होय. जिथे कल्पना तपासल्या जातात, निकष घडतात आणि पुढील वाटचालीचा आराखडा ठरतो. आजही जेव्हा आपण साहित्य संमेलनांकडे पाहतो, तेव्हा त्यामागे रानडे यांनी घातलेली हीच पायाभूत दृष्टी दिसते. संवादातून परिपक्वता, आढाव्यातून दिशा आणि सामूहिकतेतून वाङ्मयाचा विकास. हे सूत्र त्यांनी घालून दिले.

१६ जानेवारी, १९०१ रोजी, मुंबई येथे त्यांची प्राणज्योत मालवली.

(त्या रात्री त्यांनी 'अ हिस्टरी ऑफ अवर ओन टाइम्स' हे जस्टिन मेकर्थी यांचे पुस्तक वाचायला घेतले होते.) आजच्या काळात त्यांच्या कार्याकडे पाहताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते, भाषा टिकवायची असेल, तर तिच्यावर प्रेम करण्याइतकेच तिच्यासाठी काम करणे आवश्यक आहे. महादेव गोविंद रानडे हे त्या कृतिशील भाषाभिमानाचे अजरामर प्रतीक आहेत.

(वसंत व्याख्यानमालेत दि. २ मे २०२६ रोजी भाषाभिमानी महादेव गोविंद रानडे या विषयावर दिलेल्या भाषणाचा अंश)

डॉ. वर्षा तोडमल
लेखक, संपादक, कवयित्री
varsha.todmal@gmail.com

संदर्भ :
१. मराठी वाङ्मयाची अभिवृद्धी एक टिपण १८९८, लेखक– म. गो. रानडे– भाषांतर– डॉ. स. गं. मालशे
२. मराठी गद्याचा इंग्रजी अवतार– द. वा. पोतदार, व्हीनस प्रकाशन.
३. मराठी सत्तेचा उत्कर्ष – महादेव गोविंद रानडे.
४. आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार : न्या. महादेव गोविंद रानडे.

न्या. रानडे यांचे संस्थात्मक व प्रबोधनात्मक कार्य

श्रीकांत चौगुले

महाराष्ट्रात सामाजिक बदलाच्या दृष्टीने १९ व्या शतकात नवविचारांचे वारे वाहू लागले. शेकडो वर्षांच्या परंपरेला छेद देणाऱ्या आधुनिक विचारांचे दर्शन विविध माध्यमातून घडू लागले. पूर्वीच्या काळी धार्मिक संस्थाच कार्यरत होत्या. नवविचारातून अनेक सामाजिक संस्थांचाही उदय झाला, अशा अनेक संस्थांचे संस्थापक व आपल्या लेखणी आणि वाणीतून आधुनिक विचारांची पेरणी करणारे, समाज जीवनातील अनिष्ट रूढींच्या बदलासाठी प्रयत्न करणारे न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे. त्यांचे मूळ नाव महादेव असले तरी ते माधवराव या नावानेही ओळखले जात असत.

न्यायमूर्ती रानडे यांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील निफाड या गावी झाला. त्यांचे वडील गोविंद रानडे हे कलेक्टर कचेरीत कारकून होते. नंतरच्या काळात त्यांच्या वडिलांनी नोकरीच्या निमित्ताने कोल्हापूर येथे स्थलांतर केले. महादेव रानडे यांचे प्राथमिक शिक्षण कोल्हापूरला झाले. त्यानंतरच्या शिक्षणाची सोय तेव्हा कोल्हापुरात नव्हती. वडिलांनी शिक्षणासाठी त्यांना मुंबईला पाठवले. मुंबईत एलफिस्टन हायस्कूलमधून माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. सन १८५७ मध्ये मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली. त्या काळात मॅट्रिकची परीक्षा विद्यापीठाकडून घेतली जात असे. विद्यापीठाच्या पहिल्या तुकडीत ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. १८६२ मध्ये त्यांनी बी.ए. केले. बी.ए. करत असतानाच त्यांनी अध्यापनाचे कार्य सुरू केले. १८६४ मध्ये ते एम.ए. झाले. त्यानंतर त्यांनी एलफिस्टन कॉलेजमध्येच प्रोफेसर म्हणून काही काळ काम केले. त्यापूर्वी ट्रान्सलेटर म्हणूनही त्यांनी काम केले होते. १८६५ मध्ये ते कायद्याच्या परीक्षेत उत्तीर्ण झाले. ते ॲडवोकेट झाले. त्यानंतर त्यांनी न्याय खात्यात नोकरी केली. १८७१ मध्ये त्यांची न्यायाधीश म्हणून नेमणूक झाली. १८९३ मध्ये ते हायकोर्टाचे जज्ज झाले. तेव्हापासून ते न्यायमूर्ती रानडे या नावाने सार्वजनिक जीवनात परिचित झाले.

ब्रिटिश काळात सरकारी नोकरीत असतानाही त्यांनी सामाजिक काम केले. अनेक संस्थांची उभारणी केली. वृत्तपत्रांतून व सभांमधून आपले विचार मांडले. न्यायमूर्ती रानडे यांच्या आधी समाज सुधारण्यासाठी प्रयत्न सुरू झाले होते. लोकहितवादींनी आपल्या

शतपत्रातून विचार मांडले. विष्णुशास्त्री पंडित यांनी विधवांच्या विवाहासाठी प्रयत्न केले. महात्मा फुले यांनी सामाजिक परिवर्तनासाठी प्रयत्न केले. या सर्व पार्श्वभूमीवर न्यायमूर्ती रानडे यांनी समाज सुधारण्यासाठी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या कार्याला समाजातून काही अंशी पाठिंबा आणि बळ मिळत गेले. याचे कारण म्हणजे न्यायमूर्तींचा प्रचंड आणि सखोल अभ्यास, विचार मांडण्याची शैली आणि त्यांच्या स्थानाचा, पदाचा समाजजीवनावर असलेला प्रभाव. तत्कालीन काळात एवढे उच्च शिक्षण घेतलेले आणि उच्च न्यायालयाचे न्यायाधीश असे महत्त्वाचे व मोठे पद असणारे ते एकमेव महाराष्ट्रीयन होते. या सर्वांमुळे त्यांना संस्था स्थापन करण्यासाठी, प्रबोधनासाठी व प्रत्यक्ष कार्यासाठी समाजजीवनातून सकारात्मक मदत झाली.

न्यायमूर्ती रानडे यांच्या पुढाकारातून स्थापन झालेल्या संस्था आज शतकोत्तर वाटचाल करत आहेत. यातूनच या संस्था स्थापनेमागचे उद्धेश किती मूलभूत आणि महत्त्वाचे होते, हे लक्षात येते.

१८७० मध्ये पुणे सार्वजनिक सभा या संस्थेची स्थापना झाली. तीन संस्थापकांपैकी ते एक होते. जनता आणि ब्रिटिश सरकार यांच्यामधला दुवा म्हणून या संस्थेने काम केले. समाजातील सुशिक्षित आणि प्रतिष्ठित अशा लोकांचा यामध्ये सहभाग होता. जनतेच्या अडचणी सरकारपर्यंत पोहोचविणे. दुष्काळ, अन्यायकारक कर व कायदे यांपासून शेतकऱ्यांचे व लोकांचे कायदेशीर संरक्षण करणे. असे अनेक उद्देश यामध्ये होते. लोकांनी निवडून दिलेले ९५ सदस्य सुरुवातीला सार्वजनिक सभेत कार्यरत होते. संस्थेने स्वदेशी चळवळीसाठी मोठे योगदान दिले. त्यामध्ये सार्वजनिक काका म्हणून ओळखले जाणारे गणेश वासुदेव जोशी यांचा मोठा वाटा होता. संस्थेची पुण्यात बुधवार पेठेत वास्तू असून, संस्था सध्याही कार्यरत आहे.

दुसरी महत्त्वाची संस्था म्हणजे वक्तृत्वोत्तेजक सभा. या संस्थेच्या माध्यमातून समाजप्रबोधनासाठी १८७५मध्ये वसंत व्याख्यानमाला सुरू झाली. महाराष्ट्रातील ही आद्य व्याख्यानमाला होय. वसंत व्याख्यानमालेचा आदर्श घेऊन, महाराष्ट्रातील अनेक गावागावांत व्याख्यानमाला सुरू झाल्या. अशा व्याख्यानमालेतील व्याख्यानांमधून समाजजीवनात विचारांचे प्रबोधन घडले. पुण्यातील वसंत व्याख्यानमाला आजही सुरू आहे. दरवर्षी ती टिळक स्मारक मंदिराच्या आवारात होत असते. यामधून शेकडो विषयांवर, हजारो वक्त्यांनी आपले विचार मांडले. व्याख्यानमालेतून निरंतर विचार मंथन घडत आले आहे. न्यायमूर्ती रानडे यांच्या पुढाकारातून १८९४मध्ये ग्रंथोत्तेजक सभा या संस्थेची स्थापना झाली. ग्रंथकारांनी निर्माण केलेल्या ग्रंथांना प्रेरणा, प्रोत्साहन मिळावे, त्यातूनच चांगल्या ग्रंथांच्या निर्मितीला चालना मिळावी, यासाठी संस्थेची स्थापना करण्यात आली. आजही संस्था ग्रंथपुरस्कार देऊन चांगल्या ग्रंथांच्या निर्मितीसाठी उत्तेजन देत असते. संस्थेचे कार्यालय सदाशिव पेठेतील, टिळक विद्यापीठाच्या इमारतीसमोर आहे. संस्थेचे ग्रंथालय असून, संस्थेने अनेक ग्रंथांचे प्रकाशनही केले आहे. १८४८मध्ये पुण्यातील पहिले ग्रंथालय 'पुणे नगर वाचन मंदिर' या नावाने सुरू झाले. या संस्थेच्या स्थापनेतही न्यायमूर्ती रानडे यांचा पुढाकार होता. पुणे नगर वाचन मंदिर संस्थेचे ते पहिले अध्यक्ष होते. संस्थेची लक्ष्मी रस्त्यावर मोठी वास्तू असून, संस्थेमार्फत अनेक उपक्रम आयोजित केले जातात. याचबरोबर सर्वांत महत्त्वाची संस्था म्हणजे महाराष्ट्र साहित्य परिषद. या संस्थेची २७ मे १९०६ रोजी स्थापना झाली. साहित्यसम्राट न. चिं. केळकर व लोकमान्य टिळक यांच्या पुढाकारातून संस्थेची स्थापना झाली. ही संस्था अस्तित्वात आली त्याचे श्रेय ग्रंथकार संमेलनाला जाते. चौथ्या ग्रंथकार संमेलनात मसापच्या स्थापनेची घोषणा झाली. या ग्रंथकार संमेलनाची सुरुवात १८७८ मध्ये झाली. ११ मे १८७८ रोजी पुण्यात हिराबागेत पहिले ग्रंथकार संमेलन पार पडले. या संमेलनाचे अध्यक्ष न्यायमूर्ती

रानडे हे होते. हे संमेलन म्हणजे आजच्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची गंगोत्री होय.

मुंबईमध्ये १८६१मध्ये विष्णुशास्त्री पंडित यांनी विधवा विवाह उत्तेजक मंडळ सुरू केले होते. त्याप्रमाणे पुण्यात या कार्याची सुरुवात न्यायमूर्ती रानडे यांनी केली. विधवा विवाहाला उत्तेजन मिळावे, यासाठी 'इंदूप्रकाश'मधून त्यांनी लेखन केले. त्यांच्या प्रोत्साहनामुळे १८८९ मध्ये पुण्यात विधवा विवाह सोहळा पार पडला. या घटनेनंतर चारच वर्षांनी न्यायमूर्ती रानडे यांच्या पहिल्या पत्नीचे निधन झाले. वडिलांच्या आग्रहामुळे विधवेशी ते विवाह करू शकले नाहीत, त्यामुळे त्यांना टीकेला सामोरे जावे लागले. त्यांना बोलके सुधारक म्हणून टीका सहन करावी लागली. सार्वजनिक जीवनातील टीकेला त्यांनी आपल्या कार्यातूनच उत्तर दिले. आपले कार्य निरंतरपणे सुरू ठेवले. समाजातील जातिपाती, रूढी-परंपरा यांमधील बदलांमुळे समाजजीवन बदलून जाईल, असे अनेकांना वाटत होते. न्यायमूर्ती रानडे यांचा चौफेर अभ्यास असल्याने ते सर्वांगीण सुधारणावादाचे पुरस्कर्ते होते. सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक या सर्वच बाबतीत सुधारणा झाली पाहिजे. अशी त्यांची धारणा होती. ते अर्थशास्त्राचे अभ्यासाक होते. त्यांनी भारतीयांच्या अर्थशास्त्राची नव्याने मांडणी केली. सुधारणांचा विचार करताना, समाजजीवनाचा साकल्याने विचार झाला पाहिजे. अशी त्यांची भूमिका होती. त्यांच्या कार्याबाबत विवेचन करताना डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे आपले मत नोंदवतात. 'न्यायमूर्ती रानडे यांनी समाजकारणाची धुरा आपल्या खांद्यावर घेतल्यानंतर, समाजसुधारणेमागे निश्चित असे तत्त्वज्ञान उभे केले आणि लेख लिहून, व्याख्याने देऊन व विविध संस्था स्थापून त्या चळवळींना संघटित व प्रतिष्ठित रूप आणले.'

न्यायमूर्ती रानडे यांचे योगदान केवळ महाराष्ट्रापुरते नाही, तर संपूर्ण देशात स्वातंत्र्यपूर्व काळात जे वातावरण तयार झाले, जी वैचारिक भूमिका स्वातंत्र्य चळवळीच्या मागे तयार झाली. त्याचे मूळही त्यांच्यापर्यंत पोहोचते. स्वातंत्र्य चळवळीतील आघाडीचे आणि सर्वमान्य नेतृत्व म्हणजे महात्मा गांधी. गांधीजी गोपाळ कृष्ण गोखले यांना गुरू मानत, तर गोखले हे न्यायमूर्तींना गुरू मानत. गांधीजींच्या विचारांचे काही धागे हे न्यायमूर्ती रानडे यांच्याशी जोडले होते .

१९ व्या शतकाचा उत्तरार्ध न्यायमूर्ती रानडे यांच्या कार्याने आणि विचारांनी व्यापला होता. त्यांचे ते संस्थात्मक काम महाराष्ट्राच्या सामाजिक, वैचारिक जडणघडणीसाठी महत्त्वपूर्ण ठरले. त्यांच्या या कार्याची नोंद लोकमान्य टिळकांनी घेतली. टिळकांनी केसरीतील लेखात न्यायमूर्ती रानडे यांच्या थोरवीबद्दल वर्णन केले आहे. 'महाराष्ट्र म्हणजे त्यावेळी एक थंड गोळा होऊन पडला होता. त्या थंड गोळ्याला कोणत्या तऱ्हेने ऊब दिली असता, तो पुन्हा सजीव होईल व हात-पाय हलवू लागेल, याचा रात्रंदिवस एकसारखा विचार करून, अनेक दिशांनी, अनेक उपायांनी, अनेक रीतींनी त्यास पुन्हा जिवंत करण्याचे दुर्धर काम अंगावर घेऊन, त्याकरिता जीवापाड मेहनत जर कोणी केली असेल, तर ती प्रथमतः माधवरावांनीच केली.'

समाज जागृत करून, समाजाला दिशा देण्याचे काम न्यायमूर्ती रानडे यांनी केले. समाजसुधारण्याची चळवळ निरंतर चालू राहण्यासाठी त्यांनी जे संस्थात्मक कार्य उभे केले, यामधून त्यांचे दृष्टेपण दिसून येते. महाराष्ट्राच्या जडणघडणीतील त्यांचे हे कार्य मूलभूत आणि मोलाचे ठरले आहे.

श्रीकांत चौगुले
लेखक व निवेदक
संपर्क : ७५०७७७९३९३

संदर्भ :

१. भारतीय संस्कृती कोश, संपादक - पं. महादेवशास्त्री जोशी.
२. मराठी विश्वकोश - प्रथमावृत्ती.

असे होते
साताऱ्याचे ऐतिहासिक संमेलन

संदीप भानुदास तापकीर

९९वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सातारा नगरीमध्ये यशस्वीरीत्या संपन्न होऊनही दीर्घ काळ लोटला आहे.

सातारा येथे आजवर –

१९०५ – तिसरे

१९६२– ४४वे

१९९३– ६६वे

२०२६– ९९वे

अशी चार संमेलने झाली आहेत.

९९व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रसिद्ध कादंबरीकार विश्वास पाटील हे होते. ५० देखण्या चित्ररथांतून निघालेली ग्रंथदिंडी ही दीर्घ काळ स्मरणात राहणार आहे. या ग्रंथदिंडीतून मराठी संस्कृतीचे वैभवशाली दर्शन घडले.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी आणि स्वागताध्यक्ष ना. छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले या तिघांच्या नेतृत्वाखाली हे संमेलन १ ते ४ जानेवारी २०२६ या काळामध्ये शाहू स्टेडियममध्ये संपन्न झाले. राजाश्रय मिळालेले हे संमेलन अत्यंत भव्य-दिव्य झाले. वैविध्यपूर्ण परिसंवाद हे या संमेलनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य सांगता येईल. आजपर्यंत संमेलनाच्या व्यासपीठावरून भयकथेवर कधीही चर्चा झाली नव्हती, ती प्रथमच येथे झाली. अशा अनेक नावीन्यपूर्ण गोष्टी या संमेलनात आपल्याला पाहायला मिळाल्या.

१ जानेवारीला ध्वजारोहण होऊन संमेलनाला प्रारंभ झाला. ९८व्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा, लोकसाहित्याच्या अभ्यासक डॉ. तारा भवाळकर यांच्या हस्ते ग्रंथदिंडीचे उद्‌घाटन झाले. कविकट्टा, गझलकट्टा व प्रकाशन कट्टा ही तर आता प्रत्येक संमेलनातील हक्काची नि अनिवार्य ठिकाणे झाली आहेत. या प्रत्येक ठिकाणी प्रचंड गर्दी असते. नवोदितांना व्यासपीठ देणे यासाठी सुरू झालेले आहेत. या संमेलनात १३५ पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. पश्चिम महाराष्ट्र, कोकण, मराठवाडा आणि विदर्भ या सर्व ठिकाणच्या साहित्यिकांच्या ग्रंथांचे प्रकाशन येथे झाले. घनश्याम पाटील यांनी या प्रकाशन कट्ट्याचे नियोजन केले होते.

या संमेलनातले आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, साताऱ्यातील ज्येष्ठ साहित्यिकांचा सन्मान पहिल्या दिवशी करण्यात आला. माजी अध्यक्षांच्या हस्ते झालेला हा सन्मान दिग्गजांप्रती कृतज्ञता दाखवणारा

होता.

त्यानंतर डॉ. भावार्थ देखणे, अवधूत गांधी यांचा 'बहुरूपी भारूड' हा गाजलेला कार्यक्रम प्रचंड गर्दीत झाला. संमेलनातल्या चारही दिवशी रात्री वेगवेगळे कार्यक्रम ठेवण्यात आलेले होते. साहित्यिक कार्यक्रमांना तुरळक गर्दी आणि लोककलांच्या, मनोरंजनाच्या कार्यक्रमांना अद्‌भुत प्रतिसाद, असे चित्र होते.

खऱ्या अर्थाने २ जानेवारी रोजी उद्‌घाटनाच्या कार्यक्रमाने हे संमेलन अधिकृतरीत्या सुरू झाले. ज्ञानपीठ विजेत्या ज्येष्ठ लेखिका डॉ. मृदुला गर्ग यांचे उद्‌घाटनाचे भाषण विचार करणारे होते. त्यांनी दलित साहित्याबद्दल केलेले चिंतन हे आपल्या साहित्यिकांनी आवर्जून लक्षात घेतले पाहिजे. 'दलित साहित्य हा मराठी साहित्याचा आत्मा आहे. साहित्य क्षेत्रातील सर्वांत मोठी क्रांती म्हणजे दलित साहित्याची निर्मिती होय. भारतीय भाषांमध्ये सर्वांत पहिल्यांदा मराठी भाषेतच दलित साहित्य लिहिले गेले. मराठी दलित साहित्यातून इतर भाषिक साहित्यिकांनी दलित लेखनाची प्रेरणा घेत आपापल्या भाषांमध्ये साहित्याची निर्मिती केली,' असे डॉ. मृदुला गर्ग यांनी सांगितले. अध्यक्ष विश्वास पाटील यांचे दीर्घ भाषण अनेक गोष्टींचा आढावा घेणारे ठरले. 'माय मराठीच्या अस्तित्वाची लढाई सुरू आहे. ही लढाई प्रत्येकाच्या उंबरठ्यावर आली आहे. त्यामुळे वेळीच जागे व्हा. तुम्ही झेंडा कुणाचाही घ्या, पण त्याचा दांडा मराठीचा हवा,' हे आग्रहाचे प्रतिपादन करत विश्वास पाटील यांनी ३६ पैकी २० जिल्ह्यांच्या मुख्यालयामध्ये मराठी पुस्तक विक्रीचे दुकान नाही. तेथे तातडीने ग्रंथविक्री केंद्र सुरू करण्याचा मुद्दा मांडला. मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात महाराष्ट्रात फक्त मराठीच सक्तीचे राहील असे आश्वासन दिले. संमेलनाच्या उद्‌घाटनाच्या कार्यक्रमाला हयात असणाऱ्या सर्व माजी अध्यक्षांना निमंत्रण देण्यात आले. ही अत्यंत स्तुत्य गोष्ट प्रथमच घडली. खरं तर लेखकाचीसुद्धा जबाबदारी असते, की त्याने या महाकुंभात स्वतःहून सहभागी झाले पाहिजे. लेखकाला वाचक अशाच मेळ्यात भेटतो. नेहमीप्रमाणेच उद्‌घाटनाचा कार्यक्रम लांबला. खरं तर उद्‌घाटनाचे सत्र हे अत्यंत आखीव-रेखीव असले पाहिजे. अध्यक्षीय भाषणासाठी स्वतंत्र वेळ देणे गरजेचे आहे.

उद्‌घाटनाच्या कार्यक्रमानंतर तीन वेगवेगळ्या ठिकाणी तीन कार्यक्रम, असे नेहमीचे सूत्र सुरू झाले. मुख्य व्यासपीठावर अशोक नायगांवकर यांच्या अध्यक्षतेखाली निमंत्रितांचे कविसंमेलन झाले. यात ४० पेक्षा अधिक कवींनी सहभाग घेतला. मंडप क्रमांक दोनमध्ये 'जागतिक प्रकाशन व्यवहारात मराठी प्रकाशन व्यवहार कुठे आहे?' यावर परिचर्चा घेण्यात आली. यामध्ये रोहन चंपानेरकर, डॉ. मनोज कामत, राजीव श्रीखंडे, अमृता तांदळे व डॉ. शोभा साठे यांनी सहभाग घेतला. सर्वच वक्त्यांच्या मनोगतातून 'प्रकाशनाच्या कक्षा विस्तारण्याची गरज आहे. त्यासाठी पुस्तक निर्मितीशी संबंधित असणाऱ्या प्रत्येक घटकाने व्यावसायिक बंधने स्वीकारून एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे,' असा सूर निघाला. संदीप तापकीर यांनी यातील सहभागी तज्ज्ञांना नेमके प्रश्न विचारून या परिचर्चेला विषयकेंद्रित केले. यानंतर 'मराठी कोशवाङ्मय आणि विस्ताराच्या दिशा' हा परिसंवाद डॉ. राजा दीक्षित यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यामध्ये डॉ. साहेब खंदारे, डॉ. नीलिमा गुंडी, मांगीलाल राठोड, प्रमोद पाटील, अविनाश कोल्हे या तज्ज्ञांनी सहभाग घेतला. 'कोश हा केवळ माहितीचा साठा नसून, ते विचाराला आणि क्रांतीला चालना देतात. कोश वापरणे ही एक वृत्ती आणि शिस्त असते. ती एकदा लागली की कायम राहते. कोश कसा बघावा, हेसुद्धा अनेकांना माहीत नसते. कोश कपाटातून म्हणजे कोशातून बाहेर काढून लोकांपर्यंत पोहोचवले पाहिजेत,' असे स्पष्ट मत डॉ. राजा दीक्षित यांनी नोंदवले. तिसऱ्या ठिकाणी बालकुमार वाचक कट्ट्यावर 'संवाद बालकुमार वाचकांशी' या अंतर्गत

साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखक ल. म. कडू व एकनाथ आव्हाड यांनी बालकुमारांशी संवाद साधला. कविसंमेलनानंतर मुख्य व्यासपीठावर प्रशांत दामले यांच्या 'शिकायला गेलो एक' या नाटकाचा प्रयोग झाला. येथे तुडुंब गर्दी होती. अनेक साहित्यिकांना हे नाटक पाहण्याची इच्छा असूनदेखील पाहता आले नाही.

३ जानेवारी रोजी मुख्य मंडपात कथाकथनाच्या कार्यक्रमाने या दिवसाची सुरुवात झाली. यामध्ये राजेंद्र गहाळ, बाबा परीट, कल्पना देशपांडे, रवींद्र कोकरे, माधवी घारपुरे यांनी आपल्या कथा सादर केल्या. दैनंदिन जीवनातील साधे प्रसंग, मानवी स्वभावाचे पैलू आणि बदलत्या समाजवास्तवाचे दर्शन घडवणाऱ्या कथांनी रसिकांच्या मनाचा ठाव घेतला. आपल्याकडे द. मा. मिरासदार, शंकर पाटील, व्यंकटेश माडगूळकर अशी कथाकथनाची प्रदीर्घ परंपरा आहे. आजचे कथाकथनकार ही परंपरा जोमाने पुढे नेत आहेत. श्रोत्यांच्या अल्प प्रतिसादातच हे सत्र संपले. त्यानंतर डॉ. रणधीर शिंदे आणि डॉ. प्रवीण बांदेकर या दोन लेखक-समीक्षकांनी साहित्य अकादमी पुरस्कार मिळवलेल्या ज्येष्ठ कवयित्री अनुराधा पाटील यांची मुलाखत घेतली. 'साहित्य, समीक्षा या व्यवहारांतून प्रकट होणारे स्त्रीरूप हे पुरुषी नजरेने पाहिलेले आहे. वास्तवातही पुरुषी नजरेनेच पाहून स्त्रीला विशिष्ट चौकटीत, मर्यादेत अडकवणारी स्त्रीप्रतिमा घडवण्यात आली आहे. ही घडवलेली स्त्रीप्रतिमा, स्त्रीवाद तोडणे गरजेचे आहे, त्याशिवाय स्त्रीवाद मूळ स्वरूपात प्रकट होऊ शकणार नाही,' अशी आपली भूमिका आपल्या मुलाखतीतून अनुराधा पाटील यांनी मांडली.

दुपारच्या सत्रात 'उचल्या'कार लक्ष्मण गायकवाड व सुविद्या प्रकाशनाचे बाबुराव मैंदर्गीकर या दोघांचा सत्कार करण्यात आला. या सोहळ्यातील 'उचल्या'कारांचे भाषण हे कायम श्रोत्यांच्या लक्षात राहील. त्यांनी अत्यंत जहालपणे अन्यायाचा पाढा वाचला आणि वस्तुस्थिती कथन केली. 'भटके विमुक्त हेच छत्रपती शिवरायांचे खरे मावळे आहेत. महाराष्ट्रात आम्हाला अजूनही स्वातंत्र्य मिळाले नसल्याची खंत वाटते. स्वतंत्र महाराष्ट्रात आमच्यासाठी अजूनही वेगळी आर्थिक तरतूद केलेली नाही. ४७ जाती असलेल्या भटक्या विमुक्तांची लोकसंख्या चार कोटी असताना आम्हाला संविधानाच्या बाहेर का ठेवण्यात आले आहे? आमच्या सवलती का नाकारल्या आहेत? आम्ही काय गुन्हा केला आहे?' असे परखड सवाल लक्ष्मण गायकवाड यांनी उपस्थित केले. त्यानंतर अमोल पालेकर यांच्या 'ऐवज : एक स्मृतिबंध' या पुस्तकावर चर्चात्मक कार्यक्रम झाला. यात स्वत: लेखक, संध्या गोखले, वृंदा भार्गवे यांनी भाग घेतला. ती काही म्हणावी अशी रंगली नाही. आपल्यातील चुका तपासून पाहणे, हे जिवंतपणाचे लक्षण असल्याचे मत

अमोल पालेकर यांनी मांडले. 'काळे कपडे घातल्यावर लेखकाला संमेलनात प्रवेश नाकारणे धक्कादायक आहे. काळ्या रंगाला अनेक छटा आहेत. आपल्याला मूक निषेध खपवून घेता येत नसेल, तर आपण सर्वांनी सजगपणे या विरोधात उभे राहून प्रस्थापितांना प्रश्न विचारायला हवेत,' अशी आपली स्पष्ट भूमिका त्यांनी मांडली. यानंतर 'आजच्या मराठी समाजाची विचारभ्रष्टता आणि वैचारिक साहित्याची निर्मिती' या विषयावर परिसंवाद घेण्यात आला. नियोजित अध्यक्ष विनय हर्डीकर उपस्थित नव्हते. यशवंत पाटणे यांच्यासह सहभागी झालेल्या सर्वांनाच वेळ कमी पडला. हेरंब कुलकर्णी यांची मांडणी विचार करायला लावणारी होती.

मंडप क्रमांक दोनमध्ये प्रारंभी 'आजच्या मराठी साहित्यात भयकथा, रहस्यकथा आणि गूढकथा यांचा इतका दुष्काळ का आहे?' या विषयावर परिचर्चा झाली. अशा प्रकारचे साहित्य लिहिणारे अत्यंत महत्त्वाचे नि आघाडीचे लेखक प्रवीण टोकेकर, डॉ. गणेश मतकरी, हृषीकेश गुप्ते हे या परिचर्चेमध्ये सहभागी झाले होते. अशा महत्त्वाच्या विषयावर प्रथमच साहित्य संमेलनात चर्चा घेतली गेली. हे अत्यंत स्तुत्य मानावे लागेल. 'आकलन कमी असल्याने भयकथा, रहस्यकथा आणि गूढकथा या साहित्य प्रकाराला साहित्यव्यवहारात महत्त्व मिळालेले नाही,' असा सूर या परिसंवादात उमटला. 'स्त्रीचळवळीची पन्नास वर्षे: मागे वळून पाहताना' या विषयावर झालेला परिसंवाद अत्यंत महत्त्वाचा होता. यातील सर्वच सहभागकर्त्यांनी केलेली मांडणी चळवळीची दिशा आणि दशा स्पष्ट करणारी होती. यानंतर 'अभिजात दर्जानंतरची मराठी : संधी आणि आव्हाने' या विषयावरच्या परिचर्चेमध्ये श्रीधर लोणी, पी. विठ्ठल, डॉ. संदीप श्रोत्री इत्यादी लेखक सहभागी झाले होते. 'मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला असला, तरीदेखील ती जगण्याची भाषा होण्यासाठी तिला आधुनिकतेची जोड देण्याची गरज आहे,' असा सूर या परिसंवादात उमटला. या मंडपातील आजच्या दिवसातील तिन्ही विषय अत्यंत वेगळे होते; मात्र त्याला प्रतिसाद अत्यंत तुटपुंजा होता. मुख्य मंडपातही परिस्थिती काही वेगळी नव्हती. आपण केवळ साहित्य संमेलनाच्या उद्घाटनाला आणि समारोपालाच गर्दी करणार आहोत का, असा प्रश्न या निमित्ताने पडतो.

संवाद बालकुमार वाचकांशी या उपक्रमात साहित्य अकादमी पुरस्कार मिळालेल्या डॉ. संगीता बर्वे आणि राजीव तांबे हे लेखक उपस्थित होते. रात्री 'हास्यजत्रा' या सांस्कृतिक कार्यक्रमाला मात्र तुफान गर्दी होती; अगदी चेंगराचेंगरी होईपर्यंत परिस्थिती निर्माण झाली होती. गर्दी नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांचा बंदोबस्त घ्यावा लागला.

४ जानेवारी या समारोपाच्या दिवशी मुख्य मंडपात शाहू पाटोळे यांच्या 'अन्न हे पूर्णब्रह्म' या पुस्तकावर झालेल्या चर्चेत त्यांच्यासह राहुल कोसंबी, भूषण कोरगावकर, डॉ. मिलिंद कसबे सहभागी झाले होते. या संमेलनात पुस्तकांवर चर्चा होणे आणि त्यात स्वतः लेखक उपस्थित असणे, हा एक वेगळा पायंडा पाडण्यात आला. शाहू पाटोळे यांनी खालच्या समाजातील लोकांच्या दैनंदिन जीवनातील जेवणावरचे आपले म्हणणे अगदी सोदाहरण देऊन स्पष्ट केले. खरंच उच्चवर्णीयांना असे दाहक वास्तव ऐकणे आणि पचवणे प्रचंड अवघड आहे. या पुस्तकचर्चेनंतर संमेलनातील अत्यंत महत्त्वाचा कार्यक्रम लोकसत्ताचे संपादक गिरीश कुबेर यांची मुलाखत प्रसन्न जोशी आणि किशोर बेडकीहाळ यांनी घेतली. कुबेरांनी अनेक विषयांवरची आपली स्पष्ट मते व्यक्त केली. ही मुलाखत ऐकणाऱ्या प्रत्येक श्रोत्याला काही ना काही निश्चितच गवसले असेल.

या मुलाखतीनंतर श्रीकांत देशमुख या प्रसिद्ध कवींच्या अध्यक्षतेखाली निमंत्रित कवींचे कविसंमेलन झाले. महाराष्ट्रात प्रत्येक गावामध्ये कवी आहेत; म्हणूनच निमंत्रित कवींचे कविसंमेलनसुद्धा आपल्याला दोन-दोन वेळा घ्यावे लागते. त्याचवेळी तीन दिवस अखंडपणे नवोदित कविसंमेलन चालूच

असते.

मंडप क्रमांक दोनमध्ये प्रारंभी 'बदलत्या ग्रामीण वास्तवाचे चित्रण आजच्या मराठी साहित्यात का दिसत नाही?' या विषयावर परिसंवाद झाला. चंद्रकांत दळवी यांसारखे अधिकारी यात सहभागी झाले होते. या परिसंवादानंतर येथेच 'संवाद लक्षवेधी कादंबरीकारांशी'मध्ये सदानंद देशमुख, कृष्णात खोत, अभिराम भडकमकर, नीरजा इत्यादी कादंबरीकारांशी डॉ. राजेंद्र माने आणि त्यांच्या सहकाऱ्याने संवाद साधला.

यानंतर अर्थातच मुख्य मंडपात समारोप सत्र झाले. नेहमीच्या पद्धतीने येथे १७ ठराव करण्यात आले. त्यामध्ये प्रामुख्याने हिंदी सक्तीला विरोध, आंतरराष्ट्रीय मराठी विद्यापीठाची निर्मिती करावी, सीमाभाग महाराष्ट्रात समाविष्ट करावा, बंद शाळा पुन्हा सुरू कराव्यात, अभिजात मराठीला केंद्राने लाभ द्यावा, गोव्यात राजभाषा म्हणून मराठीला दर्जा देण्यात यावा, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना मरणोत्तर भारतरत्न देण्यात यावा, हे महत्त्वाचे ठराव होते. ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त लेखक रघुवीर चौधरी यांचे भाषण हे या सत्राचे प्रमुख आकर्षण होते. समारोपाच्या व्यासपीठावरून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माय मराठीसाठी कदापिही निधी कमी पडू देणार नसल्याचे घोषित केले. चौथ्या दिवशीदेखील महाराष्ट्रातील लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीचे दर्शन घडविणारा 'फोक आख्यान' हा सांस्कृतिक कार्यक्रम प्रचंड गर्दीमध्ये संपन्न झाला. या कार्यक्रमाने संमेलनाची सांगता झाली.

या संमेलनात वेगवेगळ्या विषयांवर परिसंवाद, परिचर्चा यांचे आयोजन केले होते. अनेक लेखक, कवींना प्रथमच या निमित्ताने संमेलनासारख्या महत्त्वाच्या ठिकाणी संधी मिळाली. सांस्कृतिक कार्यक्रमांना गर्दीचा महापूर आणि साहित्यिक कार्यक्रमांना शंभर लोकसुद्धा उपस्थित नसणे, ही खूप मोठी शोकांतिका यानिमित्ताने प्रकर्षाने सर्वांच्या नजरेत आली. यावर तोडगा काढणे गरजेचे आहे. या संमेलनात प्रकाशित झालेली 'अटकेपार' ही स्मरणिका त्या वेळी कोणालाच उपलब्ध झाली नाही. संमेलन सुरू होण्यापूर्वीच ती तयार झालेली असणे गरजेचे होते.

आजपर्यंतच्या संमेलनात प्रकाशकांना कायमच दुय्यम वागणूक मिळत आली होती. या संमेलनात मात्र प्रकाशकांच्या संदर्भात एक परिचर्चा ठेवली गेली आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे प्रकाशकांचे स्टॉल हे संमेलनाला लागून असल्यामुळे संमेलनात येणारा रसिकवर्ग आवर्जून पुस्तक दालनांमध्ये जात राहिला. परिणामी, या चार दिवसांमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये पुस्तकांची विक्री झाली, असे सांगण्यात आले आहे.

कथाकार, कादंबरीकार व कवी अशा सर्वांनाच या संमेलनात व्यासपीठावर स्थान मिळाले. सातारानगरीत झालेला हा साहित्य महोत्सव खरंच अविस्मरणीय झाला, असे म्हणायला हरकत नाही. या संमेलनात ४००पेक्षा अधिक नवोदित कवींनी सहभाग नोंदवला. दरवर्षी ही संख्या वाढतेच आहे.

आता आपण शतकमहोत्सवी संमेलनाकडे वाटचाल करत आहोत. आजपर्यंत झालेल्या चुका टाळून हे संमेलन अधिकाधिक लोकाभिमुख कसे होईल, हे पाहणे गरजेचे आहे. त्यासाठी सर्वांनीच एकजुटीने प्रयत्न करणे गरजेचे आहे.

■■

संदीप भानुदास तापकीर
इतिहास अभ्यासक, लेखक व संपादक
संपर्क : ९८५०१७९४२१/९९२१९४८५४१
sandeeptapkir@rediffmail.com

उत्साहात साजरा झालेला वर्धापन दिन सोहळा

अंजली कुलकर्णी
डॉ. आशुतोष जावडेकर

२६ मे, २०२६ रोजी पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरात महाराष्ट्र साहित्य परिषदेचा १२१ वा वर्धापन दिन, जीवनगौरव पुरस्कार, वार्षिक ग्रंथ आणि ग्रंथकार पुरस्कार प्रदान सोहळा अत्यंत देखणेपणाने संपन्न झाला.

दुपारी तीन वाजल्यापासूनच बालगंधर्व रंगमंदिर साहित्य, कला, संस्कृतीच्या क्षेत्रांतील अनेक दिग्गजांच्या उपस्थितीने फुलून गेले होते. बाहेर घातलेल्या सुंदर रांगोळ्या, प्रसन्न चित्ताने स्वागत करणारे परिषदेचे पदाधिकारी, सेल्फी पॉईंट, अभिरुची संपन्न सजावट, यामुळे सोहळ्याचा सुंदर माहोल निर्माण झाला होता. संपूर्ण बालगंधर्व रंगमंदिर साहित्यिक आणि रसिकांनी खचाखच भरले होते.

या सुंदर समारंभाचे अध्यक्षस्थान महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष श्री. योगेश सोमण यांनी भूषविले, तर प्रमुख पाहुणेपदी ज्येष्ठ गायक पंडित सत्यशील देशपांडे, माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी, प्रसिद्ध अभिनेते, लेखक ऋषिकेश जोशी उपस्थित होते.

या समारंभात मराठीतील ख्यातनाम लेखिका **प्रतिभा रानडे** यांना **डॉ. अंजली सोमण पुरस्कृत मसाप जीवनगौरव** पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. **डॉ. श्रीकृष्ण काकडे** यांचा **डॉ. भीमराव कुलकर्णी कार्यकर्ता पुरस्काराने** गौरव करण्यात आला. प्रतिभा रानडे यांच्याविषयी असणाऱ्या परम आदरामुळे त्यांना पुरस्कार प्रदान करण्याच्या क्षणी संपूर्ण सभागृहातील मान्यवरांनी उत्स्फूर्तपणे उभे राहून त्यांना मानवंदना दिली.

याप्रसंगी डॉ. भीमराव कुलकर्णी कार्यकर्ता पुरस्काराचे मानकरी डॉ. श्रीकृष्ण काकडे यांनी हा मानाचा पुरस्कार स्वीकारला. उत्कृष्ट कार्य करणाऱ्या मसापच्या विविध शाखांना आणि कार्यकर्त्यांना शाखा व कार्यकर्ता पुरस्कार प्रदान करण्यात आले. त्यामध्ये राजा फडणीस पुरस्कृत उत्कृष्ट मसाप शाखा करंडक मसाप शाखा गुहागर यांना देण्यात आला. मसाप उत्कृष्ट कार्यकर्ता पुरस्कार श्री. दिनेश देशमुख – आटपाडी जिल्हा सांगली आणि श्रीमती अश्विनी चव्हाण – सोलापूर यांना प्राप्त झाला. डॉ. बाबुराव

लाखे स्मृती वैशिष्ट्यपूर्ण शाखा पुरस्कार मसाप शाखा दक्षिण सोलापूरला मिळाला. तसेच म. श्री. दीक्षित स्मृतिप्रीत्यर्थ मसाप स्नेहबंध पुरस्कार देऊन श्री. अशोक सुलाखे यांना सन्मानित करण्यात आले.

त्याचप्रमाणे या सोहळ्यात विविध वाङ्मय प्रकारांमध्ये आपल्या प्रतिभेचा ठसा उमटवणाऱ्या महाराष्ट्राच्या विविध प्रांतांमधून आलेल्या लेखकांना याप्रसंगी विविध पुरस्कारांनी गौरवण्यात आले.

या कार्यक्रमांमध्ये राजेंद्र खेर, प्रवीण दवणे, अशोक कोतवाल, संतोष पद्माकर पवार, आनंद हर्डीकर, श्रीनिवास भणगे, श्रीराम पवार, डॉ. सुरेश सावंत, मीना वैशंपायन, दिलीप कुलकर्णी, शुचिता नांदापूरकर-फडके, मृणालिनी चितळे, सुरेश वांदिले, नीलम माणगावे आणि आनंद देशमुख यांना विशेष ग्रंथकार पुरस्काराने गौरविण्यात आले आणि विविध वार्षिक ग्रंथ पुरस्कारांचे मानकरी होते- पृथ्वीराज तौर, स्वाती काटे, शर्मिला फडके, डॉ. अनिरुद्ध वझलवार, सुनील देशपांडे, डॉ. सतीश बडवे, राजीव नंदकर, संतोष शिंत्रे, डॉ. अरुण गद्रे, किशोर रिठे, डॉ. प्रमोद मुनघाटे, सूरज चौगुले, कल्पना दुधाळ, डॉ. वसुधा सहस्रबुद्धे, अप्पासाहेब खोत, विक्रम भागवत, संतोष नागो शिंदे, डॉ. कल्याणी हर्डीकर, अभिषेक धनगर, संगीता अरबुने, उपेंद्र कुलकर्णी, डॉ. रमेश रावळकर, डॉ. प्रकाश जाधव, डॉ. चंद्रशेखर फणसळकर, स्टीफन परेरा, राजीव जोशी, दादासाहेब आणि विद्या तडवळकर, श्याम जोशी, गोपाळ जोशी, डॉ. स्वाती महाळंक, राजेंद्र ठाकूर देसाई, रघुनंदन गोखले, निरंजन मेढेकर, राजेंद्र भट, डॉ. अस्मिता हवालदार, शुभंकर कुलकर्णी, मानसी संजय शेठमांद्रेकर, संजीव शिवाजी कांबळे.

या विशेष ग्रंथ पुरस्कारांची दोन-तीन वैशिष्ट्ये अशी सांगता येतील, की या लेखकांमध्ये डॉ. कल्याणी हर्डीकर यांच्यासारख्या ज्येष्ठ साहित्यिकांपासून संतोष नागो शिंदे, अभिषेक धनगर यासारख्या मराठी साहित्यात नव्याने मुशाफिरी करणाऱ्या लेखकांचा समावेश होता. दुसरे म्हणजे हे सर्व लेखक महाराष्ट्राच्या विदर्भ, मराठवाडा,

खानदेश, पश्चिम महाराष्ट्र आणि अगदी गोव्यापर्यंत अशा विविध भागांमधून आलेले होते. तसेच मान्यवर प्रकाशन संस्थांपासून नव्याने प्रकाशन व्यवसायात उतरलेल्या अनेक प्रकाशन संस्थांच्या पुस्तकांचा या पुरस्कारांमध्ये समावेश होता.

या समारंभात डॉ प्रतिभा रानडे यांचे मनोगत दीपाली दातार यांनी वाचून दाखवले. प्रमुख पाहुणे अविनाश धर्माधिकारी, पंडित सत्यशील देशपांडे आणि ऋषिकेश जोशी यांनी आपली अंतर्मुख करणारी मनोगते मांडली. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण यांनी अध्यक्षीय समारोप करताना पुण्यामध्ये होणाऱ्या १०० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची संकल्पना सांगितली. या संमेलनासाठी पुणे पुस्तक महोत्सवाचे आयोजन करणारी 'समर्थ युवा फाउंडेशन' ही सहसंयोजक संस्था असेल आणि हे संमेलन दिमाखदारपणे करण्यात येईल, असे सांगितले.

या उत्तरोत्तर रंगत गेलेल्या समारंभाचे प्रास्ताविक प्रमुख कार्यवाह डॉ. स्वाती महाळंक यांनी नेमक्या शब्दांमध्ये मांडले. कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर यांनी अविनाश धर्माधिकारी यांची ओळख करून दिली, तर कार्यवाह प्रसाद मिरासदार यांनी आभार मानले.

वास्तविक पाहता या नवनिर्वाचित कार्यकारिणीला निवडणुकांमुळे काम सुरू करण्यास कमी अवधी मिळाला; परंतु उत्तम नियोजन, उत्तम टीमवर्क आणि मुख्य म्हणजे परीक्षकांनी दिलेली चांगली साथ यामुळे हा कार्यक्रम दर्जेदारपणे पार पडला.

अध्यक्ष योगेश सोमण आणि प्रमुख कार्यवाह डॉ. स्वाती महाळंक, कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर, सुनील महाजन यांच्या उत्तम मार्गदर्शनामुळे नियोजनात शिस्तबद्धता आणि नीटनेटकेपण होते. या सोहळ्याला पुणे शहरातील अनेक साहित्यिक, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अनेक देणगीदार, परीक्षक वृंद, पत्रकार, आणि माध्यम प्रतिनिधी उपस्थित होते. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या अनेक शाखांचे पदाधिकारी आणि जिल्हाप्रमुख आवर्जून उपस्थित होते.

कार्यक्रमाला उपस्थित असणाऱ्या अनेक मान्यवर साहित्यिकांनी बालगंधर्व रंगमंदिरासारख्या ठिकाणी कार्यक्रम घेतला, याचे कौतुक तर केलेच, परंतु सेल्फी पॉईंट, समारंभासाठी आलेल्या ज्येष्ठ साहित्यिकांचे, पुरस्कार प्राप्त साहित्यिकांचे घेतले गेलेले बाईट्स, सन्मानाने त्यांचे केलेले आदरातिथ्य याची प्रशंसा केली. त्याचबरोबर पुरस्कारांच्या सगळ्या मानकऱ्यांच्या निवडीचे, कार्यक्रमाच्या संयोजनाचे, कार्यवाह अंजली कुलकर्णी आणि डॉ. आशुतोष जावडेकर यांच्या सूत्रसंचालनाचे चांगल्या शब्दांमध्ये कौतुक केले गेले, तेव्हा दोन महिने घेतलेल्या अपार कष्टांचे चीज झाले, अशीच कार्यकारिणीच्या सर्व पदाधिकाऱ्यांची भावना होती.

■■

अंजली कुलकर्णी

कार्यवाह, वार्षिक ग्रंथ आणि ग्रंथकार पुरस्कार विभाग

डॉ. आशुतोष जावडेकर

कार्यवाह, वर्धापनदिन पारितोषिके विभाग

इतिहासकार डॉ. जयसिंगराव पवार

प्रा. डॉ. गणेश राऊत

महाराष्ट्रातील एक नामवंत इतिहासकार डॉ. जयसिंगराव पवार यांचे नुकतेच निधन झाले. 'पंचगंगेच्या तीरावरून' या आत्मचरित्रातून त्यांचे एक वेगळेच दर्शन मला घडले. ते वाचकांना घडावे म्हणून हा लेख लिहिला आहे. इतिहासकार म्हणून त्यांचे कर्तृत्व अतिशय मोठे आहे. तो भाग वाचकांना परिचित असल्यामुळे येथे घेतलेला नाही. ही या लेखाची मर्यादा आहे.

'पंचगंगेच्या तीरावरून' हे डॉक्टर जयसिंगराव पवार यांचे आत्मचरित्र जानेवारी २६ मध्ये प्रसिद्ध झाले. या आत्मचरित्रामध्ये ते पंचगंगे संदर्भात म्हणतात, 'मीही आमच्या पंचगंगा नदीस आपली आई मानतो. तिच्या अंगाखांद्यावर खेळतच मी लहानाचा मोठा झालो. तिच्या चवदार पाण्यावर व कसदार मातीवर माझा पिंड पोसला. उत्तरेतील गंगेइतकीच आमची पंचगंगा आम्हास पवित्र वाटते. पंचगंगेच्या ऐतिहासिक तीरावर मी उभा आहे, माझ्या डोळ्यांसमोर माझ्या जीवनाबरोबर कोल्हापूरचा, महाराष्ट्राचा तसेच देशाचाही चलत-चित्रपट सरकतो आहे. पंचगंगेच्या पाण्यावर जसा माझा पिंड पोस पोसला, तशी शाहूरायांच्या विचारांवरही त्याची जडणघडण झाली आहे. त्या अर्थाने मी स्वतःला शाहू प्रॉडक्ट समजतो.'

राजर्षी शाहू महाराज आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या संदर्भात ते म्हणतात, 'समाजात जेव्हा माझ्या कामाबद्दल मला सन्मानदर्शक पुरस्कार देण्यात आले, त्या त्या वेळी मी हे पुरस्कार कर्मवीरांच्या व राजर्षी यांच्या स्मृतीला अर्पण केले आहेत. त्यात औपचारिकपणाचा लवलेशही नव्हता. खरोखरच या विभूती होऊन गेल्या नसत्या, तर माझ्यासारख्या कोरडवाहू जमीन असणाऱ्या गरीब शेतकऱ्याच्या मुलाला उच्च शिक्षण घेता आले नसते. आज मी जो आहे, तो या दोन महापुरुषांमुळे आहे. मीच नव्हे तर माझ्यासारखी लाखो मराठी मुले-मुली त्यांच्यामुळे



उच्च विद्याविभूषित झाली. त्यांच्या पुढच्या दहा पिढ्यांचा उद्धार झाला.'

सत्यशोधक विचारांबद्दल ते म्हणतात, 'आज प्रांजळपणे कबूल करावयास हवे, की आज जे माझे बहुजनवादी किंवा सत्यशोधकी विचार आहेत, ते माझ्या ऐन तारुण्याच्या काळात माझ्यात उत्पन्न झाले नव्हते. जेव्हा मी शाहूमहाराजांच्या चरित्राकडे वळलो आणि मी फुले-आंबेडकर वाचायला सुरुवात केली, तेव्हा मला समजून चुकले, की आतापर्यंत मी ज्या मार्गावरून प्रवास केला, तो मार्ग मध्ययुगीन विचारांनी व परंपरांनी ग्रस्त झालेला होता. शेकडो वर्षे आमचे बापजादे त्या मार्गावरून जात राहिले. मीही त्या वरूनच चाललो आहे. हे भान मला फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारांनी आणून दिले आणि हळूहळू मी सत्यशोधकी विचाराने भारावून जाऊ लागलो. तुकोबाराय, गाडगे महाराज, तुकडोजी महाराज यांचे तत्त्वज्ञान मला आवडू लागले. त्याचे मनन-चिंतन मी करू लागलो. 'सत्य-असत्याशी मन केले ग्वाही मानियले नाही बहुमता' हा तुकाराम महाराजांचा बुद्धिप्रामाण्यवाद पुढे ठेवून मी वाटचाल करू लागलो. ती आजतागात चालू आहे.'

गो. नी. दांडेकरांनी जयसिंगरावांच्या संशोधन कार्याचा गौरव करताना म्हटले आहे, की मराठी शाहीतील पराक्रमी व्यक्तींची चरित्रे लिहून जयसिंगराव पवारांनी एक गोष्ट केली आहे, ती म्हणजे ते आपल्या पूर्वजांच्या ऋणातून मुक्त झाले आहेत... आम्हा सर्वांवर त्यांनी अत्यंत मोठा उपकार करून ठेवला आहे आणि तेही एका आदर्श इतिहासकाराला साजेशी चरित्रे त्यांनी लिहिलेली आहेत.

अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद आणि महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी या दोन्ही संस्थांची स्थापना १९९१-९२ मध्ये झाली. या दोन्ही संस्थांच्या स्थापनेत जयसिंगराव यांनी पुढाकार घेतला. इतिहास परिषदेचे ते पहिले संस्थापक अध्यक्ष होते आणि महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनीचे संस्थापक संचालक म्हणून त्यांनी आयुष्याच्या अखेरीपर्यंत काम पाहिले. परिषद आणि प्रबोधिनीची स्थापना जयसिंगरावांनी केली, तेव्हा त्यांचे विद्यापीठातील ज्येष्ठ सहकारी स. शं. देसाई त्यांना म्हणाले, ''संस्था टिकवून ठेवणे हे अत्यंत जिकिरीचे काम आहे. दाक्षिणात्य लोक, विशेष करून महाराष्ट्रीय लोक संस्था स्थापन करण्यात नेहमीच पुढे असतात; परंतु त्या टिकून मात्र राहत नाहीत. देसाईंच्या इशाऱ्याचे विस्मरण जयसिंगरावांनी कधीही होऊ दिले नाही. परिषदेची जवळपास ३२ अधिवेशने त्यांनी महाराष्ट्रात ठिकठिकाणी यशस्वीपणे पार पाडली. प्रबोधिनीचे कार्य जोमात सुरू केले. वीस ग्रंथांचे प्रकाशन केले. २००० पानांचा, पाच खंडांचा, राजर्षी शाहू चरित्रग्रंथ ही त्यांची मोठी कामगिरी. हेच चरित्र देशी-विदेशी २५ भाषांत नेण्याचा संकल्प त्यांनी केला. मराठी, कन्नड, कोंकणी, तेलगू, उर्दू, इंग्रजी, जर्मन, रशियन आणि इटालियन भाषांमध्ये राजर्षी यांचे चरित्र त्यांनी अनुवादित करवून घेतले. ही प्रबोधिनीची अत्यंत मुलखावेगळी कामगिरी होय.

आत्मचरित्र कोणी व का लिहावे? या संदर्भात जयसिंगराव लिहितात, माझ्या आत्मचरित्राचे लिखाण गेली चार-पाच वर्षे चालू आहे. या प्रस्तावना, लेखनाच्या रूपाने त्याचा समारोप होत आहे, याचे

मला मनस्वी समाधान वाटत आहे. आत्मचरित्र कोणी लिहावे? मला वाटते ज्या व्यक्तीजवळ समाजाला सांगण्यासारखे काही असेल, ज्या व्यक्तीने समाजाचे ऋण फेडण्यासाठी काही सेवा केली असेल, ज्या व्यक्तीच्या जीवनापासून इतरांना काही शिकता येण्यासारखे असते, त्यांनी आत्मचरित्र अवश्य लिहिले पाहिजे. आत्मचरित्र म्हणजे व्यक्तीच्या जीवनाबरोबर त्यात समाजजीवनाचेही प्रतिबिंब उमटले पाहिजे. व्यक्ती ही समाजजीवनापासून वेगळी करता येत नाही. ती समाजाच्या वाटचालीत सहभागी असते. तरीपण ती एक स्वतःचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व घडवत असते. दुसऱ्या शब्दांत कोणतेही आत्मचरित्र हे व्यक्तीचे चरित्र व समाजाचे चरित्र यांचा समतोल सांभाळत असते आणि म्हणूनच ज्याने समाजासाठी काही योगदान दिले असेल, अशा व्यक्तीचे आत्मचरित्र हे समाजाच्या इतिहासाचे एक महत्त्वाचे साधन बनते. त्याने लिहिले पाहिजे, या मताचा मी आहे.

इतिहासकार जयसिंगराव पवार यांची महाराष्ट्राला 'अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद' आणि 'महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी' या दोन संस्थांची देणगी होय. १९६५ मध्ये ज्येष्ठ इतिहास संशोधक वा. सी. बेंद्रे यांनी महाराष्ट्र इतिहास परिषद नावाची संस्था स्थापन केली होती. पुढे बेंद्रे वयोमानानुसार थकत गेल्यामुळे या परिषदेचे काम थंडावले. १९८६ मध्ये सोलापूरच्या दयानंद महाविद्यालयातील इतिहास विभागप्रमुख प्राध्यापक गजानन भिडे यांनी महाराष्ट्र इतिहास परिषदेचे आयोजन केले. येथे चर्चा झाली आणि इतिहास संशोधनाविषयी काही तरी कायमस्वरूपी यंत्रणा उभी करावी असे ठरले. महाराष्ट्राच्या इतिहासाचे शास्त्रशुद्ध संशोधन आणि लेखन व्हावे हे उद्देश समोर ठेवून अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद स्थापन झाली. तत्कालीन पुणे विद्यापीठाचे (आताचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) के. एन. चिटणीस यांची अध्यक्षपदी निवड झाली. उपाध्यक्षपदी डॉक्टर जयसिंगराव पवार आणि महाराष्ट्र शासनाचे पुरालेखागार विभागाचे भास्कर धाटावकर यांची कार्यवाह म्हणून निवड झाली. एक जुलै १९९१ रोजी मुंबई येथे अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेची नोंदणी झाली.

परिषदेची काही महत्त्वाची उद्दिष्टे म्हणजे महाराष्ट्राच्या इतिहासाच्या शास्त्रशुद्ध संशोधनास व लेखनास सर्वतोपरी मदत करणे, महाराष्ट्राच्या इतिहासातील विकृती व गैरसमज दूर करणे, दरवर्षी जानेवारी– फेब्रुवारीमध्ये अधिवेशन भरविणे, इतिहास संशोधन व लेखनकार्यासाठी स्वतंत्र निधी जमविणे, जनमानसात इतिहासाची आवड निर्माण करणे इत्यादी. पहिली दोन अधिवेशने झाल्यानंतर पवार हे परिषदेचे अध्यक्ष झाले. त्यांनी परिषदेचे अधिवेशन दरवर्षी भरेल यावर भर दिला. अधिवेशनात वाचलेल्या निबंधांची छाननी होऊन ते पुढच्या अधिवेशनात शोध निबंध संग्रहरूपाने प्रसिद्ध करण्यासाठी आम्ही बांधील राहू, असे जाहीर केले.







यासाठी त्यांनीच कोल्हापुरात स्थापन केलेल्या 'महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी' संस्थेकडून हा पहिला निबंधसंग्रह प्रसिद्ध होईल असे सांगितले. जयसिंगराव पवार यांनी १९९४ चे अधिवेशन कोल्हापूरला घेतले. हे अधिवेशन इतिहासप्रेमी श्री छत्रपती शहाजी महाराजांच्या स्मृत्यर्थ भरविण्यात आले. या अधिवेशनात जे शोधनिबंध वाचण्यात आले, ते पुढे 'श्री छत्रपती शहाजी स्मृतिग्रंथ' या नावाने छापण्यात आले. अधिवेशनाचे अध्यक्ष स. मा. गर्गे होते. या अधिवेशनाला ३०० प्रतिनिधी उपस्थित होते. या परिषदेला उपस्थित असणाऱ्या सर्व प्राध्यापकांना करवीर इतिहासाच्या संदर्भातील पुस्तके भेट देण्यात आली. सर्व खर्च वजा जाता या अधिवेशनातून १६ हजार रुपये परिषदेच्या बँक खात्यात जमा झाले. हे अर्थातच पवार यांच्या कुशल व्यवस्थापनाचे यश होते. परिषदेचे अध्यक्ष या नात्याने जयसिंगराव पवार यांनी लिहिले आहे, की 'परिषदेचे हे व्यासपीठ इतिहास संशोधक घडविणारी प्रशाला असून, इथे नव्या संशोधकास परिषदेतील जाणत्या संशोधकांचे मार्गदर्शन मिळतं, तसंच इथे सादर होणारे शोधनिबंध नेमाने पुढील वर्षीच्या अधिवेशनात प्रसिद्ध केले जातात. त्यामुळे तरुण अभ्यासकास त्याने केलेल्या संशोधनाची फलश्रुती पाहून अधिकच प्रोत्साहन मिळतं.'

तीन वर्षे परिषदेचे अध्यक्षपद भूषवल्यानंतर पवार यांनी लोकशाही संकेतानुसार स्वतःच्या ऐवजी प्र. न. देशपांडे (तत्कालीन राजवाडे संशोधन मंदिर- धुळे याचे चिटणीस) यांचे नाव अध्यक्षपदासाठी सुचविले आणि स्वतः ते सल्लागार मंडळाचे सदस्य झाले. हीच पद्धती पुढे चालू राहिली. आजवर परिषदेच्या अध्यक्षांच्या निवडणुका या बिनविरोध झालेल्या आहेत. मोराणे, अलिबाग, कोल्हापूर, सगरोळी, उदगीर, अमरावती, यवतमाळ, पैठण, तेर, चांदवड, सातारा, अंबरनाथ, भुसावळ, बारामती, चिंचणी-तारापूर, श्रीगोंदा, सोलापूर, वारणानगर, नांदेड, इंदापूर, भाईंदर, पाथर्डी, शिरूर, कडा, नेवासे, यवतमाळ इत्यादी ठिकाणी ही अधिवेशने झाली. परिषदेच्या वतीने 'इतिहासभूषण वा. सी. बेंद्रे पुरस्कार', 'पंडित सेतू माधवराव पगडी पुरस्कार', 'इतिहास संशोधक डॉक्टर आप्पासाहेब पवार पुरस्कार' सुरू करण्यात आले. ज्यांच्याकडून आपण प्रेरणा घेतली आणि ज्यांच्याकडे आपण इतिहास संशोधनाचे धडे गिरविले, त्या सर्वांच्या नावाने हे पुरस्कार पवार यांनी सुरू केले.

१९६८-६९ मध्ये कोल्हापुरात इतिहास संशोधनाला प्राधान्य देणारी एखादी संस्था हवी म्हणून पवार यांनी 'करवीर इतिहास संशोधक मंडळ' या नावाची संस्था प्राध्यापक आनंद वैराट, शेखरवाली, श्रीकांत चौगुले यांच्या सहकार्याने तयार केली होती. त्याचे प्रमुख इतिहास संशोधक मु. गो. गळवणी होते. सेनापती धनाजी जाधव यांच्या २६८व्या पुण्यतिथीच्या कार्यक्रमापासून त्यांनी आपल्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली होती. पुढे १९९२ मध्ये 'महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी-कोल्हापूर' या नावाने संस्था कोल्हापूरच्या चॅरिटी कमिशनरच्या ऑफिसमध्ये रजिस्टर करण्यात आली. त्याचे चीफ पेट्रन म्हणून श्री शाहू महाराज होते. आमदार श्रीपतराव शिंदे अध्यक्ष, प्राध्यापक रणजीत शिंदे उपाध्यक्ष होते. पवार स्वतः मॅनेजिंग ट्रस्टी व संचालक होते. या संस्थेला सल्ला देण्यासाठी महाराष्ट्रातील नामवंत विद्वानांचे सल्लागार मंडळ स्थापन करण्यात आले. पंडित सेतू माधवराव पगडी, तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, डॉक्टर रा. चिं. ढेरे, एन. डी. पाटील इत्यादी मोठ्या लोकांचा समावेश या सल्लागार मंडळामध्ये होता. संस्थेच्या घटनेत १८ उद्दिष्टे नमूद केलेली होती. त्यांपैकी महत्त्वाची पुढीलप्रमाणे-

१. महाराष्ट्राच्या इतिहासाबद्दल असणारे अज्ञान व अनास्था दूर करून समाजात इतिहास प्रेम, राष्ट्र प्रेम वाढीस लावणे, त्यासाठी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, राजकीय, सामाजिक व आर्थिक इतिहासाच्या

संशोधनास चालना देणे.
२. तरुण अभ्यासक व संशोधक यांना त्यांच्या कार्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे.
३. छ. शिवाजी महाराजांच्या जीवनकार्याचे संशोधन करणे. मराठ्यांच्या इतिहासाचे संशोधन, पुनर्लेखन व त्याचा प्रसार करणे.
४. महाराष्ट्रातील समाजसुधारणा चळवळीचा अभ्यास व संशोधन करणे, अशा चळवळीची साधनसामग्री व सिद्ध इतिहास प्रकाशित करणे.
५. म. जोतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, महर्षी वि. रा. शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादी बहुजन समाजसुधारकांच्या चरित्राची साधने प्रकाशित करणे. त्यांच्या चरित्र संशोधनास चालना देणे. त्यांच्या कार्याचा सर्वत्र प्रसार करणे.
६. महाराष्ट्राच्या इतिहासाची समाजात आवड निर्माण व्हावी म्हणून परिषदा, चर्चासत्रे व व्याख्यानमाला यांचे आयोजन करणे.
७. महाराष्ट्राच्या इतिहासाची साधनसामग्री, संशोधनात्मक लेख, वैचारिक लेख इत्यादी नियमितपणे प्रकाशित करण्यासाठी नियतकालिक काढणे.
८. समाजात विधायक कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्था यांच्या कार्याचा उचित गौरव करणे आणि त्यांच्या कार्यास समाजप्रबोधनाच्या दृष्टीने प्रसिद्धी देणे.
९. इतिहास-संशोधक, अभ्यासक, लेखक, विचारवंत, साहित्यिक यांना त्यांच्या आपत्काली आर्थिक व वैद्यकीय मदत करणे.
१०. गरीब तसेच होतकरू विद्यार्थ्यांना सर्व प्रकारचे आर्थिक व इतर प्रकारचे साहाय्य करणे इत्यादी.
यातील ८, ९, १०, कलामांद्वारे पवार सरांचा मानवतावादी दृष्टिकोन दिसून येतो.

संस्थेने इतिहासाच्या संशोधनास व त्यातून होणाऱ्या समाजप्रबोधनास चालना मिळावी; म्हणून आतापर्यंत पुढील काही ग्रंथ प्रकाशित केले आहेत. ते असे-
१. शोधनिबंध संग्रह : (अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेच्या मोरणे (धुळे) अधिवेशनात वाचले गेलेले), संपा. डॉ. जयसिंगराव पवार
२. श्री शहाजी स्मृतिग्रंथ : (अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेच्या अलिबाग अधिवेशनात वाचले गेलेले शोधनिबंध) संपा. डॉ. जयसिंगराव पवार
३. राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ : खंड १, २ व ३ : संपा. डॉ. जयसिंगराव पवार.
४. दिनकर मास्तर : चरित्र व कार्य : सौ. वसुधा पवार
५. 'विजयी मराठा' कार श्रीपतराव शिंदे : संपा. डॉ. जयसिंगराव पवार व विजयराव शिंदे.
६. राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ : द्वितीय आवृत्ती, संपा. डॉ. जयसिंगराव पवार.
७. राजर्षी शाहू छत्रपती : कन्नड आवृत्ती, अनु. प्राचार्य चंद्रकांत पोकळे.
८. राजर्षी शाहू छत्रपती : कोकणी आवृत्ती, अनु. प्रा. अकल्पिता राऊत- देसाई आणि प्रा. प्रमदा गावस-देसाई.
९. 'Rajarshi Shahu and the British Paramountcy' : Dr. Manjushri Pawar
१०. सत्यशोधक विठ्ठल बिराजी डोणे समग्रवाङ्मय : डॉ. सुशीला ओडेयर.
११. 'Rajarshi Shahu Chhatrapati : Social Revolutionary King: English Edition. Translation- Shri. run Sadhu.
१२. Rajarshi Shahu Chhatrapati: German Edition. Translated by Sudhir Pednekar
१३. 'राष्ट्रवीर'कार शामराव देसाई स्मृतिग्रंथ : संपा. डॉ. जयसिंगराव पवार व प्राचार्य अनंतराव देसाई
१४. राजर्षी शाहू छत्रपती : तेलुगू आवृत्ती, अनु. डॉ. लक्ष्मीनारायण बोल्ली
१५. राजर्षी शाहू छत्रपती : उर्दू आवृत्ती, अनु. श्री. सय्यद इफ्तिखार अहमद
१६. शिवपुत्र छत्रपती राजाराम महाराज : डॉ.

जयसिंगराव पवार
१७. छत्रपती संभाजी महाराज : डॉ. इस्माईल पठाण
१८. छत्रपती शिवाजी महाराज : डॉ. इस्माईल पठाण
१९. राजर्षी शाहू पंच खंडात्मक स्मारक ग्रंथ : डॉ. जयसिंगराव पवार
२०. मोगलमर्दिनी महाराणी ताराबाई : डॉ. जयसिंगराव पवार
या कार्यानंतर पवार सरांचा अगदी थोडक्यात परिचय करून दिलेला आहे.

डॉ. जयसिंगराव पवार

जन्म : ३० डिसेंबर, १९४१

महाराष्ट्रातील आघाडीचे इतिहास- संशोधक, इतिहासकार व समाज प्रबोधक
इतिहासाचे नामवंत प्राध्यापक :
४० संशोधनात्मक ग्रंथ व ४५ शोधनिबंध
२० सामाजिक व साहित्यिक पुरस्कारांनी सन्मानित
संस्थापक अध्यक्ष : अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद, स्थापना : १९९१
संस्थापक संचालक : महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी : स्थापना १९९२
मानद संचालक : शाहू संशोधन केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
संशोधन क्षेत्र : मराठ्यांचा इतिहास, आधुनिक महाराष्ट्र
महत्त्वाकांक्षी प्रकल्प : राजर्षी शाहू छत्रपतींचे चरित्र सर्व जगभर प्रसारित करण्याचे मिशन. भारताच्या १५ भाषांत व जगाच्या १० भाषांत शाहूचरित्र अनुवादित करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प. आतापर्यंत मराठी, कन्नड, कोंकणी, उर्दू, तेलगू, हिंदी, सिंधी, गुजराती, इंग्लिश, जर्मन, रशियन इत्यादी भाषांत प्रसिद्ध

प्रमुख ग्रंथसंपदा
१. शिवचरित्र एक मागोवा
२. शिवचरित्रापासून काय शिकावे?
३. छ. संभाजी स्मारक ग्रंथ
४. शिवपुत्र छत्रपती राजाराम
५. स्वातंत्र्य सौदामिनी महाराणी ताराबाई
६. मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध
७. मराठेशाहीचे अंतरंग
८. मराठी साम्राज्याचा उदयास्त
९. क्रांतिसिंह नाना पाटील
१०. आमच्या इतिहासाचा शोध व बोध
११. राजर्षी शाहू पंच खंडात्मक स्मारक ग्रंथ

प्रमुख सन्मान
महाराष्ट्र राज्य सुवर्णमहोत्सवानिमित्त शाहू-चरित्रकार म्हणून भूतपूर्व राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते मराठी, हिंदी व इंग्लिश शाहू चरित्राचे प्रकाशन व सन्मान : मुंबई
भूतपूर्व राष्ट्रपती श्री. प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते इंग्लिश शाहू चरित्राचे प्रकाशन व सन्मान
भूतपूर्व केंद्रिय कृषि मंत्री श्री. शरद पवार यांच्या हस्ते अमृतमहोत्सवी सन्मान : कोल्हापूर
'शिवपुत्र छ. राजाराम' या ग्रंथास महाराष्ट्र शासनाचा इतिहासाचा उत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार व सन्मान

प्रा. गणेश राऊत
इतिहास अभ्यासक
संपर्क : ८४५९७७२०१८

भाषा व साहित्यक्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर

डॉ. चिन्मय मधू घैसास

कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence– 'एआय') ही केवळ एक तांत्रिक संकल्पना नसून मानवी बौद्धिक क्षमतांचे संगणकीय रूपांतर करण्याचा एक व्यापक प्रयत्न आहे. विचार करणे, अनुभवातून शिकणे, निष्कर्ष काढणे, भाषा समजून घेणे आणि त्या भाषेत अर्थपूर्ण प्रतिसाद देणे या मानवी क्षमतांचे अनुकरण करणे हे 'एआय'चे मूलभूत उद्दिष्ट मानले जाते. संगणकविज्ञान, भाषाविज्ञान, मानसशास्त्र, तत्त्वज्ञान, सांख्यिकी इ. विविध शाखांचा संगम 'एआय'मध्ये आढळतो. आज 'एआय'चा प्रभाव शिक्षण, आरोग्य, उद्योग, माध्यमे, प्रशासन यांसोबतच भाषा व साहित्याच्या क्षेत्रातही खोलवर दिसून आला आहे. भाषा ही मानवी समाजाची मूलभूत ओळख आहे, तर साहित्य हे त्या भाषेतून व्यक्त होणाऱ्या मानवी भावना, विचार, संघर्ष आणि संस्कृतीचे प्रतिबिंब आहे. भाषा व साहित्याच्या अभ्यासात केवळ माहिती किंवा संरचना नव्हे, तर संवेदनशीलता, सांस्कृतिक संदर्भ आणि मानवी अनुभव केंद्रस्थानी असतात. अशा मानवी मूल्यांनी समृद्ध क्षेत्रात 'एआय'चा वापर ही एकीकडे मोठी संधी, तर दुसरीकडे गंभीर आव्हान म्हणून पाहिले जाते. अध्यापन, संशोधन, विश्लेषण, अनुवाद, डिजिटल मानवविद्या आणि शैक्षणिक व्यवस्थापन अशा विविध स्तरांवर 'एआय'चा परिणाम अभ्यासणे आज अपरिहार्य ठरले आहे.

भाषा अध्यापनाच्या क्षेत्रात 'एआय'ने पारंपरिक अध्यापनपद्धतींना मोठ्या प्रमाणात आव्हान दिले आहे. पारंपरिक वर्गशिक्षण हे बहुतेक वेळा एकसारख्या अभ्यासक्रमावर आधारित असते, जिथे सर्व विद्यार्थ्यांना समान गतीने व समान पद्धतीने शिकवले जाते. मात्र प्रत्यक्षात विद्यार्थ्यांची भाषिक पार्श्वभूमी, शिकण्याची गती, आत्मविश्वास, स्मरणशक्ती आणि अभिव्यक्तिक्षमता वेगवेगळी असते. 'एआय'आधारित अध्यापनप्रणाली या वैयक्तिक फरकांना ओळखून त्यानुसार शिक्षण देण्याची क्षमता बाळगतात. Intelligent Tutoring Systems (ITS), Adaptive Learning Platforms आणि 'एआय'–आधारित संवादक चॅटबॉट्स यांचा वापर भाषाशिक्षणात झपाट्याने वाढत आहे. Duolingo, Babbel, Rosetta Stone यांसारखे ॲप्स विद्यार्थ्यांच्या चुका, प्रतिसाद वेळ, शब्दसंग्रह, व्याकरणातील कमकुवत विभाग यांचे



विश्लेषण करून वैयक्तिक सराव आणि सुधारणा सुचवतात. Grammarly, Quillbot, Language Tool यांसारखी साधने व्याकरण, शैली, सुसंगती आणि स्पष्टता या कामी मदत करतात.

'एआय'आधारित Speech Recognition आणि Pronunciation Analysis प्रणालींमुळे विद्यार्थ्यांना बोलण्याचा सातत्यपूर्ण सराव करता येतो. परकीय भाषा शिकताना उच्चार, लहेजा आणि संवादकौशल्य विकसित करणे हे मोठे आव्हान असते. 'एआय'आधारित साधने विद्यार्थ्याला सतत सरावाची संधी देतात आणि तत्काळ अभिप्रायदेखील देतात. संशोधनातून असे दिसून आले आहे, की अशा वैयक्तिक व सतत मिळणाऱ्या अभिप्रायांमुळे विद्यार्थ्यांचा भाषिक आत्मविश्वास, सहभाग आणि दीर्घकालीन स्मरणशक्ती वाढते. तथापि, या तंत्रज्ञानाच्या मर्यादादेखील स्पष्ट आहेत. बहुतेक 'एआय'प्रणाली प्रामुख्याने आंतरराष्ट्रीय किंवा मानक भाषाप्रकारांवर आधारित असल्यामुळे स्थानिक बोलीभाषा, आदिवासी भाषा, सामाजिक उपभाषा किंवा भाषेतील सांस्कृतिक सूक्ष्मता दुर्लक्षित राहते. परिणामी भाषिक समावेशकतेच्या संदर्भात महत्त्वाचे प्रश्न उपस्थित होतात. शिवाय, शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील भावनिक नाते, प्रेरणा, मूल्यसंस्कार आणि सर्जनशील संवाद 'एआय' पूर्णत: निर्माण करू शकत नाही.

भाषावैज्ञानिक संशोधनाचा पाया म्हणजे भाषिक माहिती (Linguistic Data). पारंपरिक पद्धतींमध्ये माहिती संकलन हे क्षेत्रकार्य, प्रश्नावली, ध्वनिमुद्रण यांच्या आधाराने होते. हे कार्य अत्यंत श्रमसाध्य, खर्चीक आणि मर्यादित स्वरूपाचे होते. 'एआय'मुळे या प्रक्रियेत क्रांतिकारक बदल घडून आले आहेत. Natural Language Processing (NLP)च्या साहाय्याने प्रचंड प्रमाणात लिखित व मौखिक भाषा माहिती संकलित, वर्गीकृत आणि विश्लेषित केली जाऊ शकते. वेब स्क्रॅपिंग, सोशल मीडिया विश्लेषण, Speech-to-Text प्रणाली, स्वयंचलित टॅगिंग

यांमुळे लाखो शब्दांचे कॉर्पस अल्प वेळेत तयार करता येतात. शब्दप्रयोग, व्याकरणिक नमुने, अर्थसंबंध, संवादशैली, भाषिक बदल यांचा अभ्यास आता अधिक वस्तुनिष्ठ व सांख्यिक पद्धतीने केला जातो. Parallel Corpora च्या निर्मितीत 'एआय' अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. बहुभाषिक अनुवाद, तुलनात्मक भाषाविज्ञान आणि भाषांतर शिक्षणासाठी हे कॉर्पस अत्यंत उपयुक्त ठरतात. भारतीय भाषांच्या संदर्भात संस्कृत, मराठी, हिंदी, तमिळ, कन्नड इ. भाषांमधील ऐतिहासिक व समकालीन संबंधांचा अभ्यास 'एआय'मुळे अधिक सुलभ झाला आहे. सामाजिक माध्यमांवरील भाषावापराचे विश्लेषण करून नवीन शब्दनिर्मिती, कोड–मिक्सिंग, कोड–स्विचिंग आणि भाषिक बदलांचा अभ्यास प्रत्यक्ष वेळेत करणे शक्य झाले आहे.

मात्र, या प्रक्रियेत गोपनीयता, माहितीची संमती आणि प्रतिनिधित्व यासंबंधी गंभीर प्रश्न निर्माण होतात. काही विशिष्ट सामाजिक गटांचे भाषिक नमुने जास्त प्रमाणात वापरल्यास 'एआय'प्रणाली भाषिक पूर्वग्रह निर्माण करू शकते आणि भाषेचा अपूर्ण दृष्टिकोन सादर करू शकते. साहित्यिक अभ्यास हा पारंपरिकपणे मानवी संवेदना, चिकित्सक दृष्टिकोन आणि सांस्कृतिक जाणिवांवर आधारित मानला जातो, तरीही 'एआय'ने साहित्यिक विश्लेषणाला नवी दृष्टी आणि नवी साधने उपलब्ध करून दिली आहेत. Computational Literary Studies आणि Digital Humanities या क्षेत्रांमध्ये संगणकीय विश्लेषणाचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. Topic Modeling, Sentiment Analysis, Stylometry, Narrative Network Analysis यांसारख्या पद्धतींमुळे मोठ्या साहित्यकृतींच्या संग्रहांचा तुलनात्मक आणि दीर्घकालीन अभ्यास शक्य झाला आहे. Latent Dirichlet Allocation (LDA) सारख्या तंत्रज्ञानामुळे कादंबऱ्या, कविता आणि नाटके यांमधील अंतर्निहित विषय, सामाजिक प्रश्न, स्त्री–पुरुष प्रतिमा, राजकीय व तत्त्वज्ञानात्मक प्रवाह स्पष्ट करता येतात. भावविश्लेषणामुळे साहित्यकृतीतील भावनिक तीव्रता, आशावाद, निराशा, संघर्ष आणि परिवर्तन यांचा अभ्यास करता येतो.

Stylometric Analysis च्या साहाय्याने लेखकाची शैली, शब्दप्रयोग, वाक्यरचना, लय यांचे विश्लेषण करण्याचे प्रयत्न झाले आहेत. शेक्सपिअरच्या नाटकांचे सहलेखन, भारतीय संतसाहित्याचे कालानुक्रमिक विश्लेषण, आधुनिक साहित्यप्रवाहांचा अभ्यास या क्षेत्रांत 'एआय'उपयुक्त ठरले आहे. तथापि, साहित्य हे केवळ आकडेवारी किंवा शब्दगणनेपुरते मर्यादित नसते. रूपके, प्रतीके, सूचक अर्थ, सांस्कृतिक संदर्भ आणि सौंदर्यात्मक अनुभूती या बाबी 'एआय'पूर्णत: समजू शकत नाही. त्यामुळे 'एआय'आधारित विश्लेषण हे मानवी समीक्षेचा पर्याय नसून पूरक साधन म्हणूनच वापरणे अधिक योग्य ठरते. Machine Translation हे 'एआय'चे सर्वांत लोकप्रिय व दृश्यमान रूप आहे. Neural Machine Translation (NMT) प्रणालींमुळे अनुवादाची अचूकता, प्रवाह आणि सुसंगती लक्षणीयरीत्या वाढली आहे. Google Translate, DeepL, Microsoft Translator यांसारखी साधने संशोधक, विद्यार्थी आणि सामान्य वाचक यांच्यासाठी जागतिक साहित्य उपलब्ध करून देतात. तुलनात्मक साहित्याभ्यास, जागतिक साहित्याभ्यास आणि आंतरसांस्कृतिक संवादासाठी 'एआय'आधारित अनुवाद अत्यंत उपयुक्त ठरतो. मात्र साहित्यिक अनुवादाच्या बाबतीत 'एआय' अजूनही मर्यादित आहे. कविता, नाट्यसंवाद, सांस्कृतिक सूचकता, विनोद आणि उपरोध यांचे अचूक रूपांतर 'एआय'ला अवघड जाते, त्यामुळे 'एआय'द्वारे प्राथमिक मसुदा तयार करून मानवी अनुवादकाकडून सर्जनशील संपादन करणे हा अधिक व्यवहार्य दृष्टिकोन मानला जातो.

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आजच्या युगातील अत्यंत प्रभावी आणि वेगाने विकसित होणारे तंत्रज्ञान आहे.

शिक्षण, आरोग्य, उद्योग, संशोधन यांसह साहित्य क्षेत्रातही त्याचा मोठ्या प्रमाणावर वापर सुरू झाला आहे. विशेषत: साहित्यनिर्मिती, सर्जनशील लेखन आणि ललित साहित्याच्या निर्मितीत 'एआय'ची भूमिका महत्त्वाची ठरत असली, तरी त्याचबरोबर अनेक आव्हानेही निर्माण होत आहेत. साहित्यनिर्मिती ही केवळ शब्दांची मांडणी नसून ती मानवी अनुभव, भावना, संवेदना, कल्पनाशक्ती आणि जीवनदृष्टी यांचे कलात्मक प्रकटीकरण असते. कविता, कथा, कादंबरी, नाटक किंवा निबंध यांमध्ये लेखकाचे वैयक्तिक अनुभव, सामाजिक जाणीव आणि भावविश्व प्रतिबिंबित होत असते. 'एआय' मात्र उपलब्ध माहिती, नमुने आणि भाषिक संरचना यांच्या आधारे लेखन तयार करते, त्यामुळे त्या लेखनात भाषिक अचूकता असली तरी मानवी अनुभवांची सखोलता, वेदना, प्रेम, संघर्ष किंवा आत्मिक स्पर्श यांचा अभाव जाणवू शकतो.

ललित साहित्य हे भावनात्मक आणि सौंदर्यप्रधान असते. त्यात शब्दांमागील सूक्ष्म अर्थ, प्रतीकात्मकता आणि अंतर्मनाचा स्पर्श महत्त्वाचा असतो. 'एआय'द्वारे तयार साहित्यामध्ये ही नैसर्गिक भावप्रवणता अनेकदा कृत्रिम वाटते, त्यामुळे वाचक आणि साहित्य यांच्यात निर्माण होणारे भावनिक नाते कमकुवत होण्याची शक्यता असते. याशिवाय इतरही अनेक गंभीर प्रश्न आहेत. विविध लेखकांच्या शैली, विचार आणि लेखनसामग्रीवर आधारित मजकूर 'एआय' तयार करते, त्यामुळे साहित्यचौर्य, शैलीची नक्कल आणि बौद्धिक संपत्तीचे हक्क असे प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. लेखकाच्या सर्जनशीलतेला आणि एकंदर साहित्यविश्वाच्या चौकटीलाच धोका निर्माण होऊ शकतो. 'एआय'चा अतिरेकी वापर लेखकांच्या कल्पनाशक्तीवरही परिणाम करू शकतो. लेखनासाठी तंत्रज्ञानावर अवलंबित्व वाढले, तर स्वविचार, चिंतन आणि सर्जनशील संघर्ष यांची प्रक्रिया कमी होईल. परिणामी साहित्य अधिक यांत्रिक आणि एकसुरी होण्याचा धोका संभवतो; म्हणून 'एआय' हे साहित्यनिर्मितीचे पर्याय नसून साहाय्यक साधन म्हणून वापरले गेले पाहिजे. मानवी संवेदना, कल्पनाशक्ती आणि जीवनानुभव यांची जागा कोणतेही तंत्रज्ञान घेऊ शकत नाही. साहित्याचे खरे सौंदर्य हे मानवी आविष्करणात आहे आणि ते जपणे हीच आजची सर्वांत मोठी गरज आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे सर्जनशील साहित्यनिर्मिती आणि ललित साहित्याच्या क्षेत्रात अनेक नवीन कायदेशीर प्रश्न निर्माण होत आहेत. कविता, कथा, कादंबरी, नाटक, लेख किंवा भाषांतर यांसारख्या साहित्यप्रकारांमध्ये 'एआय'चा वापर होत असताना विशेषत: बौद्धिक संपदा कायदा (Intellectual Property Law) अधिक महत्त्वाचा ठरतो. बौद्धिक संपदा म्हणजे मानवी बुद्धीच्या आधारे निर्माण झालेली मौलिक कृती, कल्पना, संशोधन किंवा कलात्मक अभिव्यक्ती. साहित्याच्या संदर्भात यामध्ये मुख्यत: कॉपीराइट कायदा लागू होतो. एखाद्या लेखकाने स्वत:च्या कल्पनाशक्ती, अनुभव आणि शैलीतून निर्माण केलेल्या साहित्यकृतीवर त्याचा कायदेशीर हक्क असतो; परंतु 'एआय'द्वारे निर्माण झालेल्या मजकुराच्या बाबतीत 'मूळ लेखक' कोण मानावा? हा गंभीर प्रश्न निर्माण होतो. 'एआय' स्वत: कायदेशीर व्यक्ती नसल्यामुळे त्याला लेखकाचा दर्जा देता येत नाही. मग हक्क वापरकर्त्याचा, प्रोग्राम विकसित करणाऱ्या कंपनीचा की डेटासंच पुरवणाऱ्याचा? याबाबत स्पष्टता आवश्यक ठरते.

दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे 'एआय'चे प्रशिक्षण. विद्यमान साहित्यकृती, पुस्तके, लेख आणि कविता यांवर आधारित प्रशिक्षण 'एआय'प्रणाली अनेकदा घेतात. जर या कृतींचा वापर परवानगीशिवाय झाला असेल, तर तो कॉपीराइट उल्लंघनाचा विषय ठरू शकतो, यामुळे मूळ लेखकांच्या बौद्धिक हक्कांचे संरक्षण धोक्यात येते. शैलीची नक्कल हाही एक संवेदनशील मुद्दा आहे. 'एआय' एखाद्या प्रसिद्ध लेखकाच्या शैलीत नवीन लेखन तयार करू शकते. हे







थेट साहित्यचौर्य नसले तरी नैतिक आणि कायदेशीर वाद निर्माण करू शकते. यामुळे लेखकाच्या स्वतंत्र ओळखीवर परिणाम होऊ शकतो; म्हणून 'एआय'चा वापर साहित्यनिर्मितीत करताना कॉपीराइट कायदा, लेखकाची परवानगी, नैतिकता या सर्व बाबींचा गंभीरपणे विचार करणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानाचा विकास आणि कायद्याचे संरक्षण यामध्ये संतुलन राखणे हेच भविष्यातील सर्वांत मोठे आव्हान असेल.

भाषा व साहित्य संशोधनात 'एआय'मुळे संशोधन प्रक्रिया अधिक वेगवान व कार्यक्षम झाली आहे. हजारो संशोधन लेखांचे विश्लेषण करून संदर्भ शोधणे, विषयप्रवाह ओळखणे, संशोधनातील पोकळी शोधणे हे कार्य 'एआय'आधारित साधनांमुळे शक्य झाले आहे. Semantic Search, Citation Network Analysis आणि Automated Summarization या तंत्रांमुळे संशोधकांचा वेळ आणि श्रम वाचतात. तथापि, या प्रणाली अधिक प्रमाणात उद्धृत होणाऱ्या लेखकांना व प्रतिष्ठित नियतकालिकांना प्राधान्य देतात. त्यामुळे नवोदित, प्रादेशिक किंवा भाषिकदृष्ट्या दुर्लक्षित संशोधकांचे कार्य मागे पडण्याचा धोका संभवतो; म्हणून 'एआय'आधारित संशोधन साधनांचा वापर करताना चिकित्सक दृष्टी आवश्यक आहे. 'एआय'मुळे भाषाअध्यापन अधिक वैयक्तिक, समावेशक आणि परिणामकारक झाले आहे. भाषिक संशोधन अधिक व्यापक व वैज्ञानिक झाले आहे. बहुभाषिक ज्ञानसंपदा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचली आहे. लुप्तप्राय भाषांचे दस्तऐवजीकरण, लोकसाहित्याचे जतन आणि सांस्कृतिक वारशाचे डिजिटल संरक्षण या क्षेत्रांत 'एआय' मोलाची भूमिका बजावू शकते. भाषिक पूर्वग्रह, अल्गोरिदमिक पक्षपात, सर्जनशीलतेवर होणारा परिणाम, नैतिक प्रश्न, माहितीची गोपनीयता आणि अतीनिर्भरता हे 'एआय'चे गंभीर धोके आहेत. मानवाचे चिकित्सक वाचन, स्वतंत्र विचार करण्याची क्षमता आणि सर्जनशील लेखनकौशल्य कमी होण्याची भीती व्यक्त केली जाते. भाषा व साहित्याच्या क्षेत्रात, कृत्रिम बुद्धिमत्ता ही एक शक्तिशाली, अपरिहार्य आणि द्विमुखी साधन आहे. विवेकपूर्ण, नैतिकपणे आणि मानवी संवेदनशीलतेशी सुसंगतता राखून वापर केल्यास 'एआय'मुळे भाषा व साहित्य, शिक्षण, संशोधन तसेच अभिव्यक्ती अधिक समृद्ध होऊ शकते. 'एआय' हे मानवी बुद्धीचे स्थान घेणारे नव्हे, तर तिचे साहाय्यक साधन म्हणून स्वीकारले गेले, तरच या क्षेत्रात संतुलित, सर्जनशील आणि सकारात्मक परिवर्तन घडून येईल.

डॉ. चिन्मय मधू घैसास
साहाय्यक प्राध्यापक (मराठी) गोवा विद्यापीठ
संपर्क : ९८२३७२८६४० chinmay@unigoa.ac.in

२६ फेब्रुवारी विरामचिन्हे दिवस निमित्ताने...


मेजर थॉमस कँडी

भाषेला अर्थ देणाऱ्या विरामचिन्हांची ओळख

माधव राजगुरू

लेखनात आपण जी विरामचिन्हे वापरतो, त्याची सुरुवात मराठीत पहिल्यांदा मेजर थॉमस कँडी यांनी केली. शब्दकोश, व्याकरण, लेखन, संपादन, भाषांतर इ. क्षेत्रांत मराठीसाठी त्यांनी केलेले कार्य वाखाणण्याजोगे आहे. २६ फेब्रुवारी २०२६ला त्यांचे १५०वे स्मृतिवर्ष सुरू झाले आहे. त्यानिमित्ताने प्रस्तुत लेखात विरामचिन्हांची ओळख करून दिली आहे.

प्रास्ताविक

मराठीत अनेक विरामचिन्हे आहेत. ती सर्वच्या सर्व लेखनात वापरली पाहिजेत. अनुभव असा आहे, की बहुतांश लोकांकडून विरामचिन्हे अजिबात वापरली जात नाहीत. याचे मुख्य कारण म्हणजे अनेकांना ही विरामचिन्हेच माहीत नसतात. पूर्णविराम, स्वल्पविराम, प्रश्नचिन्ह, उद्गारचिन्ह या ठरावीक विरामचिन्हांच्या व्यतिरिक्त आणखी बरीच विरामचिन्हे व इतर चिन्हे आहेत. त्यांची माहिती घेणे आणि त्यांचा वापर कोठे, कसा करावा हे समजावून घेणे आवश्यक आहे.

बोलताना आपण ठरावीक शब्दांनंतर अधूनमधून कमी-अधिक वेळ थांबतो. जिथे आपण थांबतो, त्या ठिकाणी विशिष्ट विरामचिन्हे योजायची असतात, त्यामुळे लिहिलेल्या वाक्याचा योग्य अर्थबोध होतो. ही चिन्हे आपल्या मनातील नेमके भाव आणि विचार इतरांपर्यंत पोहोचविण्यासाठी मदत करत असतात.

आपण लिहिताना जी विरामचिन्हे वापरतो, त्याची सुरुवात मराठीत पहिल्यांदा एका इंग्रज माणसाने केली. त्याचे नाव आहे, मेजर थॉमस कॅन्डी. इ.स.वी.सन १८५० मध्ये त्याने 'विरामचिन्हांची परिभाषा' ही छोटेखानी पुस्तिका प्रकाशित केली. मराठी व्याकरणकार दादोबा पांडुरंग तर्खडकर, मराठीतील आद्य संपादक बाळशास्त्री जांभेकर यांच्या मराठी लेखनातील चुका दर्शवून त्याने सर्वांना चकित केले. शब्दकोश, व्याकरण, लेखन, संपादन, भाषांतर

इ. क्षेत्रांत मराठीसाठी त्याने केलेले कार्य वाखाणण्याजोगे आहे. या वर्षी फेब्रुवारीमध्ये थॉमस कॅन्डी याचे १५०वे स्मृतिवर्ष सुरू झाले आहे. त्याच्या स्मृतिप्रीत्यर्थ या वर्षापासून २६ फेब्रुवारी हा दिवस विरामचिन्हे दिवस म्हणून साजरा करावा, असे आवाहन साप्ताहिक साधनाने महाराष्ट्र साहित्य परिषदेला केले आहे. पुढील काळात मसापच्या परीक्षा विभागाच्या वतीने २७ फेब्रुवारीला मराठी भाषा गौरव दिन, २८ फेब्रुवारीला विज्ञान दिन या बरोबरच २६ फेब्रुवारीला विरामचिन्हे दिवस साजरा केला जाईल. या निमित्ताने मराठीत वापरल्या जाणाऱ्या विरामचिन्हांची ओळख प्रस्तुत लेखात करून दिली आहे.

मराठीमध्ये पूर्णविराम, अर्धविराम, स्वल्पविराम, अपूर्णविराम, प्रश्नचिन्ह, उद्गारचिन्ह, अवतरणचिन्ह, संयोगचिन्ह, अपसरणचिन्ह, लोपचिन्ह, विकल्पचिन्ह, काकपद, अवग्रह, संदर्भ ही व इतरही काही चिन्हे उपयोगात आणली जातात. ती समजून घेऊया.

टिंब (•)

सुरुवात आपण टिंबने करू. • हे चिन्ह भाषेत किंवा अन्य कोणत्याही विषयांत वापरले जाते. याला टिंब असे म्हणतात. याचा अर्थ आरंभ बिंदू. एखाद्या वस्तूचे किंवा पदार्थाचे केंद्रस्थान दर्शवण्यासाठी याचा उपयोग केला जातो. याला 'बिंदू' असेही म्हटले जाते. टिंबापुढे अनेक टिंबे जोडून त्यांची अखंड रेषा बनते. याचा उपयोग गणित आणि भाषा या दोन्ही विषयांत होतो. मराठी भाषेमध्ये टिंबाचा वापर अनेक ठिकाणी होतो. स्थान बदलल्यास त्याचे नाव आणि कार्य बदलते. जसे – अक्षरांवर टिंब दिल्यास त्याला अनुस्वार म्हणतात. वाक्याच्या शेवटी टिंब दिल्यास, त्याला पूर्णविराम म्हणतात.

एखादा शब्द किंवा एखादे नाव पूर्ण न लिहिता, त्यातील फक्त पहिले अक्षर लिहून त्यापुढे टिंब दिल्यास त्याला संक्षेपचिन्ह म्हणतात. लिहिताना आपण वाक्य मध्येच तोडून सोडून देतो, तेव्हा ते सोडून दिलेले बोलणे... अशी तीन टिंबे देऊन दर्शवतो. त्याला 'लोपचिन्ह' असे म्हणतात.

पूर्णविराम (.) कोठे द्यावा ?

पूर्णविरामाची दोन कार्ये आहेत. बोलताना वाक्य पूर्ण झाले की आपण पुढील वाक्य बोलण्याआधी काही सेकंद थांबतो. लिहिताना वाक्य पूर्ण झाले आहे, हे कळण्यासाठी पूर्णविराम देतो. पूर्णविराम न देता लेखन केल्यास वाक्य कोठे संपते आणि नवीन वाक्याची सुरुवात कोठून होते हे लक्षात येत नाही. वाक्य पूर्ण झाल्याचे सूचित करणे, हे पूर्णविरामाचे पहिले कार्य आहे. उदा., मी चोरी करणार नाही. केल्यास शिक्षा करावी. या वाक्यात पूर्णविराम योग्य ठिकाणी न दिल्यास अर्थाचा अनर्थ कसा होतो, ते पाहा, मी चोरी करणार. नाही केल्यास शिक्षा करावी. वाक्ये तीच; पण पूर्णविरामाची जागा बदलली, त्यामुळे वाक्याचा अर्थही बदलला.

नामाचा संक्षेप करण्यासाठीसुद्धा पूर्णविराम चिन्हाचा वापर केला जातो. उदा., विष्णु सखाराम खांडेकर हे नाव संक्षेपाने लिहिण्यासाठी नावाच्या आद्याक्षरांसमोर पूर्णविराम देऊन लिहिले जाते. जसे – वि. स. खांडेकर. अशा प्रकारे पूर्णविराम चिन्हाचा वापर लेखनात आवश्यक आहे.

खालील ठिकाणी पूर्णविराम देऊ नका.

आणि, व, नि या उभयान्वयी अव्ययाने दोन वाक्ये जोडली जातात, अशा वाक्यातील आणि, व, नि यांच्या आधीच्या वाक्याच्या शेवटी पूर्णविराम देऊ नये. जसे – तो आला आणि मी तिथून बाहेर पडलो.

अपूर्णविराम (:) कोठे द्यावा ?

साहित्याचे काही प्रकार पुढीलप्रमाणे आहेत : कविता, कथा, नाटक, कादंबरी इ. वर लिहिल्याप्रमाणे वाक्याच्या शेवटी तपशील सांगताना (:) हे चिन्ह वापरले जाते.

स्वल्पविराम (,) कोठे द्यावा ?

बोलताना आपण वाक्य पूर्ण झाले की थांबतो; परंतु वाक्याच्या मध्येसुद्धा काही ठिकाणी अल्प वेळ थांबणे आवश्यक असते. हे थांबणे सूचित करणारे

चिन्ह म्हणजे स्वल्पविराम होय. उदा., मी उत्तम प्रकारे गाऊ शकतो, हे मला शेवटपर्यंत कळलेच नाही. या वाक्यातील 'गाऊ शकतो' या क्रियापदामुळे इथे वाक्य पूर्ण झाले असे वाटते; परंतु वाक्य 'कळलेच नाही' येथे पूर्ण होते, म्हणून वाक्य वाचताना 'शकतो' या क्रियापदानंतर अल्पविराम घ्यायचा असल्यामुळे तेथे स्वल्पविराम आवश्यक आहे.

एकाच स्वरूपाचे शब्द एकाच वेळी क्रमाने येतात, तेव्हा प्रत्येक शब्दापुढे स्वल्पविराम द्यायचा असतो. उदा., माझ्याकडे लाल, निळे, पिवळे, काळे आणि पांढरे अशा अनेक रंगांचे पेन आहेत.

संबोधनानंतर स्वल्पविराम देऊन लिहिले जाते. जसे – गार्गी, जेवायला ये.

पत्ता लिहितानासुद्धा हे चिन्ह वापरले जाते. जसे – महेश पॅराडाईज, ए–२/ १५, औंध, पुणे–७.

व्यक्तींच्या नावापुढे त्यांचे पद आणि संस्थेचे नाव लिहिताना स्वल्पविराम चिन्ह वापरतात. जसे – नयना राजे, संचालक, शब्दरंग प्रतिष्ठान, पुणे. वरील उदाहरणांवरून आपणास स्वल्पविराम चिन्हाचा अनेक ठिकाणी कसा वापर होतो, हे लक्षात येते.

अर्धविराम (;) कोठे द्यावा ?

उभयान्वयी अव्ययाने दोन वाक्ये जोडली जातात. पहिल्या वाक्याचा अर्धा भाग उभयान्वयी अव्ययानंतर दुसऱ्या वाक्यात असतो, तेव्हा उभयान्वयी अव्यय आल्यास आधी अर्धविराम चिन्ह वापरावे. जसे – पाऊस खूप झाला; परंतु नदीला पूर आला नाही.

प्रश्नचिन्हाचा (?) वापर कोठे करावा ?

प्रश्नार्थक वाक्याच्या शेवटी '?' हे चिन्ह येते. वाक्यात कोण, काय, कसे, कोठे, किती यांसारख्या शब्दांच्या साह्याने प्रश्न विचारले जातात, तेव्हा ? हे चिन्ह वापरतात. वाक्यात कोण, काय, कसे इत्यादी शब्द असूनसुद्धा काही वेळा प्रश्नचिन्हाची गरज नसते, अशा वेळी आपणाकडून प्रश्नचिन्ह देण्याची चूक होण्याची शक्यता असते.

उदा., माझ्या हातात काय आहे? या वाक्यात सरळ सरळ प्रश्न विचारला आहे.

आता पुढील वाक्य वाचा. 'माझ्या हातात काय आहे, हे तू ओळख.' या वाक्यातही प्रश्न विचारला आहे; पण वाक्य प्रश्नार्थक नाही. काय आहेच्या पुढे हे तू ओळख. असे विधान आहे; म्हणून या ठिकाणी शेवटी प्रश्नचिन्ह येणार नाही. यांसारखी आणखी काही उदाहरणे पाहा.

१. कोण किती पाण्यात आहे, हे मला ठावूक आहे.

२. ''आता तू कोठून आलास, हे मला सांगण्याची गरज नाही.''

अपसरण (—) व संयोगचिन्ह (–)

अपसरण व संयोगचिन्ह यांच्यात थोडासा फरक आहे. दोन शब्द संयोगचिन्हाद्वारे जोडून लिहिले जातात. उदा., लहान–मोठे, दहा–बारा इत्यादी.

लिहिताना ओळीच्या शेवटी येणारा शब्द तिथे मावत नसेल, तर तो शब्द तोडून शब्दाचा काही भाग खालच्या ओळीत आणावा लागतो. अशा वेळी संयोगचिन्हाचा वापर केला जातो. शब्द कोठे तोडायचा याचेही विशिष्ट संकेत आहेत. उदा., 'वाचनवेग' हा शब्द ओळीच्या शेवटी मावत नसल्यास तो शब्द पुढीलप्रमाणे तोडून लिहावा आणि जोडलेल्या शब्दाच्या पहिल्या अर्ध्या भागाच्या शेवटी हे चिन्ह वापरावे. जसे – 'वाचन' हा भाग वरील ओळीत आणि 'वेग' खालच्या ओळीत लिहिणे योग्य आहे. वाच–नवेग अशाप्रकारे शब्द तोडू नये.

अपसरण चिन्ह हे संयोगचिन्हापेक्षा थोडे लांब असते. स्पष्टीकरण देताना या चिन्हाचा वापर केला जातो. उदा., मी गुरुजींसमोर एक पुस्तक — जे त्यांनीच मला पूर्वी दिलेले, हळूच ठेवले आणि गुरुजी एकदम सद्‌गदित झाले.

वरीलप्रमाणे (–) संयोग आणि (—) अपसरण या चिन्हांतील फरक लक्षात घेऊन त्यांचा वापर करावा.

अनुस्वाराचा (ं) वापर

अनुस्वाराचा वापर अनेक ठिकाणी होतो.

वर्णमालेत ङ्, ञ, ण, न आणि म अशी पाच अनुनासिके आहेत. शब्दातील अक्षरांवर दिसणारे अनुस्वार अनुनासिकांऐवजी आलेले असतात. अनुस्वाराच्या पुढे जे अक्षर असेल, त्या अक्षर वर्गातील अनुनासिक असते. उदा. 'मंगल'मध्ये (ङ्), 'चंचल'मध्ये (ञ), 'घंटामध्ये' (ण), 'मंदिरमध्ये' (न) आणि 'चंपक'मध्ये (म) ही सर्व अनुनासिके ं या चिन्हाने दाखवली जातात.

शीर्षबिंदू (टिंब)

काही अक्षरांवर अनुस्वार अनुनासिकाऐवजी न येता इतर कारणांमुळे येतात. उदाहरणार्थ, पुढील दोन वाक्ये वाचा.

(१) रस्त्यावर दुतर्फा उंच उंच झाडे आहेत.

(२) रस्त्यावर दुतर्फा उंच उंच झाडं आहेत.

दोन्ही वाक्यांचा अर्थ एकच आहे; पण दोन्ही वाक्यांत 'झाड' शब्दाचे अनेकवचनी रूप वेगळे आहे. दुसऱ्या वाक्यात 'झाडे' ऐवजी 'झाडं' असा शब्द आहे, इथे मात्रा न देता 'ड'वर (टिंब) शीर्षबिंदू दिला आहे; परंतु त्याचा उच्चार अनुस्वारासारखा होत नाही. 'डं' मध्ये 'अ' स्वराचा उच्चार थोडा लांबलेला आहे. थोडक्यात, अनुनासिके आणि मात्रा या दोन्हींची कामे या चिन्हांद्वारेच पूर्ण होतात. आणखीन काही उदाहरणे पाहा – त्याचं, माझं, कामं, गाणं, झालं इत्यादी.

'काकपद' (^)

आपल्या मनात विचार, भावना, कल्पना येत राहतात आणि लेखणीतून झरझर उतरून ते शब्दरूप धारण करतात. ज्यावेळी आपण लिखित मजकुराचे वाचन करू लागतो, त्या वेळी आपल्या लक्षात येते, की काही गोष्टी सांगायच्या राहून गेल्या आहेत. अशा प्रसंगी आपण लिहिलेल्या मजकुराच्या दोन ओळींमध्ये दाटीवाटीने एखादे छोटे वाक्य लिहितो. सुटलेला एखादा शब्द किंवा वाक्य नेमके कोठे घ्यायचे, हे दर्शवण्यासाठी लेखनात ज्या चिन्हाचा वापर केला जातो, त्याला 'काकपद' असे म्हणतात. हे चिन्ह कावळ्यांच्या पायाप्रमाणे दिसत असल्याने त्याला 'काकपद' म्हटले आहे.

व सुंदर
उदाहरणार्थ, माझे हस्ताक्षर वळणदार ^ झाले.

फुल्या (xxx)

ग्रांथिक लेखन सभ्य व सुसंस्कृत भाषेत असावे, असा संकेत आहे; परंतु काही वेळा असभ्य, अश्लील शब्द वापरणे अगदीच अपरिहार्य आहे, असे वाटते. अशा वेळी वाक्यातील असभ्य किंवा अश्लील शब्द प्रत्यक्ष न लिहिता, त्या ठिकाणी xxx अशा फुल्या मारण्याची पद्धत आहे. थोडक्यात वाचताना वाक्यातील फुल्यांच्या ठिकाणी कोणता शब्द वाचावा, हे वाचकांवर सोपवलेले असते.

अवग्रह (ऽऽ)

बोलताना कधीकधी वाक्यातील विशिष्ट शब्दावर, शब्दातील विशिष्ट अक्षरांवर जोर दिला जातो. काही वेळा शब्दातील विशिष्ट अक्षराचा उच्चार लांबवलेला असतो. हा लांबवलेला उच्चार लक्षात येण्यासाठी प्रत्यक्ष लेखनात त्याला विशिष्ट चिन्ह आहे. ते चिन्ह ऽ असे असून, याला 'अवग्रह' असे म्हणतात. विशेषतः संभाषणात, गाण्यात या चिन्हाचा वापर होतो. जसे – अरे, श्याऽऽम, घरी लवकर ये किंवा जोऽऽजो रे बाळा, जोऽऽजो.

लोपचिन्ह (....)

काही वेळा बोलताना आपण वाक्य मध्येच तोडून, बोलणे थांबवतो. अर्धवट तोडलेले शब्द किंवा सोडून दिलेले बोलणे लेखनात दर्शवण्यासाठी .... अशी टिंबे दिली जातात. याला 'लोपचिन्ह' म्हणतात. वाक्याच्या मध्ये किंवा वाक्याच्या शेवटी असे बोलणे जिथे सोडलेले असते त्या ठिकाणी या चिन्हाचा वापर केला जातो. उदाहरणार्थ, हे असंच चालणार, रोज भांडण ... रोज हाणामारी... कंटाळलोय मी. .... बरं जाऊदे. तू कशाला आलास?

कंस व संदर्भखुणा

वाक्यातील एखाद्या शब्दाचे स्पष्टीकरण देताना त्या शब्दापुढे कंसात स्पष्टीकरण दिले जाते. उदा. अनुनासिकांबद्दल अनुस्वार (शीर्षबिंदू) देण्यात यावा. या ठिकाणी अर्धगोल कंस वापरला आहे.

एकापुढे एक अनेक मुद्दे स्पष्ट करताना मुद्द्यांना क्रमांक दिला जातो. किंवा मुद्दे वर्णाक्षरांनी दाखवली जातात, त्या वेळी कंस वापरतात. जसे – मुद्दा क्र. (१), (२), (३), किंवा मुद्दा (अ), (आ), (ई) असे लिहिताना या ठिकाणी पूर्ण कंस वापरतात.

नेहमी पूर्ण कंस वापरावा. १), २), ३), अ), आ), ई) असे अपूर्ण कंस न वापरता (१), (२), (३), (अ), (आ), (ई) असे पूर्ण कंस वापरावे.

एखाद्या शब्दाचे स्पष्टीकरण देण्याची वेळ येते, तेव्हा दोनदा दोन कंस वापरतात. मुख्य स्पष्टीकरण चौकोनी कंसात आणि दुय्यम स्पष्टीकरण गोल कंसात लिहिण्याची पद्धत आहे. जसे – [अनुनासिकेबद्दल ^{X}अनुस्वार (शीर्षबिंदू) वापरावा.]

स्पष्टोच्चारित अनुनासिकेबद्दल मजकुरातील एखाद्या शब्दाचा संदर्भ स्पष्ट करण्यासाठी किंवा त्याचा अर्थ देण्यासाठी त्याच पृष्ठाच्या तळाशी टीप देण्याची पद्धत आहे. त्या वेळी संदर्भ चिन्हाची गरज असते. उदाहरणार्थ, ^{X}अनुनासिकेबद्दल (शीर्षबिंदू) अनुस्वार वापरावा.

या ठिकाणी अनुनासिक शब्दाजवळ X अशी खूण केली आहे. तशीच खूण त्याच पानाच्या तळाशी करून त्याचे स्पष्टीकरण केले जाते. +, X, अशा वेगवेगळ्या चिन्हांचा किंवा १, २, ३, अशा अंकांचाही यासाठी वापर केलेला असतो.

एकेरी (‘ ’), दुहेरी (“ ”) अवतरण चिन्ह

लेखनात अवतरणांचा वापर अत्यंत ढिसाळ पद्धतीने होताना दिसत आहे. एकेरी अवतरण ‘ ’ व दुहेरी अवतरण “ ” केव्हा वापरावे, याबाबत निश्चित धोरण आहे. संभाषण किंवा संवाद यातच दुहेरी अवतरण वापरावे. ती म्हणाली, तो म्हणाला, अशा विधानानंतर होणारे संभाषण/संवाद दुहेरी अवतरणात देण्याची पद्धत आहे. बोलणे सुरू होते, तेथे अवतरण द्यावे आणि बोलणे संपते तेथे बोलणे संपले आहे, हे कळण्यासाठी अवतरण द्यावे. कोणाचे बोलणे कोठे संपले, हे कळण्यासाठी अवतरण पूर्ण करणे आवश्यक असते.

उदाहरणार्थ, तो म्हणाला, “आज शाळेला सुट्टी आहे.” “आज सुट्टी नाही.” ती जोर देऊन म्हणाली. याप्रमाणे कधीकधी बोलणे संपल्यानंतर ते कोण बोलले हे शेवटी सांगितले जाते. तो मनातल्या मनात म्हणाला किंवा तो असे म्हणाला होता, असे विधान असल्यास ती वाक्ये एकेरी अवतरणात लिहायची असतात. एखाद्या वाक्यातील विशिष्ट शब्द महत्त्वाचा असेल, तर त्या शब्दाला फक्त एकेरी अवतरण द्यावे. थोडक्यात प्रत्यक्ष संभाषण, संवाद चालू असतानाची विधाने दुहेरी अवतरणात लिहिली जावी. इतर वेळी एकेरी अवतरण चिन्ह वापरावे.

दंड (।) चिन्ह

काव्यात विशेषतः अभंग, ओवी, श्लोक यांत दंड वापरण्याची पद्धत आहे. ‘अभंग, ओवी यांत प्रत्येक चरणाच्या शेवटी एकेक दंड आणि शेवटचे चरण संपल्यावर दोन दंड देऊन लिहिले जाते. श्लोक किंवा कवितेत पहिल्या ओळीच्या शेवटी एक आणि दुसऱ्या ओळीच्या शेवटी दोन दंड देतात. दोन्ही ओळी

एकापुढे एक असेही लिहितात.

जसे –

१. असाध्य ते साध्य। करिता सायास। कारण अभ्यास। तुका म्हणे ।।

२. मन करा रे प्रसन्न । सकळ सिद्धीचे कारण ।।

विकल्प (/) चिन्ह

गद्यात काही वेळा हे किंवा ते असे पर्यायी शब्द वापरलेले असतात. पर्यायी शब्दाच्या मध्ये विशिष्ट चिन्ह वापरले जाते. ते चिन्ह / असे असते. याला विकल्पचिन्ह असे म्हणतात. या चिन्हाचा इतरत्रही वापर होतो. उदाहरणार्थ, स्टार पॅराडाईज, ए-२/१५, पुणे. या ठिकाणी ए-२/१५ चा अर्थ ए-२, फ्लॅट क्रमांक १५ असा आहे.

शासन निर्णयात अनेक संदर्भ असतात. निर्णय क्रमांक लिहिताना ते संदर्भ या चिन्हानेच दाखवले जातात.

जसे – शासन निर्णय क्रमांक वेतन १९९९/प्र.क्र.२/सेवा-३, वित्त विभाग, मंत्रालय. विकल्पचिन्हाचा असाही वापर केला जातो.

अनुस्वाराची गंमत

अनुस्वारामुळे अर्थपूर्ण शब्द तयार होतात. जसे – अंगठी, इंग्रजी, उंच, ओंडका, कंदील, खांदा, गंध, घंटा, चंचल, छंद, जंगल, टंगळमंगळ, डोंगर, ढोंग, आतंक, आनंदी, थेंब, औदुंबर, पांढरा, फांदी, बंडल, भांडण, मेंढा, यंदा, सारंग, लंका, शंतनू, संख्या, हुंकार. या प्रत्येक शब्दातील कोणत्या ना कोणत्या अक्षरावर टिंब (अनुस्वार) आहे. वरील शब्दांतील अक्षरांवरील टिंब काढून वाचा. शब्द निरर्थक झालेले दिसतील.

अनुस्वारामुळे शब्दांचे अर्थ बदलतात.

पुढील अनुस्वार नसलेले शब्द वाचा. रग, राग, बाबू, नदी, भाडे, माडी, काडी, वदन, कस, दगा, चिता, सध्या, तोड इ.

वरील प्रत्येक शब्दाला स्वतंत्र अर्थ आहे. आता या शब्दातील काही अक्षरांवर अनुस्वार देऊन वाचन करूया. रग-रंग, राग-रांग, बाबू-बांबू, नदी-नंदी, भाडे-भांडे, माडी-मांडी, काडी-कांडी, तोड-तोंड, वदन-वंदन, कस-कंस, दगा-दंगा, चिता-चिंता, सध्या-संध्या इ. इथे अनुस्वार दिल्यामुळे मूळ शब्दाचा अर्थ बदलून वेगळ्या अर्थाचा नवीन शब्द तयार झाला आहे. याचा अर्थ एखाद्या शब्दातील अनुस्वार काढल्यास किंवा एखाद्या अक्षरावर अनुस्वार दिल्यास मूळ शब्दाचा अर्थ बदलतो.

अनुस्वाराची जागा बदलल्यास वा अनुस्वार न दिल्यास शब्दाचा अर्थ बदलतो. उदाहरणार्थ, सबंध, संबंध, संबद्ध हे तीन शब्द पाहा. हे तिन्ही शब्द भिन्न अर्थाचे आहेत. तिन्ही शब्दांत अनुस्वार आहे. तिन्ही शब्दांतील अक्षरे सारखी असून त्यांच्या उच्चारात साधर्म्य आहे. शब्दाच्या अर्थानुसार तिन्ही शब्दांतील अनुस्वाराची जागा ठरलेली आहे.

सबंध म्हणजे संपूर्ण. यात 'ब' अक्षरावर अनुस्वार दिला पाहिजे. संबंध म्हणजे एखाद्या वस्तूशी, व्यक्तीशी असलेले नाते. यात 'स' आणि 'ब' या दोन्ही अक्षरांवर अनुस्वार दिला पाहिजे.

संबद्ध म्हणजे नीट बांधलेले, जोडलेले. यात 'स' अक्षरावर अनुस्वार दिला पाहिजे. चुकून या तिन्ही शब्दांतील अनुस्वाराची जागा बदलल्यास किंवा अनुस्वार द्यायचा राहून गेल्यास त्या शब्दातून अपेक्षित अर्थ न मिळता मूळ अर्थाहून भिन्न अर्थ ध्वनित होतो किंवा त्यातून काहीच अर्थबोध होत नाही; म्हणून अनुस्वार देताना तो योग्य अक्षरावर दिल्यास हा अर्थघोळ होणार नाही.

माधव राजगुरू
मराठी भाषा अभ्यासक
संपर्क : ९४२३५६९०८४
madhavrajguru@gmail.com

शब्दांपलीकडचे तात्या

वैशाली मोरे

मराठी साहित्यात ग्रामीण जीवनाचे अत्यंत जिवंत वास्तववादी आणि हृदयस्पर्शी चित्रण करणारे लेखक व्यंकटेश माडगूळकर यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील माडगूळ या गावी ५ एप्रिल, १९२७ रोजी झाला. ग्रामीण जीवनाचे वास्तव, माणुसकीची जाणीव आणि निसर्गाशी असलेले नाते इ. त्यांनी आपल्या साहित्यातून जिवंत केले. थोरले बंधू ग. दि. माडगूळकर (गदिमा) यांच्या पावलावर पाऊल ठेवून मराठी साहित्याच्या दरबारात व्यंकटेश माडगूळकर आले. एकाच घरातील दोन सख्या भावांनी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषवले होते. त्यांनी त्यांच्या साहित्याच्या व्यासंगावर हे पद मिळविलेले आहे. गदिमा आणि व्यंकटेश माडगूळकरांचे नाते म्हणजे कृष्णमेघ आणि नभाचे. ग. दि. माडगूळकर ज्याप्रमाणे 'गदिमा'या नावाने लिहीत होते, तसेच सुरुवातीच्या काळात व्यंकटेश माडगूळकर 'व्यंदिमा' या नावाने लिखाण करत होते. मराठीतील गाजलेले साहित्यिक, निसर्गप्रेमी असलेले, ग्रामीण कथा लिहिणारे व्यंकटेश माडगूळकर (तात्या) यांचे जन्मशताब्दी वर्ष ५ एप्रिल २०२६ पासून सुरू झाले आहे.

१९४२ नंतर मराठी लघुकथेला वळण लावणारे महत्त्वाचे कथाकार म्हणून जी नावे घेतली जातात, ती म्हणजे गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, पु. भा. भावे आणि व्यंकटेश माडगूळकर. तात्यांनी केवळ कथाच नाही तर कादंबरी, नाटक, प्रवासवर्णने, रेखाटने, पटकथा असे वेगवेगळे वाङ्मयप्रकार आपलेसे केले आहेत.

औपचारिक शिक्षण फारसे झाले नसले तरी स्वकष्टाने मराठी व इंग्रजी साहित्याचा मोठा व्यासंग केला. इंग्रजी शिकून पाश्चात्त्य साहित्याचे वाचन केले. त्यांच्यावर जॉन स्टीनबेक, जॉर्ज ऑरवेल, लिमाय ओ'फ्लाहर्टी इत्यादी लेखकांचा विशेष प्रभाव होता. वडिलांची कथा रंगवून सांगण्याची शैली आणि आईची चित्रकला हे गुण माडगूळकरांनी उचलले.

त्यांच्यावर संत, शाहिरांचे, वाङ्मय, कीर्तन-प्रवचन-पुराणे यांचे संस्कार झाले होते. किन्हईचे कीर्तनकार, राखणदार बळी रामोशी, दादा, आई व त्यांच्याबरोबरची मुले या सर्वांकडून गोष्ट कशी सांगावी हे ते शिकले; पण व्यंकटेश माडगूळकर शब्दांकडे वळण्याअगोदर रेषांकडे वळले होते. घरात चित्रकलेचा वारसा नसतानाही १९३९-४० साली म्हणजे वयाच्या १३-१४ व्या वर्षी त्यांनी औंधला जाऊन ड्रॉईंगच्या दोन्ही परीक्षा दिल्या व उत्तम गुणांनी उत्तीर्णही झाले.

किन्हई या गावी जुन्या भव्य राजवाड्यातल्या मागच्या जागेत राहत असताना त्यांनी ठरवले, की आपण चित्रकार व्हायचं. चित्रकलेचा पहिला गुरू म्हणजे त्यांची बनुताई. त्या श्रावणमासात, व्रतवैकल्याचाच एक भाग म्हणून पांढरीच्या मातीनं सारवलेल्या भिंतीवर चुन्यानं चित्र काढत असे. सहाणेवर हळकुंड उगाळून त्यात पिवळा रंग भरीत असे. मी चित्रकार कसा झालो? याच्या गोड आठवणी ते सांगतात. 'थोडा कळता झालो, तेव्हा आई मला सांगू लागली, आज रथसप्तमी आहे, पाटावर चित्र काढून दे, चित्राचं आई कौतुक करीत असे. इंग्रजी चौथ्या इयत्तेत असताना त्यांना औंध संस्थानाच्या रस्ते व बांधकाम खात्याकडून आटपाडी व भिवघाट या



अठरा मैलांच्या अंतरावरील फर्लांगावरचे व मैलांवरचे दगड रंगून आकडे घालण्याचे कॉन्ट्रॅक्ट मिळाले होते.

चित्रकलेची विशेष आवड असल्याने कोल्हापुरातील 'दळवीज् आर्ट इन्स्टिट्यूट' इथे 'पेंटिंग'चे शिक्षण घेण्यासाठी ते कोल्हापूरला गेले होते. फ्रान्समधील प्रसिद्ध चित्रकारांची चित्रे पाहून आपणही चित्रकार व्हावे असे वाटू लागले. फ्रान्सच्या चित्रकारांची चित्रे पाहिल्यावर त्यांना असे वाटले की आपल्या मनातील अस्वस्थता ही फक्त चित्रातून सांगता येणार नाही तर शब्दांकडे जावे लागते; म्हणून १९६९ साली फ्रान्सला गेल्यावर जिथे जिथे ते फिरले, त्याची अनेक रेखाटने त्यांनी केली. साताराचे साहसी प्रकाशक, शब्द प्रकाशनाचे श्री. सोहानी यांनी त्यांची

रेखाटने वाचकांसमोर आणली. त्यांनी 'जनावनातील रेखाटने' हे पुस्तक प्रकाशित केले. चित्रकार व्हावे असे वाटत होते; पण शिक्षण अपूर्ण. लहानपणी गुरे चारणे, हॉटेलच्या पाट्या रंगविणे इत्यादी कामे केली; पण मन कशातच रमत नव्हते. त्यांच्या या अस्वस्थ मनस्थितीचा उल्लेख 'माणदेशी माणसं' या कथासंग्रहातील 'झेल्या' या शब्दचित्रात आला आहे. आजूबाजूचे लोक तर त्यांना 'वाया गेलेला पोर' म्हणत असत. त्याच काळात त्यांना ते निंबवाडे या गावी प्राथमिक शिक्षक म्हणून काम मिळाले, तेव्हा घरातील माणसे 'हा आता चिकटला, निदान मास्तर तरी झाला' म्हणत होते. जंगलातली जवळजवळ १००० चित्रे व्यंकटेश माडगूळकरांची आहेत. 'रानातील रेखाटनं' 'चित्रकार देऊसकर', 'रंगरेषांचे मृगजळ', 'राजस्थानची रेखाटने', 'जनावनातील रेखाटने' अशी त्यांची रेखाटने प्रकाशित आहेत. १९४६ साली महाद्वार मासिकांसाठी चित्रे, राजकीय व्यंगचित्रेसुद्धा काढून दिली. याच काळात ते लेखनाकडे वळाल्याने चित्रकलेची वाट हळूहळू दूर होऊ लागली.

व्यंकटेश माडगूळकर यांनी स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात लेखन केले आहे. १९४२ च्या 'चलेजाव' चळवळील सहभागी असताना म्हणजे वयाच्या १९ व्या वर्षी त्यांची 'काळ्या तोंडाची' (१९४६) ही पहिली कथा अभिरुची मासिकात प्रकाशित झाली व त्या कथेला पारितोषिक मिळाल्याने त्यांनी लेखन हेच कार्यक्षेत्र निवडले. त्यानंतर हळूहळू 'सत्यकथा', 'समीक्षक', 'मौज' इत्यादी नियतकालिकांमधून त्यांच्या कथा प्रकाशित झाल्या. १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यात सहभागी असल्याने त्यांच्या 'कोवळे दिवस' ह्या कादंबरीत एका कोवळ्या स्वातंत्र्य सैनिकांचे अनुभव आहेत. व्यंकटेश माडगूळकर यांच्या वाचनाची सुरुवात भाड्याच्या घरातील घरमालकाच्या अडगळीत पडलेल्या खोक्यातील पुस्तकांतून झाली. हायस्कूलमध्ये असताना त्यांनी भा. रा. तांबे, राम गणेश गडकरी, केशवसुत, स्वा. सावरकर यांचे साहित्य वाचले. कोल्हापूरला आल्याबरोबर वडीलबंधू गदिमांकडे पुष्कळ कथा, कादंबऱ्या, कविता, आत्मचरित्रे, चरित्रे वाचली. शिक्षक म्हणून कार्यरत असताना गडकरी व केशवसुत त्यांचे काव्य वाचत होते. 'काळ्या तोंडाची' (अभिरुची), 'बनगरवाडीतील वस्तीत' (नवयुग अंक), 'पडकं खोपडं' (मौज), तर समीक्षक, सत्यकथा, अभिरुची मासिकातून कविता प्रसिद्ध होऊ लागल्या होत्या. १९५०च्या दरम्यान मुंबईला येण्याअगोदर त्यांचा 'माणदेशी माणसं' हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला होता. रिचर्ड लुवेसिनच्या 'हाऊस ग्रीन वॉज माय व्हॅली' यावरून 'माणदेशी माणसं'ची कल्पना सुचली होती. माणदेशी वैराण माळावर दारिद्र्याची, दुःखाची, अज्ञानाची, अवहेलनेची स्पंदने 'माणदेशी माणसं' या कथासंग्रहात चित्रित केली आहे. त्यांच्या कथा व्यक्तिचित्रात्मक असून ग्रामीण जीवनातील भोळेपणा, कष्ट, हाल, यातना, अंधश्रद्धा, लबाडी, लोभ, रंगेलपणा अशा अनेक ग्रामीण वातावरणाचे दृश्य येते. ग्रामीण साहित्य त्यांच्या लेखनामुळे स्थूलतेकडून सूक्ष्मतेकडे वळू लागले. ग्रामीण जीवनाकडे तटस्थपणे न पाहता समरसतेने ग्रामीण माणसांच्या सुखदुःखाकडे पाहण्याचा दृष्टिकोन त्यांच्या लेखनात आहे. त्यांच्या लेखनात रांगडी, मायाळू, इरसाल, कष्टाळू, अज्ञानी, भाबडी, एकमेकांचा द्वेष व मत्सर करणारी अनेक माणसे येतात. त्यांच्या एकूण १८ कथासंग्रहामध्ये जवळजवळ २०० कथा आहेत. ते एका ठिकाणी लिहितात, 'वयाच्या विसाव्या वर्षापासून मी पांढऱ्यावर काळं करतो आहे, प्रामुख्याने कथा हा साहित्यप्रकार व ग्रामजीवन हाच माझा लेखनविषय आहे.' त्यांच्या लेखनात त्यांनी स्वतः रेखाटलेली रेखाटने आहेत. माणदेशी माणसं हा व्यक्तिचित्रात्मक कथासंग्रहात माणदेशातील सातारा, सांगली, सोलापूरचा दुष्काळी भाग, गरिबी पिढ्यानपिढ्यांचा संघर्ष, लोकांचा भोळेपणा आणि सामाजिक परिस्थितीचे चित्रण करणारे आहे. हा कथासंग्रह वाचताना ४०-५०च्या दशकातील ग्रामीण भागाच्या

वास्तवाची सफर घडवणारा आहे. बनगरवाडी, माणदेशी माणसं यासारख्या कालजयी कलाकृतींद्वारे त्यांनी माणदेशातील ग्रामीण जीवनाचे जिवंत चित्रण केले आहे.

व्यंकटेश माडगूळकर यांचे कादंबरीलेखन वेगळ्या जीवनदृष्टीचा व सामर्थ्याचा प्रत्यय देणारे आहे. 'बनगरवाडी'चे कथानक त्यांना 'पिपल ऑफ द डियर' या कादंबरीवरून सुचले होते. ते म्हणतात, 'बनगरवाडी' या कथेतील मास्तर मी नाही. माझा थोरला भाऊ लेंगरेवाडीत धनगरांच्या गावी मास्तर होता. त्याने सांगितलेली हकीगत व पाठवलेली पत्रे यातून बनगरवाडीचे कथानक तयार झाले. सुरुवातीला या कादंबरीचे नाव बंडगरवाडी हे होते. ही कथेसाठी आवश्यक माहिती त्यांनी अशी बाहेरून गोळा केली होती. हा उद्योग दोन-तीन वर्षे चालू होता. त्यांच्या एकूण ८ कादंबऱ्या प्रकाशित झालेल्या आहेत.

ग्रामीण विषयाची ओढ, प्रेम, आपुलकी, आस्था होती. साधेपणा, निरागसपणा, चोखंदळपणा इ. गुण त्यांनी माणदेशी निरागस माणसांकडून मिळविले व ते साहित्यात उतरवले. कोंडीबा गायकवाड, धोंडू महादू गायकवाड अशी प्रत्यक्षातील माणसे पाहून त्या पात्रांचा लेखनात उपयोग केला.

'तू वेडा कुंभार' हे नाटक जेव्हा लिहून पूर्ण झाले तेव्हा, त्यांनी गदिमांकडे वाचायला दिले होते. 'सेऊल' येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय नाट्यमहोत्सवात त्यांचे 'सती' हे नाटक सादर करण्यात आले होते. 'बिनबियांचे झाड' या वगनाट्याने महाराष्ट्राच्या कलाजगतात मोठी क्रांती केली होती. 'पती गेले गं काठेवाडी'चा पहिला प्रयोग डिसेंबर १९६८ रोजी रंगभूमीवर झाला. हे नाटक लोकनाट्य आणि संगीत नाटकाच्या शैलीत रचले आहे. त्यांची शैली विनोदी आणि संगीतमय नाटक असे आहे.

सांगत्ये ऐका (१९५९) या गाजलेल्या मराठी चित्रपटातील गाणी प्रसिद्ध गीतरामायणकार गदिमा यांनी तर पटकथा आणि संवाद लेखन ज्येष्ठ साहित्यिक व्यंकटेश माडगूळकर यांनी केले आहे. पुण्याच्या विजयानंद थिएटरमध्ये सलग १३१ आठवडे तो चित्रपट चालला होता. गो. गं. पारखी यांच्या 'सांगत्ये ऐका' या कादंबरीवर सर्वप्रथम अनंतराव माने यांनी चित्रपट बनविण्याचा पहिला प्रयत्न केला होता.

आपल्या प्रभावशाली लेखणीने माणसांच्या, वाचकांच्या मनावर शब्दांचे वार केले. 'गोफ' हे त्यांचे पहिले पुस्तक असून त्यात त्यांनी अतिशय सोप्या भाषेत मानवी जीवनातील गुंतागुंत, निसर्गवर्णन, ग्रामीण जीवनातील अडचणी प्रभावीपणे मांडलेल्या आहेत. २८ ऑगस्ट, २००१ या दिवशी कायमचा निरोप घेतला असला, तरी त्यांनी त्यांच्या लेखनातून प्रत्येकाच्या मनामनांत आणि साहित्य विश्वात स्वतःला जिवंत ठेवले आहे. मराठी साहित्यविश्वात आपल्या प्रतिभेचा अमीट ठसा उमटवला आहे. कथा, कादंबऱ्या, ललित लेखनातून ग्रामीण जीवनाचे, तेथील माणसांचे अस्सल चित्रण केले आहे. ग्रामीण जीवनाबरोबरच त्यांच्या लेखनात निसर्गाला, जंगलाला, पशुपक्ष्यांना महत्त्वाचे स्थान आहे. मात्र आपल्या लेखणीबरोबर त्यांची एक उत्तम चित्रकार म्हणून ओळख आहे. त्यांनी केलेली सुरेख रेखाटने पुस्तकात समाविष्ट आहेत. ओघवत्या चपखल, मोजक्याच रेषांच्या माध्यमातून ते चित्रातल्या विषयाचे नेमके वैशिष्ट्य टिपतात. त्यांच्या ग्रामीण साहित्याला माणदेशी मातीचा गंध आणि वास्तवाचे भान आहे. माणूस आणि त्यांच्या सभोवतालचे सामाजिक व नैसर्गिक जीवन यांच्यातील ताणतणावांचे सूक्ष्म चित्रण त्यांच्या साहित्यात उमटते. त्यांच्या व्यक्तिचित्रांमध्ये जुन्या कथेतील गोष्ट आहेच; पण जीवनाच्या अस्सल गाभ्याला स्पर्श करणारी नवलकथेची किमयादेखील आहे.

■■

वैशाली मोरे
संपर्क : ९४०३१८४९५३

आशा भोसले

(८ सप्टेंबर, १९३३ – १२ एप्रिल, २०२६)

सरस्वतीचा वरदहस्त लाभलेल्या मंगेशकर कुटुंबात जन्माला आलेल्या सर्वच मंगेशकरांनी सांगीतिक क्षेत्रात आपापली स्वतंत्र अशी नाममुद्रा उमटविली आहे. आशा भोसले यांचाही त्यांच्या स्वत:च्या खास शैलीचा, त्यांचा म्हणून एक वेगळा असा ठसा रसिकांच्या मनावर आहे. गायनातील वैविध्य, आवाजातील चढउतार, यामुळे त्यांच्या आवाजातील अनेक भाषांतील अनेक गीते रसिकांच्या ओठांवर आहेत. त्यादृष्टीने आशाताईंचा उल्लेख रसिकांच्या मनातील गायिका असा करणे योग्य ठरेल. देश–विदेशातील अनेक मानसन्मानांनी, पुरस्कारांनी सन्मानित अशा या श्रेष्ठ गायिकेचा जीवन – संगीत प्रवास वयाच्या ९३ व्या वर्षी थांबला..!

महाराष्ट्र साहित्य परिषद
परिवारातर्फे त्यांना श्रद्धांजली...!

आसावरी काकडे

(२३ जानेवारी, १९४९ – १७ मार्च, २०२६)

अत्यंत संवेदनशील वृत्तीच्या या ज्येष्ठ कवयित्रीचे नुकतेच १७ मार्च २०२६ या दिवशी पुण्यात निधन झाले.
मनातील भावनांना नेमक्या शब्दांत मांडण्याचे त्यांचे कौशल्य आणि वैचारिक गंभीर चिंतन त्यांच्या कवितांतून जाणवते. विशेष म्हणजे मराठी आणि हिंदी भाषांतून त्या तितक्याच उत्कटतेने कविता लिहीत असत. अनेक हिंदी कवितांचा भावानुवाद त्यांनी केला आहे आणि त्यांच्या अनेक कवितांचे अनुवाद अन्य भाषांतही झाले आहेत. साहित्य अकादमीसह अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले होते.

महाराष्ट्र साहित्य परिषद
परिवारातर्फे त्यांना श्रद्धांजली...!



अरुण काकतकर
(२४ एप्रिल, १९४७– १८ एप्रिल, २०२६)

अरुण काकतकर हे नाव घेतलं की लगेच दूरदर्शन हा शब्द आठवतो, इतके ते दूरदर्शनशी समरस झाले होते.
ज्या वेळेस अन्य वाहिन्या नव्हत्या, फक्त आणि फक्त दूरदर्शनच होते, त्या काळात म्हणजे दूरदर्शनच्या ऐन भरभराटीच्या काळातील निर्माते आणि दिग्दर्शक म्हणून काकतकर यांनी आपला अमिट असा ठसा उमटविला होता. त्या काळात दूरदर्शन हे कुटुंबातील सर्व सदस्यांनी एकत्रित बसून पाहण्याचे मनोरंजनाचे एकमेव साधन होते.
अरुण काकतकर यांच्या 'गजरा' किंवा 'शब्दांच्या पलीकडले' सारख्या साहित्यिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी दूरदर्शनची एक अभिजात प्रतिमा निर्माण केली होती.
आपल्या कार्यक्रमांतून त्यांनी अनेक नवीनांना संधी देऊन उत्तम कलाकार घडवले.
'बालचित्रवाणी' या संस्थेत ते मुख्य निर्मिती अधिकारी होते. १८ एप्रिल, २०२६ या दिवशी त्यांचे निधन झाले .
महाराष्ट्र साहित्य परिषद
परिवारातर्फे त्यांना श्रद्धांजली...!

श्यामला वनारसे
(१९३९– ९ मार्च, २०२६)

प्रामुख्याने मानसोपचार तज्ज्ञ म्हणून ख्यातनाम असलेल्या ज्येष्ठ लेखिका श्यामला वनारसे हे एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते. आपल्या विषयात कार्यमग्न असतानाच त्यांनी नृत्य, संगीत आणि साहित्य हे आपले छंदही जोपासले होते.
त्या फिल्म आणि टेलिव्हिजन संस्थेतही शिकवत होत्या.
Centre For Psychological Services
या संस्थेतही त्या कार्यरत होत्या.
समीक्षक म्हणूनही त्या ओळखल्या जात असत. 'स्वभावाला औषध असते', 'चित्रपट अभ्यास' आणि 'कलानुभव आणि कलाविचार ' ही त्यांची काही गाजलेली पुस्तके. ९ मार्च, २०२६ या दिवशी त्यांचे निधन झाले.
महाराष्ट्र साहित्य परिषद
परिवारातर्फे त्यांना श्रद्धांजली...!

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे
शाखा कार्यवृत्त

महाराष्ट्र साहित्य परिषद,
शाखा चाळीसगाव

चाळीसगाव शाखावृत्त

त्रैमासिक अहवाल (१ जानेवारी २६ ते ३१ मार्च २६)

पुष्प – १

संत गाडगेबाबा महाराज लोकविद्यापीठाचे कुलपती प्रा. डॉ. राजेश मिरगे (२३ फेब्रुवारी २०२६)

कर्मकांड, अंधश्रद्धा व दांभिकतेत गुंतलेल्या माणसाला धर्म सांगणारे राष्ट्रसंत गाडगेबाबा व देशासाठी कलादान, श्रमदान व भूदान मागणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हेच लोकविद्यापीठाचे खरे कुलपती होते. आजही त्यांची शिकवण माणसाला माणूसपणाचा मार्ग दाखवणारा दीपस्तंभ आहे, असे प्रतिपादन अमरावती येथील श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाचे व्याख्याते प्रा. डॉ. राजेश मिरगे यांनी केले.

येथील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शाखेतर्फे शहरातील राष्ट्रीय सहकारी शिक्षण प्रसारक मंडळाच्या कर्मचारी पतसंस्थेच्या सभागृहात आयोजित राष्ट्रसंत गाडगेबाबा व्याख्यानमालेचे पहिले पुष्प गुंफताना ते बोलत होते. 'मसाप'च्या चाळीसगाव शाखेचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य तानसेन जगताप अध्यक्षस्थानी होते. विचार मंचावर विश्वस्त मंडळाचे कार्यकारी विश्वस्त तथा ज्येष्ठ पत्रकार किसनराव जोर्वेकर, जयसिंगराव पाटील, व्याख्यानमाला प्रमुख शालिग्राम निकम, कार्याध्यक्ष कवी मनोहर आंधळे, प्रमुख कार्यवाह नितीन खंडाळे, उपाध्यक्ष गणेश आढाव, कोषाध्यक्ष रामचंद्र गोसावी उपस्थित होते. प्रा. डॉ. राजेश मिरगे यांनी यांनी संत गाडगेबाबांच्या जीवनकार्यावर प्रकाशझोत टाकला.

प्रास्ताविकात प्राचार्य तानसेन जगताप यांनी 'राष्ट्रसंत गाडगेबाबांच्या विचारांचा ज्ञानदीप समाजातील अंधःकार दूर करण्यासाठी तेजोमय स्फूर्तिस्त्रोत आहे.' असे सांगितले. कवी मनोहर आंधळे यांनी 'मसाप' शाखा गीत सादर केले. शालिग्राम निकम यांनी मान्यवरांचे स्वागत केले. मनोहर आंधळे यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले. यशस्वितेसाठी अशोक ब्राह्मणकार, विजय कदम, प्रतिभा बागूल, सुषमा पाटील आदींचे सहकार्य लाभले.

पुष्प – २

यशवंतरावांचे जीवन राज्यासाठी समर्पित : प्रा. पतंगे.

दि. २४ फेब्रुवारी २०२६

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी राज्याची सूत्रे हातात घेतली तशी धोरणात्मक चौकटही तयार केली. महाराष्ट्राचे दुःख, दारिद्र्य घालवायचे असेल, तर महत्त्वाच्या प्रत्येक शासकीय कामकाजावर नियंत्रण ठेवणे. प्रत्येक उत्पादन क्षमतेला वाव देणे. उत्पादन करणाऱ्याचा वाटा हा वितरण

क्षमतेवर अवलंबून असतो हे लक्षात घेणे. जनतेचं गाऱ्हाणं व्यवस्थेने ऐकणे ही प्रतिसादक्षमता असणे. अशी ध्येयधोरणे यशवंतरावांनी आखली होती. यशवंतराव चव्हाणांचे जीवन महाराष्ट्रासाठी समर्पित होते. अशी भावना पिपल्स कॉलेज नांदेड येथील व्याख्याते प्रा. विशाल पतंगे यांनी व्यक्त केली.

मसाप चाळीसगावतर्फे आयोजित पाच दिवसीय राष्ट्रसंत गाडगेबाबा व्याख्यानमालेतील मंगळवारी द्वितीय पुष्प गुंफतांना 'पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण समकालीन महाराष्ट्र' या विषयावर प्रा. पतंगे बोलत होते.

अध्यक्षस्थानी प्राचार्य तानसेन जगताप, मसाप शाखा विश्वस्त मंडळाचे कार्यकारी विश्वस्त किसनराव जोर्वेकर, शाखा उपाध्यक्ष गणेश आढाव, कार्याध्यक्ष कवी मनोहर आंधळे, व्याख्यानमाला प्रमुख शालिग्राम निकम आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन रामचंद्र गोसावी यांनी केले, तर पसायदानाने व्याख्यानाची सांगता झाली.

या व्याख्यानास दत्तभक्त मंडळाचे सदस्य, मसाप आजीव सभासद, प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी, श्रोते उपस्थित होते.

पुष्प–३

रचले जाते ते काव्य, सुचते ती कविता – संजय बोरुडे.

दि. २५ फेब्रुवारी २०२६

कविता वाचनाने विचार उदात्त होतात, मन व्यापक होते. कविता समाज परिवर्तन करते. जी सर्व सामान्यांच्या ओठांवर येते. काळजाला भिडते ती कविता. आपल्या काळजाची ठणक ज्या कवीच्या शब्दांतून येते ती कविता असते. बहिणाबाईंनी कविता रचल्या नाहीत, तर त्यांना कविता सुचल्या. त्यामुळे रचले जाते ते काव्य असते आणि सूचते ती कविता असते, असे प्रतिपादन साहित्यिक डॉ. संजय बोरुडे यांनी केले.

येथील 'मसाप'च्या राष्ट्रसंत गाडगेबाबा व्याख्यानमालेतील तृतीय पुष्प गुंफतांना ते बोलत होते. 'कविता आणि जीवनाचा अनुबंध' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. 'मसाप' शाखेचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य तानसेन जगताप अध्यक्षस्थानी होते. त्यांच्यासह विश्वस्त उत्तमराव काळे, वसंतराव चंद्रात्रे, उपाध्यक्ष गणेश आढाव, कार्याध्यक्ष कवी मनोहर आंधळे, व्याख्यानमाला प्रमुख शालिग्राम निकम, प्रमुख कार्यवाह नितीन खंडाळे, कोषाध्यक्ष रामचंद्र गोसावी हे मंचावर उपस्थित होते. व्याख्यानाचे प्रायोजक संगीता पाटील व मयूर अमृतकर यांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य तानसेन जगताप यांनी मुखोद्गत असलेल्या शालेय काळातील कवितांचा दाखला देत त्या त्या कवींच्या कवितांमधील अर्थ, लय व भावनिकतेची महती रसिकांसमोर ठेवली. प्रतिभा बागूल यांनी सूत्रसंचालन करुन आभार मानले.

पुष्प–४ थे

अजिंठा लेणीतील स्थापत्य, शिल्प व चित्र हे संपूर्ण वैभव जागतिक कीर्तीचे : डॉ. जगताप यांची माहिती

दि. २६ फेब्रुवारी २०२६

'भारतात साडेबाराशे लेण्या आहेत. त्यांपैकी एकट्या महाराष्ट्रात एक हजार लेण्या आहेत. त्यातीलच अजिंठा लेणी होय. अजिंठ्यात स्थापत्य, शिल्प व चित्र आहेत हे संपूर्ण वैभव जागतिक कीर्तीचे आहे. येथील निसर्ग वनराईने नटलेला आहे बेसॉल्ट (काळा पाषाण) दगडाच्या या अर्धगोलाकार डोंगरात कौशल्यपूर्णरीतीने निर्माण केलेल्या प्राचिन लेण्या आहेत. याच डोंगरातून वाघूर नदी उगम पावते. बौद्ध धर्माचा प्रचार व प्रसार होणे करीता बौद्ध भिक्खू गावोगावी हिंडत तसेच थंडी व पावसापासून रक्षण होणेसाठी व मानवी मोह मायेपासून लांब राहण्यासाठी आणि ध्यान धारणेसाठी अजिंठा लेण्यांची निर्मिती करण्यात आली.' असे अजिंठा लेणी अभ्यासक प्रा.

डॉ.पी.डी.जगताप यांनी उपस्थित श्रोत्यांना सांगितले. ते महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे शाखा चाळीसगाव आयोजित राष्ट्रसंत गाडगेबाबा व्याख्यानमालेतील चौथे पुष्प गुंफतांना अजिंठा लेणी स्थापत्य, शिल्प व चित्रकला विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले.

अध्यक्षस्थानी मसाप चाळीसगाव शाखेचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य तानसेन जगताप हे होते. त्यांच्यासोबत शाखा विश्वस्त मंडळाचे कार्यकारी विश्वस्त तथा ज्येष्ठ पत्रकार किसनराव जोर्वेकर, शाखा उपाध्यक्ष गणेश आढाव, कार्याध्यक्ष कवी मनोहर आंधळे, प्रमुख कार्यवाह नितीन खंडाळे, कोषाध्यक्ष रामचंद्र गोसावी, व्याख्यानमाला प्रमुख शालिग्राम निकम व विश्वस्त शिवाजी साळुंखे मंचावर उपस्थित होते. सूत्रसंचालन वंदना रोकडे यांनी केले.

पुष्प – ५ वे दुःखाला हरवणाऱ्या माणसांची भाषा जपावी : कवी ऐश्वर्य पाटेकर यांचे तरुणांना आवाहन

दि. २७ फेब्रुवारी २०२७

'आज असलेल्या हयात जुन्या पिढीकडे आठवणींची समृद्ध शिदोरी आहे; मात्र पुढील पिढीकडे हीच शिदोरी जवळपास उरणार नाही. घरातील ज्येष्ठांची भाषा आणि त्यामागची जीवनदृष्टी लहानांना समजली पाहिजे,' असे मत प्रा. ऐश्वर्य पाटेकर यांनी व्यक्त केले.

पाच दिवसीय राष्ट्रसंत गाडगेबाबा 'मसाप' व्याख्यानमालेत ते 'दुःखाला हरवणाऱ्या माणसांची भाषा' या विषयावर ते बोलत होते.

या वेळी त्यांनी आपल्या मुक्तछंदातील तीन कविता सादर करून रसिकांची दाद मिळवली. अध्यक्षस्थानी मसाप चाळीसगाव शाखेचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य तानसेन जगताप होते.

मान्यवरांची उपस्थिती

मसाप विश्वस्त मंडळाचे कार्यकारी विश्वस्त किसनराव जोर्वेकर, उपाध्यक्ष गणेश आढाव, कार्याध्यक्ष कवी मनोहर आंधळे, प्रमुख कार्यवाह नितीन खंडाळे, कोषाध्यक्ष रामचंद्र गोसावी आणि व्याख्यानमाला प्रमुख शालिग्राम निकम उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन कामिनी अमृतकार यांनी केले.

■■

महाराष्ट्र साहित्य परिषद,
शाखा पिंपरी–चिंचवड

मराठी भाषा सप्ताह

दि. ३ ऑक्टोबर ते ९ ऑक्टोबर २०२५

३ ऑक्टोबर ते ९ ऑक्टोबर या कालावधीत महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी–चिंचवड, पिंपरी–चिंचवड महानगरपालिका आणि अ. भा. मराठी नाट्य परिषद पिंपरी–चिंचवड शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने साजरा करण्यात आलेला मराठी भाषा सप्ताह हा मराठी भाषा संवर्धनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण आणि बहुआयामी उपक्रम ठरला. यातून मराठी भाषेची अभिव्यक्ती, परंपरा आणि सांस्कृतिक वैभव यांचे प्रभावी दर्शन घडले.

या निमित्ताने आयोजित परिसंवादातून मराठी भाषेची सद्यस्थिती, आव्हाने आणि भविष्यातील दिशा यांवर विचारमंथन झाले. कथाकथन कार्यक्रमाने मराठी कथासाहित्याची परंपरा जिवंत ठेवत श्रोत्यांना कल्पनाशक्तीची नवी उभारी दिली. मराठी वैभव नृत्याविष्काराने मराठी संस्कृतीचे सौंदर्य आणि परंपरेचे कलात्मक दर्शन घडवले, तर कविसंमेलनातून समकालीन काव्यप्रतिभेची ओळख रसिकांना झाली.

विशेषतः कथाकार जी. ए. कुलकर्णी यांच्या कथांवर आधारित दृकश्राव्य कार्यक्रमाने त्यांच्या साहित्यविश्वाची गूढता आणि विचारगर्भता प्रभावीपणे उलगडली. तसेच कवयित्री इंदिरा संत यांच्या साहित्यावर आधारित अभिवाचन झाले.

एकूणच, मराठी भाषा सप्ताह हा केवळ औपचारिक कार्यक्रम न राहता मराठी भाषा, साहित्य

आणि संस्कृती यांविषयीची जाणीव दृढ करणारा, नव्या पिढीला प्रेरणा देणारा आणि भाषिक अस्मिता अधिक बळकट करणारा प्रभावी सांस्कृतिक सोहळा ठरला.

वाङ्मय पुरस्कार सोहळा उत्साहात संपन्न

दि. ३० नोव्हेंबर २०२५

महाराष्ट्र साहित्य परिषद, पिंपरी-चिंचवड शाखेच्या वतीने आयोजित वाङ्मय पुरस्कार सोहळा रविवारी, दिनांक ३० नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता निगडी येथील महाराष्ट्र साहित्य परिषद - शांता शेळके सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कादंबरी, कथा, कविता, ललित आणि बालसाहित्य या विविध साहित्यप्रकारांतील गुणवंत साहित्यिकांना यावेळी सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक व शिक्षणतज्ज्ञ डॉ. न. म. जोशी उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून पद्मश्री मा. गिरीश प्रभुणे यांनी मार्गदर्शनपर मनोगत व्यक्त करत साहित्य हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन असल्याचे अधोरेखित केले. त्यांनी नवोदित साहित्यिकांनी सामाजिक जाणिवा जपणारे लेखन करावे, असे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. जोशी यांनी साहित्याच्या माध्यमातून संस्कारक्षम समाज घडविण्याची गरज अधोरेखित केली.

पुरस्कारप्राप्त साहित्यिकांनी आपल्या भावना व्यक्त करत परिषदेकडून मिळालेल्या सन्मानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. उपस्थित साहित्यप्रेमींनी कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद देत वातावरण अधिकच उत्साही केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अध्यक्ष राजन लाखे, कार्याध्यक्ष विनिता ऐनापुरे, कार्यवाह संजय जगताप, उपाध्यक्ष डॉ. रजनी शेट, कोषाध्यक्ष विजय नाईक, तसेच कार्यकारी मंडळ व सल्लागार मंडळाच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

पिंपरी-चिंचवड वैभव काव्यसंग्रहाचे प्रकाशन सोहळा संपन्न

दि. ३ डिसेंबर २०२५

महाराष्ट्र साहित्य परिषद, पिंपरी-चिंचवड शाखा आणि मराठी भाषा संवर्धन समिती, पिंपरी-चिंचवड यांच्या संयुक्त विद्यमाने प्रकाशित पिंपरी-चिंचवड वैभव या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा बुधवार, दिनांक ३ डिसेंबर, २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता ग. दि. माडगूळकर नाट्यगृह (मिनी ऑडिटोरियम), निगडी प्राधिकरण येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्याचे प्रकाशन हिंदी व मराठी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री मा. वर्षा उसगावकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पद्मश्री मा. गिरीश प्रभुणे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. श्रीपाद भा. जोशी यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास मा. भाऊसाहेब भोईर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांनी काव्यसंग्रहाचे साहित्यिक महत्त्व अधोरेखित करत स्थानिक कवींना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उपक्रमाचे कौतुक केले. कार्यक्रमाचे आयोजन अध्यक्ष-संपादक राजन लाखे आणि संकल्पना संभाजी बारणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

मराठी भाषा दिनानिमित्त कविसंमेलनाचे आयोजन

दि. १ मार्च, २०२६

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कविवर्य कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून, शाखा पिंपरी -चिंचवडच्या वतीने रविवार, दिनांक १ मार्च, २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता संत तुकाराम संकुल, निगडी येथील शांता

शेळके सभागृहात भव्य कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पिंपरी-चिंचवड शाखेचे अध्यक्ष राजन लाखे यांनी केले.

कार्यक्रमाची सुरुवात कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करून झाली. उपस्थित कवी, कवयित्रींनी मराठी भाषेची समृद्ध परंपरा, सामाजिक जाणिवा, निसर्गसौंदर्य, मानवी नातेसंबंध आणि समकालीन वास्तव यांवर आधारित प्रभावी कविता सादर केल्या. काव्यवाचनातून मराठी भाषेचा गौरव आणि तिच्या संवर्धनाची प्रेरणा रसिकांना मिळाली. 'स्वरसाधना संगीत अकादमी'मार्फत अभय कुलकर्णी व अर्पिता व अथर्व कुलकर्णी आणि त्यांच्या गीत मंचाने विविध मराठी गीते सादर केली, त्याला रसिकाची उत्स्फूर्त दाद मिळाली.

कार्यक्रमास परिसरातील साहित्यप्रेमी, कवी, शिक्षक व रसिक यांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. समस्त कार्यकारी व सल्लागार मंडळाच्या नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे हे कविसंमेलन उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय जगताप यांनी केले. कार्यक्रम संयोजन रजनी शेठ, जयश्री श्रीखंडे, किरण लाखे, किरण जोशी यांनी केले.

■■

'महाराष्ट्र साहित्य परिषदे'चा महत्त्वाकांक्षी प्रकल्प

भारतीय भाषांतील स्त्रीवादी साहित्य

संपादक : **डॉ. अश्विनी धोंगडे**

ग्रंथाची वैशिष्ट्ये

मराठीसहित हिंदी, इंग्रजी, तेलुगू, कन्नड, गुजराती, तमिळ, मल्याळम, उडिया, बंगाली, पंजाबी, उर्दू, आसामी या भारतीय भाषांतील स्त्रीवादी साहित्याचा मागोवा घेणारा एक महत्त्वपूर्ण ग्रंथ.

त्या त्या भाषेतील अभ्यासक-संशोधकांचे सखोल अभ्यासपूर्ण लेख.
दर्जेदार मांडणी, छपाई व उत्तम बांधणी.

महत्त्वाच्या लेखकांच्या छायाचित्रांचा विशेष विभाग.

अभ्यासकांसाठी एक महत्त्वाचा संदर्भमूल्य असलेला ग्रंथ.

किंमत : ८००/- रुपये

संपर्क : प्रमुख कार्यवाह, महाराष्ट्र साहित्य परिषद, टिळक रस्ता, पुणे ४११०३०.
दूरध्वनी : ०२०-२४४७५९६३ भ्रमणध्वनी : ९४०४७७२६६१

आवाहन

साहित्यरसिक, वाचकहो,

महाराष्ट्र साहित्य पत्रिकेचा अंक कोव्हिड काळापासून ई-अंकाच्या स्वरूपात प्रकाशित होत आहे. आता बरेचसे वाचक तंत्रस्नेही झाले असले, तरी मसापत्रिका छापील स्वरूपात मिळावी, यासाठी ते आग्रही आहेत. अंक छापील स्वरूपात निघावा ही मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. काही वाचकांना मात्र अंक मेलवर पीडीएफ स्वरूपात हवा आहे. या सर्व बाबींचा विचार करून लवकरच साहित्य पत्रिका छापील आणि डिजिटल अशा दोन्ही स्वरूपात देण्याचा 'मसाप' विचार करत आहे. यापुढील काळात ज्यांना अंक छापील स्वरूपात हवा आहे आणि अंकासाठी स्वतंत्र वर्गणी भरण्याची तयारी आहे, अशा आजीव सदस्य असलेल्या व सदस्य नसलेल्या वाचकांना पत्रिकेचा अंक मसाप उपलब्ध करून देईल. वाचकांनी अंकाबद्दलच्या त्यांच्या अपेक्षा आणि अंकाची मागणी खाली दिलेल्या ई-पत्त्यावर नोंदवावी, तसेच पत्रिकेचे स्वरूप कसे असावे, या बाबतच्या त्यांच्या अपेक्षा स्वतंत्रपणे कळवल्यास निवडक वाचकांच्या प्रतिक्रियांना अंकात स्थान दिले जाईल.

शाखांना अंक हवे असतील, तर त्यांनी अंकाची पूर्वनोंदणी करावी.

ई-पत्ता : masapasahityapatrika@gmail.com

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे कार्यकारी मंडळ (२०२६–२०३१)

२७ मे वर्धापन दिन सोहळा महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे येथील वास्तूत मोठ्या उत्साहात पार पडला.
या सोहळ्यास उपस्थित असलेले मान्यवर व्यक्ती







पुस्तक सूची

मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड १ :	रु. ५००/-
मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड २ (भाग १) :	रु. ७००/-
मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड २ (भाग २) :	रु. ७००/-
मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ३ :	रु. ३५०/-
मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ४ :	रु. ४००/-
मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ५ (भाग १) :	रु. ३५०/-
मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ५ (भाग २) :	रु. ३५०/-
मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ६ (भाग १) :	रु. ३५०/-
मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ६ (भाग २) :	रु. ३००/-
मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ (भाग १) :	रु. ७००/-
मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ (भाग २) :	रु. ८००/-
मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ (भाग ३) :	रु. ७००/-
मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ (भाग ४) :	रु. ७००/-
भारतीय भाषांतील स्त्रीवादी साहित्य :	रु. ८००/-
भाषा व साहित्य संशोधन खंड १ :	रु. ५००/-
भाषा व साहित्य संशोधन खंड २ :	रु. ३००/-
भाषा व साहित्य संशोधन खंड ३ :	रु. २००/-
म. सा. पत्रिका लेख - सूची :	रु. ४००/-

सर्व खंड २५ टक्के सवलतीत !

महाराष्ट्र साहित्य परिषद

डिमांड ड्राफ्टने आगाऊ पैसे पाठविल्यास संपूर्ण संच आमच्या खर्चाने रेल्वे अगर एस.टी. पार्सलने पाठवू. (वरील संचातील सुटे भाग हवे असल्यास ग्रंथविक्रेत्यांना २५ टक्के सूट. व्यक्तिगत ग्राहकांना व संस्थांना १५ टक्के सूट. टपालखर्च वेगळा.)

मागणीसाठी संपर्क : महाराष्ट्र साहित्य परिषद, टिळक रस्ता, पुणे ४११ ०३०
दूरभाष : ०२०- २४४७ ५९ ६३